
कलाविष्कार
ई दिवाळी अंक
नोव्हेंबर २०१२
अंध:कार विचारांचा आणि अज्ञानाचा
दूर करो ही पणत्यांची आरास ...
अभ्यंगस्नान, उटणे, रांगोळी अन् फराळ
दिवाळीचा सण साऱ्यांसाठीच खास ...

संपादकाच्या लेखणीतून...

नमस्कार,

कलाविष्कार या ई दिवाळी अंकाची सलग तिसरी आवृत्ती आपल्यासाठी प्रसिद्ध करताना खुप आनंद होत आहे. तीन वर्षांपुर्वी स्थापना झालेल्या या ई दिवाळी अंकाच्या माध्यमातून अनेक साहित्यिक, कवी, लेखक, चित्रकार, छायाचित्रकार, पाककौशल मंडळी केवळ भारतातंच नव्हे तर सातासमुद्रापकीकडे वाचकांपर्यंत पोहोचली. कलाविष्कार ई दिवाळी अंकाचे खरे शिलेदार तर हीच मंडळी आहेत. या शिवाय कलाविष्कारसाठी साहित्य देण्याचे आवाहन पोहोचवण्यापासून ते साहित्य आल्यावर त्याचे योग्य ते पृथक्करण करण्यापर्यंतचे सहकार्य ज्या व्यक्तिंनी प्रामुख्याने केले अशांची नावे या आनंदाच्या प्रसंगी मला नमूद करावीच लागतील. श्री. मकरंद केतकर, श्री. किशोर कदम, श्री. विनायक फडके, श्री. गजानन लोखंडे सौ. अनघा हिरे, श्री. दर्शन कामत ही ती प्रमुख सहाभागी मंडळी होत, या व्यतिरिक्त प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षीरित्या ज्यांनी कलाविष्कार ई दिवाळी अंकासाठी साहित्य गोळाकरण्याचे काम केले तसेच, कलाविष्कार सर्वांपर्यत पोहोचवला त्यांचेही मी मन:पुर्वक आभार मानतो.

पहिल्या वर्षाच्या यशस्वी वाटचालीनंतर सलग दुसऱ्या वर्षी म्हणजे २०११ सालीही कलाविष्कारसाठी बरेच साहित्य,पाककृत्या, चित्रकं, छायाचित्रे, कलाकुसर, इत्यादिंचा हौशी साहित्यिकांकाडून आणि कलाकारांकडून हातभार मिळाला. तमाम साहित्यिकांना आणि कलाकारांनी सजवलेल्या कलाविष्कार, ई दिवाळी अंक, ऑक्टोबर – २०११ ला जयसिंगपूर येथील **अलिशा अॅडव्हर्टायझिंग एजन्सीज**च्या वतीने आयोजित विशेष आंतरराष्ट्रीय विनाशुल्क खुली मराठी दिवाळी अंक स्पर्धेत २ रे पारितोषिक मिळाले. रौप्य पदक आणि प्रमाणपत्र असे या परितोषिकाचे स्वरुप होते. खालील लिंक इंटरनेट ब्राऊसरमध्ये कॉपी करुन enter बटण दाबा.

http://goo.gl/phkW2

मागिल दोन कलाविष्कार ई दिवाळी अंक आपणास खालील लिंकवरुन मोफत डाऊनलोड करता येतील.

- कलाविष्कार, ई दिवाळी अंक, नोव्हेंबर - २०१०
- कलाविष्कार ई दिवाळी अंक, ऑक्टोबर - २०११

साहित्याने बहरलेला कलाविष्कार, ई दिवाळी अंक, नोव्हेंबर -२०१२ आपल्या पसंतीस नक्कीच उतरेल यात शंका नाही. अनुक्रमणिकेवरील लेखाच्या/ साहित्याच्या नावावर क्लिक करुन आपण थेट त्या साहित्या पर्यंत पोहोचू शकता. पुन्हा अनुक्राणिकेवर परतण्यासाठी प्रत्येक पानाच्या शेवटी **अनुक्रमणिका** असे लिहिलेले आहे तेथे क्लिक करा. संबंधित साहित्यिकाच्या /कलाकाराच्या नावावर क्लिक करुन आपण थेट त्या सहित्यिकाशी / कलाकाराशी ईमेल किंवा फेसबुकद्वारे किंवा उपलब्ध दुरध्वनी क्रमांकाद्वारे (ज्यांचे ईमेल आयडी नाही अशांच्या) संपर्क साधू शकता, . ज्या साहित्यिकांचा ई मेल पत्ता उपलब्ध नाही अशा साहित्यिकांचा थोडक्यात पत्ता आणि संपर्कासाठी दुरध्वनी क्रमांक दिले आहेत. कलाविष्कार, ई दिवाळी अंक वाचत असताना काही शाब्दिक किंवा टंकलेखनाच्या चुका सापडण्याची शक्यता आहे, आपले योग्य ते सहकार्य अपेक्षित आहे .कलाविष्कार,ई दिवाळी अंकाबद्दल आपल्या प्रतिक्रिया, मतं आणि सुचना आपण kalaavishkaar@gmail.com या ई मेल पत्यावर पाठवू शकता. आपण आपल्या ईतर सहकार्यांपर्यंत देखील कलाविष्कार ई दिवाळी अंक पोहोचवा.

कलविष्कार ई दिवाळी अंकाचे फेसबुकवरील पान लाईक करण्यासाठी येथे क्लिक करा.

आपल्याला ही दिवाळी भरभराटिची, आनंददायी, आरोग्यदयी  जावो याच सदिच्छा !  शक्यतो मोठ्या आवाजाचे आणि धूर करणारे फटाके वाजवू नका, लहान मुलांची तसेच अबाल वृद्धांची विशेष काळजी घ्या. दिवाळीचा आनंद प्रत्येकाला अनुभवू द्या जगा आणि जगू द्या.

आपला कृपाभिलाषी,



संपादक आणि प्रकाशक

कलाविष्कार ई दिवाळी अंक

©  या ई दिवाळी अंकातील सर्व साहित्य आणि कलाकुसरींचे अधिकार संबंधित साहित्यिक आणि कलाआरांकडे राखिव

या ई दिवाळी अंकात मांडलेल्या मतांशी किंवा विचारांशी संपादक आणि प्रकाशक सहमत असतीलंच असे नाही

© मुखपृष्ठ, मलपृष्ठ आणि कलविष्कार लोगोचे चे संपुर्ण अधिकार संपादक आणि प्रकाशकांच्या स्वाधीन

## ☙ अनुक्रमणिका ❧

- **गद्य विभाग**


१. पणती — मयुरी कदम
२. दीपावली काल, आज अणि उद्या — सुरेश पाठे पाटिल
३. खग मरणोत्सुक लक्ष — मकरंद केतकर
४. वय कोवळे फुलाचे — सुरज उतेकर
५. चौकट — मीरा कुळकर्णी
६. बाबूलाल आणि जनलोकपाल — प्रदीप ओक
७. छायाचित्रण — मनोज चव्हाण
८. साउथ आफ्रिका - सुरक्षितता आणि मनोरंजन — अनिल गोविलकर
९. कातरवेळच्या गप्पा — श्रीपाद पु. कुलकर्णी
१०. नेटीव्ह जनरल लायब्रेरी ते वाचन मंदिर भिवंडी. १५० वर्षांची जख्खड म्हातारी — दीपक पळसुले
११. पौर्णिमा — सौ .राजश्री रवींद्रनाथ जाधव
१२. कधी -कधी — अरुण वी.देशपांडे
१३. नागा समस्येचं त्रांगडं — पुरूषोत्तम रानडे
१४. मृदगंध — शशांक रांगणेकर
१५. पट्टागडाची एक उनाड भटकंती — चेतन र. राजगुरू
१६. जी बी जे जे — श्रीपाद पु. कुलकर्णी
१७. परंपरा अणि नवता !!! — अनिल गोविलकर
१८. नवविधा भक्ती — विनायक फडके
१९. सुरांचा मानकरी — मिलिंद कल्याणकर
२०. आर्थिक दुबलता — सुरेश पाठे पाटील
२१. पहिला स्पर्श — मनोज चव्हाण
२२. मराठी लेखन सोप्या आणि सहज पद्धतीने — किशोर कदम
२३. बघा आपली फसवणुक होतेय का ? — किशोर कदम
२४. अगरबत्ती फटाके मिठाई रोशनाई — किशोर कदम
२५. अतिथि लुटो भव — प्रथमेश सुरेश शिरसाट
२६. दिवाळी — संकेत भंडारी
२७. वनीकरण - का ?व कसे ? — राजीव पंडित
२८. क्षितीज — सुरज उतेकर
२९. शहरातील पाळीव हत्तींचे वास्तव्य - समस्या व उपाययोजना — प्रभाकर कुकडोलकर

- **पद्य विभाग**

१. गणित ______ वृषाली
२. आई ______ अंजली अभिनव
३. दवबिंदू ______ जान्हवी सारंग
४. जाच ______ जान्हवी सारंग
५. आपलेपणा ______ योगिता चव्हाण
६. जीभ ______ रुपेश पेवेकर
७. येईल का रे तुला माझी आठवण ? ______ शशांक भी. गवंडे
८. गगनभरारी ______ राहूल आराध्ये
९. साक्ष ______ स्वाती भट
१०. मन एक वारूळ ______ अरुण वी.देशपांडे
११. समर्था आता तुमच्या ..विना ...|| ______ अरुण वी.देशपांडे
१२. दीपावली ______ सुरेश पाठे पाटिल
१३. मी तुझीच आहे ______ सुनील खांडेकर
१४. अरविंद तुतारी वाजवितो(विडंबन) ______ गजानन लोखंडे
१५. गझल ______ वराडे पु ग
१६. चित्रकविता ______ विशाखा मशानकर आणि विशाल मसुरकर

- **कलाकुसर**

१. छायाचित्रे ______ दर्शन कामत आणि प्रगती पालांडे
२. ग्राफिटी ______ प्रथमेश सुरेश शिरसाट
३. हस्तकौशल्य ______ दुर्गेश चिंदरकर

## पणती - स्त्रीचे रुप

मयुरी कदम

स्वतः जळून इतरत्र उजेड पसरवणारी ती पणती . एक स्त्री हि सुद्धा एका पणती प्रमाणेच असते . मग ती आई असो , पत्नी असो अथवा मुलगी . जीवनाच्या ह्या रंगमंचावर प्रत्येक पात्र ताकदीने वठविणारी स्त्री आधीच्या युगांपासून ते आत्तापर्यंत दुर्लक्षितच राहिली . आता तुम्हाला वाटेल कि हे तर २१वे शतक आहे . आपला समाज आता पुढारलेला आहे वगैरे वगैरे . पण आपण खरच बदललोय का ?

आता नुकतीच आपण नवरात्र साजरी केली आणि दिवाळीही येऊ घातलीय . ह्या दोन्हीत आपण जिची उपासना करतो ती आदिशक्ती म्हणजे स्त्रीचेच रूप होय . तर एकाच वेळी आपण ज्या देवीची पूजा करतो तिथे दुसरीकडे देवीस्वरूप स्त्रीजन्मावर नाकेही मुरडतो . स्त्रीभ्रूणहत्या हा आपल्याकडे अनेक पिढ्यांपासून चालत आलेला दुर्व्यवहार आहे . कायद्याच्या बडग्यामुळे कदाचित कुठे तरी ह्या राक्षसी प्रकाराचे प्रमाण कमी झाले असले तरी ह्याहूनही अघोरी प्रकार चालू झाले आहेत .

लिंग तपासणी हा कायद्याने गुन्हा असल्याने जरी स्त्री गर्भहत्या कमी झालेली असली तरी मग पुत्रजन्मासाठी मुलगा होई पर्यंत त्या बाईला गर्भार राहण्यास प्रवृत्त करणे ,जन्मलेल्या मुलींचा छळ करणे असे अनेक अमानुष प्रकार केले जातात . इतकेच नव्हे तर मुंबईसारख्या राजधानीच्या शहरात केवळ मुलगी झाली म्हणून नवजात अर्भकाला दुध पिण्यापासून वंचित करणे असे प्रकारही बघितले गेले आहेत . दुर्दैवाने सांगावे लागते की स्त्रियांचा असा छळ होण्यामागे पुरुष वर्गापेक्षा बहुतांशी स्त्रीवर्गच अग्रेसर आहे . ह्याला कारण म्हणजे पिढीजात चालू असलेल्या चुकीच्या चालीरीती किंवा न बदलेली सामाजिक मानसिकता .

स्त्री म्हणजे केवळ उपभोगाची वस्तू अशीच शिकवण लहानपणापासून नव्या पिढीवर बिंबवली जाते . मुलीचे कधी एकदाचे लग्न होते आणि आम्ही कधी एकदाचा सुटकेचा निश्वास सोडतो असेच आईवडिलांना वाटत राहते . कारण मुलगी म्हणजे परके धन ! मुलीला शिकवून काय करायचं ? तिच्या नशिबात तर केवळ रंध , वाढ आणि उष्टी काढा इतकंच लिहिलेलं असतं अशा विचारांमुळे मुलीचे शिक्षण थांबवून तिचे नकळत्या वयात लग्न केले जाते . वाचकहो , हा कोणत्याही गावातला प्रकार नव्हे तर पुणे मुंबईसारख्या प्रख्यात शहरांत सर्रास चालत असणारा प्रकार आहे . त्यामुळे अल्पवयातील लग्न आणि नकळत्या वयात आलेले गर्भारपण यामुळे त्या मुलीच्या मनावर तसेच आरोग्यावरही अनेक वाईट परिणाम होतात . ह्यातूनच गर्भपाताची शक्यता वाढीस लागते . ' वूमन्स हेल्थ ' हे आरोग्य क्षेत्रातले एक खूप महत्वाचे आणि मोठे क्षेत्र बनले आहे .

आपल्या कुटुंबासाठी सदैव जळत राहणारी पणती म्हणजे स्त्री कधीच काही तक्रार न करता निमुटपणे सगळं सहन करत राहते . पण आता आपली वेळ आहे तिच्या शांततेला समजून घेण्याची . वरती मांडलेल्या सगळया समस्या अगदी अनंत काळापासून आहेत . ह्यांबद्दल अनेकदा बरेच काही लिहिले गेले असेल . पण इतक्या वर्षांनंतर ही परिस्थितीत काहीच फरक नाही ! ह्याचा अर्थ नक्कीच कुठेतरी प्रयत्न कमी पडत आहेत . बघा एकदा विचार करून . कारण अशी पणती आज प्रत्येक घरांत आहे .

**दीपावली, काल आज आणि उद्या** — सुरेश पाठे पाटिल

मित्रांनो सध्या दिवाळीची धामधूम जोरात सुरु आहे. सर्वजण आपापल्या परीने हा दिपोत्सव साजरा करत असतो, दैनंदिन गरजा भागविण्यासाठी कितीही अडचणी असल्यातरी सुद्धा लहान मुलांचे लाड पुरवावे लागतात, काही इच्छा आकांक्षावर पाणी सोडून आपण दिवाळीची धामधूम साजरी करून आपले जीवन 'जैसे थे' जगतो. थोडक्यात पूर्वी आर्थिक सुबत्ता सर्वांचीच चांगली होती असेच मी म्हणेल कारण ज्याला त्याला आलेले अनुभव हे त्याच्या जीवनात नक्कीच काहीतरी शिकण्यास प्रवृत्त करत असतात. पण सध्या मध्यमवर्गीयांच जगण खरंच अवघड झालंय, महागाईने कंबरडे मोडले आहे, रोजच्या धकाधकीच्या जीवनात आपण स्वप्न बघतो एक घर असावं पण म्हणतात ना "लग्न पहावं करून आणि घर पहावं बांधून" या उक्तीप्रमाणे हे फक्त स्वप्नच राहिलंय.

दिपावलीच्या पूर्वी परीक्षा असायच्या त्यामुळे कधी या परीक्षा संपतील आणि कधी आम्ही दिवाळीत धांगडधिंगा करू याचीच वाट बघत असायचो, पूर्वी दिपावलीच्या पहिल्या दिवसापासूनच पहाटे फटाके वाजवून आम्ही आनंद साजरा करायचो तेव्हाची मज्जा काही वेगळीच असायची, कपड्यांची खरेदी, दिवाळीचा फराळ, फटक्यांची सरबराई, पाडवा पहाट, भाऊबीज अगदी हा आनंद तुळशी-विवाहपर्यंत आम्ही सर्व लुटत असू. खरंच तो काळ म्हणजे आपल्या आठवणींच एक झाडच म्हणावं लागेल. लक्ष्मिपुजन आणि पाडवा झाल्यानंतर आम्ही बहिणींकडे भाऊबीजसाठी जायचो, सोबत जातांना मिठाई आणि भेटवस्तू हमखास असायच्या. वर्षभर कुठेच जात-येत नसल्यामुळे आमच्या भावंडांमध्ये एकमेकांबद्दल ओढही विलक्षण असायची, एकमेकांना भेटून खूप गप्पा करायचो, सणावाराचे नातेवाईकांचे आंतरदेशीय पत्र आले की तेच पत्र आम्ही दोन-तीन दिवस वाचत असू. मामाच्या गावाला जाण्याचा आनंद देखील वेगळा असायचा, त्यावेळी मामाच्या गावाला बैलगाडीने त्याच्या शेतावर जावून सर्वांसोबत धम्माल करायला खूप आवडायची, भोजनावळी असायच्या, मावशी, मामा, मामांची मुलं, मावस बहिणी, चुलत भाऊ-बहिण, सगळे मिळून पूर्ण रात्री एकत्र भोजनाचा आनंद घ्यायचो, पण हा सर्व आनंद उपभोगतांना आपल्या घरी परतायचं खरंच भान नसायचं, त्या निमित्तानं का होईना सर्वांच्या मनात आपल्या बद्दलचं कुतूहल काय असतं याच नक्कीच आश्चर्य वाटायचं. घरी परततांना या सर्व आठवणींच गाठोडं उराशी ठेऊन जातांना खरंच डोळयात पाणी यायचं, सासुरवाशीण माहेरासाठी तब्बल महिन्याभराच्या सुट्ट्या घेऊन येत असत, सर्वांची चंगळ असायची.

काळाप्रमाणे चालीरीती बदलत गेल्या, आजच्या काळात काही मध्यमवर्गीय घरात वेगळंच चित्र बघायला मिळतय, महागाईमुळे त्रस्त झालेल्या वडिलांना आपल्या मुलांचे लाड पुरविता पुरविता कर्जबाजारी होण्याची वेळ आली आहे. शिक्षणासाठी लागणारा धो धो पैसा कुठून उपलब्ध करायचा या चिंतेत त्या आईवडिलांना साधी सुखाची झोप देखील लाभत नाही. सर्व सारासार विचार करता सर्वसामान्य नागरिकाचे खर्च वाढलेत त्या पटीत त्याच्या वेतनश्रेणीत रु.५००/- किवा रु.१०००/- पेक्षा जास्त वाढ झालेली दिसत नाही. सणवार आले म्हणून मी आपल्याला तत्वज्ञान नक्कीच देऊ इच्छित नाही परंतु सारासार विचार केला तर खर्चाच्या प्रमाणत उत्पन्नात भरघोस वाढ दिसून येत नाही त्यामुळे खिशाला ऐनवेळी कात्री लागलेली असते, हल्ली बाजारात खरेदीसाठी झुंबड तर दिसतेय पण प्रत्येकाची या मागची भावना फक्त हीच की "दिवाळी आहे अडचणी तर येतातच", काही ठिकाणी उधार उसनवार रकमा घेऊन दिवाळी साजरी केली जाते. काही घरात बालगोपाळांना अशावेळी मामाच्या गावाला जाण्याचच काय साध कपड्यांची खरेदी करायचं म्हटलं की बाबांच्या कपाळावर सध्या आठ्या पडलेल्या दिसतात, सासुरवाशिणी आपल्याच घरात दिवाळीचा सण साजरा करण्यात धन्यता मानतात आणि गरीब घरातील मुले कुठे फटाक्यांच्या दुकानावर कुणी कपड्यांच्या दुकानात काम करून आपल्या दिवाळीच्या सुटीत आपल्या दिवाळीच्या गरजा भागवतांना दिसतात. यापुढे उद्याचं चित्र कदाचित आपल्याला वेगळंच बघायला मिळायची शक्यता नाकारता येत नाही, काल परवाच्या सोनी वाहिनीवरील "क्राईम पेट्रोल" या वास्तववादी मालिकेत पैश्यासाठी आपल्या मुलीला विकणारा बाप बघितला, पैशासाठी हपापलेल जग नेहमीच आपण बघतो समाजात असलेल्या अशा विक्षिप्त लोकांना खरतर समाजातून बरखास्त करायला हवं. यामधून आपण पैश्यासाठी लोकांच्या झालेल्या मानसिकतेचा नक्कीच विचार करू शकतो, सध्याचं जग कुठे जातंय, यावर कुणाचा

अंकुश असेल की नाही. आजच्या काळात निव्वळ पैसाच सर्वस्व बनलाय पण नातेवाईक देखील तुमच्याकडे पैसा असेल तरच तुम्हाला विचारतील, 'काय सुरु आहे कसं चाललंय' तुमच्या अडचणींच निराकरण अथवा तुम्हाला चांगला सल्ला द्यायचं सोडून तुमच्या उणीवा काढत बसून तुमच्या नावावर एखाद्या पिंजऱ्यातील आरोपी सारखं आरोपपत्र ठेवून मोकळे होतात, कारण खरी मानसिकता लक्षात घेण्यासाठी कुणाकडे कुणासाठी वेळ शिल्लक नसतो. त्यामुळे नात्यांमध्ये दुरावा होण्यात अशा काही गोष्टी नक्कीच जबाबदार असतात आणि हा दुरावा वाढत जाणारा असतो. त्यामुळे याचा परिणाम थेट आपल्याला दिवाळीच्या किवा अन्य सणावाराला नक्कीच दिसतो. त्यामुळे आपलं कुटुंब आणि आपण असच समीकरण सध्या रुजू होतांना आपल्याला दिसतय. सणासुदीच कुणी आपल्याकडे यायला नको आणि आपण कुणाकडे जायला नको अस चित्र नक्कीच बघयला मिळतं. पैश्यासाठी दाही दिशा म्हणायला सध्याच्या काळात हरकत नसावी.

भविष्यात नातीगोती फक्त लग्नकार्ये, आणि मयताच्या दशक्रियेसाठीच उपलब्ध असतील अस समजून घेण्यास हरकत नाही. कारण 'काम वाढलीत पैसा कमी' अशा अवघड गणितामुळे झालेलं आयुष्याच मातेर, अस काही जणांच झालंय. त्यामुळे सणवार हे फक्त कागदावर येतात आणि कागदावर जातात असे क्षण काही अंशी जुनी लोक आपली नाती जोपासतात एकमेकांकडे येणे, जाणे, शुभेच्छा, या गोष्टी आपल्यापेक्षा वयोवृद्ध लोक जपतांना दिसतात. दिवाळीच्या सणात जो तो आपापल्या ऐटीत असतो पण घरातील वयोवृद्धांकडे बघायला आजच्या पिढीकडे वेळ मिळत नाही. मित्रांनो अशा काही गोष्टीमधून आपण नक्कीच काहीतरी शिकत असतो. सांगण्याच तात्पर्य हेच काळ कितीही बदलू द्या परंतु आपल्या अडचणीमुळे आपल्या जवळच्या व्यक्तीपासून दुरावा घेऊ नये आणि आपल्या मित्र -जणांचा नातेवाईकांचा सणासुदीला विसर पडू देऊ नये आणि सणासुदीच्या या पर्वामध्ये एकमेकांची काळजी घ्यावी.

भविष्यातील महागाईत असेलली दीपावली कशीही असो पण सर्वच जण आपापल्या परीने दिपावलीचा सण मोठ्या आनंदाने पार पाडतो, मोठ्या अडीअडचणींवर मात करून हा दीपावलीचा सण साजरा करूयात आणि आपणा सर्वांना दिपावलीच्या मनपूर्वक शुभेच्छा.. आपणा सर्वांना हा दिपोस्तव मोठ्या आनंदाचा आणि उत्साहाचा जावो हीच ईश्वर चरणी प्रार्थना .

**खग मरणोत्सुक लक्ष** — **मकरंद केतकर**

जागताच मंडूक कुंद आवसेच्या राती
अन वाहताच वारा धुंद झुलवित पाती
अद्‌भूत खेळास होई ग्राम जतिंगा साक्ष
वर्षावती जेव्हा खग मरणोत्सुक लक्ष

--------------

दादा,

मला शंभर टक्के खात्री आहे. मी लिहिलेल्या या चार ओळी वाचून तुला गहिवरून येईल. जुने दिवस आठवून तु ‘भावविभोर’ होशील आणि माझ्या शब्दांवरील तुझ्या प्रेमास भरती येऊन तुझ्या ओठांतून तेच तीन वेदकालीन शब्द सांडतील... "काही कळलं नाही !!!"

पण आता मी तुला जे सांगणारे ते वाचून तू आपण एकेकाळी खेळलेल्या गोट्यांसारखा सांडशील याची मी तुला कार्डासकट ग्यारंटी देतो. आपलं नॉर्थ ईस्ट तसं आतिथ्यशील आहे याबाबत कुणाचच दुमत नाही पण इथे दारात आलेल्या पाहुण्यांना पान वाढण्याऐवजी त्यांनाच पानात वाढून घेतात हे बाहेर कुणाला कळलं तर मात्र जरा लोचा होईल. जाऊ दे! नमनावर जास्त न रेंगाळता आता थेट मुद्द्याचच बोलतो.

परवा गुवाहाटीमधल्या होस्टेलवरचा माझा मित्र मुनाल मला एक 'चित्तरथरारक' गोष्ट सांगत होता. आसाममधल्या दिमा हासाओ नावाच्या जिल्ह्यात जतिंगा नावाचं दोन अडीच हजार माणसांच एक गाव आहे. गाव फार जुनं नाही त्यामुळेच गावासारखाच या घटनेचा इतिहासही शंभर सव्वाशे वर्षांपलिकडे जात नाही. झालं असं, साधारण जुलै महिन्यातली ती एक ढगाळ रात्र होती. चंद्रही 'फोर्टनाईट लीव्ह' वर होता. दिवसभराची कामं आटपून सुस्तावलेल्या वस्तीवर दिवेलागण झाली आणि एक अद्‌भुत घटना घडली. कोणाच्याही ध्यानीमनी नसताना अचानक पाऊस सुरू झाला. तोही जिवंत पक्षांचा. अकल्पितपणे घडलेल्या या घटनेकडे तेव्हा दैवी प्रकोप म्हणून जरी पाहिलं गेलं तरी हरीने खाटल्यावर आयत्या आणून दिलेल्या या पूर्णब्रम्हाला फोडणी देण्याचे सत्कर्मही तत्काळ घडलं हे सांगायला नकोच. त्यानंतर अनेक वेळा हा चमत्कार घडला परंतू त्याला जगासमोर आणण्याचं श्रेय जातं ते शस्त्राचा आधार न घेता शास्त्राचा आधार घेणाऱ्या. ई.पी.गी नावाच्या ब्रिटिश शास्त्रज्ञास. १९६० साली हे शास्त्रज्ञ भारताचे प्रसिद्ध पक्षितज्ञ डॉ. सालिम अलींना (होय. त्यांच्या नावाचा उच्चार सलिम असा नसून सालिम असा आहे) घेऊन या गावात पोहोचले आणि त्यांनी काही महत्वपूर्ण निष्कर्ष काढले. जसे, दिव्यांवर झेपावणाऱ्या पक्षांमधे स्थलांतर करणारे पक्षी नसून सुमारे ४४ जातींचे स्थानिक पक्षीच आहेत. दीड किलोमीटर लांब आणि दोनशे मीटर रूंद असा हा पट्टा वगळला तर आसपासच्या कुठल्याच गावात ही घटना घडत नाही. तसेच ही घटना घडायला सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे विशिष्ट परिस्थिती निर्माण व्हावी लागते.

या संशोधनाच्या आधारावर भारताच्या 'झुऑलॉजीकल सर्व्हे ऑफ इंडिया' या संस्थेने १९७७ साली डॉ. सेनगुप्तांच्या मार्गदर्शनाखाली अधिक संशोधन करून हा चमत्कार आणि जतिंगा गावास वैश्विक प्रसिद्धी मिळवून दिली. त्यांच्या तर्कानुसार हवामानातील बदलांमुळे भूजलातील पाण्यामधे काही खास चुंबकीय बदल होत असावेत ज्यामुळे पक्षांच्या दिशा शोधण्याच्या प्रक्रियेत गडबड होऊन ते जमिनीकडे झेपावत असावेत. अर्थात या तर्काला अजूनतरी काही सबळ पुरावा नसून अधिक संशोधन चालू आहे. पण ‘अंधारात’ केलेल्या या संशोधनातून

‘उजेडात’ आलेली महत्वाची गोष्ट म्हणजे प्रकाशाच्या दिशेने झेपावणारे पक्षी हे जीव देण्यासाठी झेपावत नसून केवळ स्थलदिक्कालाच्या संभ्रमामुळे त्या जागेवर येतात. आणि महत्वाचं म्हणजे या प्रकारच्या घटना आपल्या इथल्या माळशेजघाटाच्या माथ्यावर बांधलेल्या M.T.D.C च्या रिसॉर्ट्सच्या आवारातही घडल्या आहेत ज्यात सुमारे सत्तर (चु.भू.द्या.घ्या) जातींच्या पक्ष्यांचं आत्मसमर्पण नोंदवलं गेलं आहे.

अनाकलनिय गोष्टींचं दैवी चमत्काराच्या भांडवलात रुपांतर करणे ही माणसाची पुरातन खोड आहे आणि या भांडवलावर चालणाऱ्या बुवाबाजीच्या या धंद्यात जतिंगामधे शेकडो पक्षांना आजवर ‘उदरभरण’ नोहे तर दैवी प्रसाद समजून ‘जाणिजे यज्ञकर्माच्या’ भावनेने मोक्ष मिळाला आहे. पण आता मात्र अनेक पक्षीतज्ञ दरवर्षी तेथे जनजागृती करत असून पक्षांच्या शिरच्छेदाचं प्रमाण चाळीस टक्क्यांनी कमी झाले आहे. 'जाणिजे यज्ञकर्म' कडून 'जाणिजे पुण्यकर्म' कडे होणारा पक्षांचा हा प्रवास नक्कीच सुखावह आहे. नाही का?

तुझा,

मकरंद

**वय कोवळे फुलाचे** — **सुरज उतेकर**

आपल आयुष्य हे एक फुलं आहे. एक सुंदर, सुवासिक, चैतन्यमयी फुलं.परमेश्वरा चरणी अर्पण केलेलं एक पवित्र पुष्प. विधात्याच्या रम्यबागेतील एक इवलस फुलं. आपल्या रंग गंधाने सौरभाचा वर्षाव करणारे, तर कधी स्वतःच्याच दुःखात हरवून फुलण्या आधीच कोमेजून रंगाचा बेरंग करणारे. इवल्याशा फांदीवरउमलणारी कोवळी कळी.... हळुवार उमलताना कितीप्रकारच्या रूपांच दर्शन देते..!

कळीतून फुलात रुपांतर होताना बाळ वयातून तारुण्यात पदार्पण केल्याची जाणं होऊन अगदी सज्ञान, जबाबदार व्यक्तीपरी वावरताना उन्हाचा जाच सहन करून ते इवलस फुलं प्रत्येकाला सौरभतेच संदेश देत असत. बालपण देगा देवा..... शाळेत असताना निबंधासाठी म्हणून हा विषय हमखास असतोच. परीक्षेत उत्तम गुण मिळावेत म्हणून घोकंपट्टी करून "बालपण देगा देवा...." चा पाढा गिरवायचा. पण, ह्या बालपणाच महत्त्व आता जाणवतं. आयुष्याची वाटचाल करत पुढेपुढे चालताना ह्या बालपणाचा हात कुठे कसा सुटतो कधी काही समजतहि नाही. बालपणातून तारुण्यात पदार्पण होत. तारुण्यातील मौजमस्ती सोबत जबाबदारीची जाणीवही होते. बालमन खरच किती निरागस असत ना...! बाहेरच्या जगाशी त्याला काही देणघेण नसत. कोणाच्या कपटी वृत्तीची जाणं नसते. ना कोणाच्या कृतज्ञपणाची.

स्वतःच्या निरागसतेत मस्त असणाऱ्या ह्या बालमनाला सर्व जगच निरागस वाटत असत. हि कोवळी निरागस मुल...सकाळी भांडतात तर संध्याकाळी पुन्हा तितक्याच आत्मीयतेने खेळाचे डाव रंगतात. वाढत्या वयाबरोबर निरागसता कमी होत जाते कि काय कोण जाणे..! म्हणूनच का रक्ताच्या नात्यांमध्ये देखील विषाचे बीज पेरले जाते..? एकमेकांविषयी कपट बाळगून वरवर आपलेपणा दाखवणाऱ्या समाजाच खर रूप डोळ्यांसमोर आलं कि बाळपणातल अज्ञान आपलंस वाटायला लागत. अज्ञानात सुख असत म्हणतात...! ते याचमुळे का? बालपण म्हणजे चंदेरी स्वप्नांची रात्र. स्वप्नांच्या चंदेरी दुनियेतून वास्तवात पदार्पण करणाऱ्या तारुण्याच्या सूर्यप्रकाशात कपट, मदमस्तर, द्वेष, अहंकाराच्या छबीला खंबीरपणे सामोरे जावे लागते. चांदण्या रातीत रमलेल्या बालमनाला मोठ्या धीराने प्रखर सूर्यप्रकाशाची सवय घालावी लागते. अज्ञानाच्या काळोखातून वास्तवतेची वाट चालताना बिथरलेल्या मनाला अलगद सावरावे लागते. नात्यांमधल्या राजकारणाच्या जाणीवेच्या जखमा समजूतदारपणाच्या लेपणाने भराव्या लागतात.

अज्ञानात सुख मानणार बालमन वास्तवतेची जबाबदारी पेलायला कणखर कराव लागत. तारुण्याच्या वाटेवर हरवलेलं बालपण शोधताना या साऱ्या गोष्टी नव्याने उमजतात. वास्तवतेच्या जाणीवेचा हा डोंगर पेलायला कोवळ फुलं असमर्थ ठरू नये म्हणून वारंवार काळजी घ्यावी लागते. आयुष्याच्या वाटेवर आपले वाटणारे बरेच भेटतात पण; आपले असणारे....अगदीच नगण्य....! आपल समजून ज्याला मनातल्या गोष्टी सांगाव्या त्यांच्याच कढून हासू झालं कि; परकेपणाची जाणं होते. जमीन म्हणून पाय ठेवू इच्छिणाऱ्या चिखलात मन अधिक रुतत जाते. सज्ञान होऊन दुःख झेलत बसण्यापेक्षा अज्ञानातलं सुख मोठ नाही का? जीवनाच्या रखरखत्या उन्हात अनवाणी चालताना सज्ञान मनाला होणाऱ्या वेदना अज्ञानी बाळ मनाला खरच जाणवत नाहीत का? मनात नकोनको त्या कल्पना, नकोनको ते संभ्रम निर्माण होतात. याचवेळी बेचैन मनाच्या चौखूर उधळलेल्या घोड्याला लगाम घालत, साज्ञानातील जबाबदाऱ्यांची हळुवार जाणीव करून द्यावी लागते. वेल होऊन आधारासाठी भटकण्यापेक्षा झाड होऊन आधार देण्याची इच्छाशक्ती जोवर जागृत होत नाही तोवर अज्ञानातील सुखाची ओढ संपत नाही आणि त्याचा हातहि सुटत नाही.

हे सारे करत असताना बालपणीच्या निरागस मनाचा हात मात्र सुटता कामा नये. "फुलाचे कोवळे वय" आयुष्याच्या वाटचाली बरोबर अधिक कोवळे होत जावे. कोवळया वयातील निरागसता, त्यातील सात्विक भाव, सारे मनाच्या कोपऱ्यात जतन करून ठेवावे. नुसतेच जतन करून ठेवू नये

तर आयुष्याच्या वाटेवर एक एक पाउल पुढे टाकताना अतिशय सहजतेने आणि खुबीने या आंतरिक श्रीमंतीची मुक्त हस्ताने लयलूट करावी. घेण्यापेक्षा देण्यातले सुख अनुभवून पहावे. हात पसरत फिरण्यापेक्षा पसरलेले हात सावरायला शिकावे. सज्ञानातही सुख असतेच फक्त खुबीने ते ओळखता यायला हवे. शेवटी निरोप घेताघेता असे काही कर्म करावे कि; आपल्या मृत्यू नंतरही आपल्या सत्कृत्यांचा सुगंध दरवळत राहील.....त्याच आठवणींतून प्रत्येक श्वासासरशी अंतरी दरवळणाऱ्या सुगंधापरी प्रत्येका ओठी एवढेच शब्द येतील....."वय कोवळे फुलाचे......!!"

## चौकट

मीरा कुळकर्णी

तिचे जीवन तिच्या चौकटीत सामावलेलं .आज पर्यंतचे म्हणजे लग्न आधी हि आणि नंतर हि . खरे तर तिचा प्रेमविवाह .दृष्ट लागावे असेच होते सारे ती हि आणि तिचा संसारही .तिच्या प्रियकर जो आता नवरा होता तरी त्यांच्यातले नाते मात्र अजूनही तसेच होते . समजून घेणे आणि एकमेकांना स्पेस देणे हे त्यांच्या आजवरचा सुखी संसारातले गमक होते .पण तिने आणि त्याने हि खूप कष्टातून दिवस काढले होते .

पण , त्या बद्दल त्यांना कधी हि आपल्याला हे का .किंवा आपणच दिसतो का देवाला त्रास द्यायला असे कधी हि वाटले नाही . प्रत्येक व्यक्तीत एक उर्जा असते तीच ह्या दोघात होती .समजूतदार पणा आणि जशी परिस्थिती असेल तशी ती आहे तशीच स्वीकारणे कदाचित हेच असेल खरे ते कधी हि परिस्थिती वर चिडलेले ,रडलेले आणि कुणा दुसर्याला त्यासाठी जबाबदार धरणारे असे दिसलेच नाहीत कारणही तसेच होते.

लग्न तर त्यांनी केले होते ..पण सगळे मनाने त्यांच्या पासून दूर झाले होते .पण त्यांनी कशाची हि परवा केली नाही,ते त्यांचे काम करत होते सर्वांनी दूर केले तरी ते त्यांच्या जवळच होते कुणी काही हि बोलू ,टोमणे मारू सगळे त्यांनी गोड मानून घेतले , कारण परिस्थिती सगळं सहन करायला शिकवते काळ कुणासाठी हि थांबत नाही तसा ,यांचा हि काळ बदलला जे जे हवे ते सगळे मिळाले पण त्यांचे वागणे नही बदलले नाही बोलणे गम्मत आहे न ,आपण संधी शोधत असतो ..कधी परत फेड करू ते ,बोलण्याने किंवा वागण्याने पण हे दोघे म्हणजे वेगळेच रसायन होते खरंच कशातही टाका त्यांचा रंग नही बदलला असे हि असतात आणि म्हणूनच ते यश पाहतात स्वत: कष्टातून साकारलेले अशा जीवनसाथी च्या चौकटीत होती ती हि अगदी सुखी असे नाही. एक कमी होती जशी सगळयांच्या आयुष्यात असतेच कि, तशीच .त्याण्चीही भांडणे होताच होती पण तेवढ्या पुरती.

पण तिची हि चौकट तिला आवडणारी अगदी मनापसून पण दिवस बदलले कि तुमचे नशिबही बदलयला लागते असे काहीसे झाले तिच्या बाबत तिला चित्रपटातून /मालिकातून वगैरे विचरण येऊ लागलीतसे ते दोघेही नोकरदार कधी विचारच केला नव्हता तिने हि पण तरी तिला आनंद तर झाला होता मध्यमवर्गातील लोकांना असे सुखद धक्के नाही सहन होत पण तरी एका मीटिंग ला ती गेली अर्थाततिच्या पार्टनर शी बोलणी झाल्यावरच त्याने तिला किमान मीटिंग ला तर जा असे सुचवले , आणि म्हणून ती गेली तिला खूप काही कळले,ज्या व्यक्तीशी ती बोलत होती, तो त्या नव्या जगाची तिला ओळख करून देत होता आणि हि तितकीच मनातून त्या जगाबद्दल आणि आपल्या सध्याच्या जगाबद्दल पडताळणी करू आणि हो तिच्या चौकटीतला तिचा तिला चहू बाजूनी सावरून घेणारा तिचा पार्टनर दिसत होता. ती घरी आली तिने सांगितले सगळे त्याने हि निर्णय तिच्यावर सोपवला होता पण हे सगळे एकले त्याने पण तिने तिचा निर्णय ८ दिवसात सांगणे अपेक्षित होते. त्यांना तिचा निर्णय 'नाही' हाच होता पण तिने ते कळवणे हि फारसे महत्वाचे आहे असे नाही वाटले.

आता १५-२० दिवस होत आले होते आणि एक दिवस अचानक त्यांचाच फोन आला तिने संयमाने उत्तर दिले त्यांना आश्चर्य हि वाटले तिने सांगितले कि , " आपले सर्वस्व गमावून असा मान आणि पैसा मिळवण्यात तिला काडीचा हि इंटरेस्ट नाही ." त्यांनी सांगितले कि सगळेच तसे नाहीत मग तिचे हि उत्तर होते कि काही जण तर आहेत ना त्यांचे जेव्हा सगळे प्रयत्न संपले तेव्हा हा विषय हि संपला होता. तिने हि एक मोकळा श्वास घेतला तिच्या पार्टनर च्या कुशीत अगदी सगळे विसरली ती कधी कधी काही बोलण्यापेक्षा एक सुखाचा स्पर्श हि पुरेसा असतो हेच तिला समजले पुन्हा नव्याने पण ,आता त्यांच्या चौकटीला नवीन रंग चढला होता एक नवीन पाहुणा येणार होता. ज्या सुख पासून ती गेली ७ वर्षे वंचित होती पण देणारा देव असतो हेच खरे 'चौकट ' तसा तीन अक्षरी शब्द पण त्यला असणार्या बाजू मात्र चार आहेत गम्मत आहे न, हो आहेत चार खांब एक आधाराचा ,एक सुखाचा ,एक दुखाचा आणि एक भावनांचा.

आपल्या माणसासाठी वाटते ती काळजी /प्रेम/कौतुक /राग अशा सगळ्या भावनांचा मिलाप असतो. तरी हि या चौकटीत दोघांसाठी हि जागा असावी आणि ती चौकट दोघांनीही सावरावी तरच ती टिकेल नही तर दोन समांतर रेषा सारखे आयुष्य राहील आपले हि ज्यात कशाने हि फरक पडत नाही त्या दोन रेषा जात असतात सरळ आपापल्या दिशेने कधी हि कुठे हि जुळत नाहीत !!!!!!!!!!!

**बाबूलाल आणि जन लोकपाल** ______ **प्रदीप ओक**

बाबूलाल हातातली पिशवी सांभाळत ST मधून उतरला! पिशवीत डोकावून सारे कागद नी आहेत का ते तपासले! डोक्यावरची गांधी टोपी नीट केली! बाबूलाल जन्मभर तीच टोपी घालत आला होता. पहिल्या दिवशी शाळेत जाताना बापाने त्याच्या डोक्यावर ठेवली होती. त्याने हिशोब केला... ५५ वर्षापूर्वी! आज वय किती ? ६१ ... ३ वर्षे झाली रिटायर होऊन...ST Stand मधून बाहेर पडताच रिक्षावाल्यांचा गराडा पडला!

'काका कुठे जायचे?' एक रिक्षावाला

'अं? जिल्हा परिषद ऑफिस' babulal ने सांगितले.

'बसा! २५ रुपये द्या!'

'नको!'

'काका, लई लांब हाय ते! मीटरचे भाडेच सांगतोय!'

बाबूलाल चालू लागला! बाजूला एक प्रवासी रिक्षावाल्याशी हुज्जत घालत होता,. चांगलेच पेटले होते.

'पण, मी म्हणतो मीटर प्रमाणे का नाही येणार? सरकारने रेट ठरवून दिले आहेत, तुमच्या मागण्याप्रमाणे ! चार वेळ संप केलात. आता का नाही म्हणता?'

' अहो, सरकारला काय जातंय भाडे ठरवायला? इथे आम्हाला धंदा करावा लागतो. यायचे तर या उगाच कटकट करू नका!'

'मी कटकट करतोय? हे पहा तुम्ही मीटर प्रमाणेच यायला पाहिजे. नाहीतर मी तक्रार करेन!'

'करा करा! हा माझा नंबर लिहून घ्या. आणि नाव सांगा गणेश! सगळे हप्ते वेळेवर जातात तिकडे, कोण शाट वाकडे नाय करणार! तोंड काय पाहताय? आता फुटा. च्यायला सक्काळी सक्काळी धंदा खोटी करतात!'

' मुजोर, झालेत सगळे! कोणाची भीती राहिली नाही!' भांडणारा बाबूलालला म्हणाला!

'अं! हो!' बाबूलाल चालू लागला. उन्हाची तिरीप वाढत होती. खरे म्हणजे चहा प्यावासा वाटत होता. नाश्ता कसला, दोन दिवस घरात काही शिजले नव्हते. ताराबाईने वाचवून ठेवलेले शेवटचे पैसे दिले होते. परतीच्या प्रवासाचे बाकी होते! तंद्रीमध्ये बाबुलालने रस्ता ओलांडायला सुरुवात केली! अचानक दोन्ही बाजूनी करकचून ब्रेक लागले.

'ए फुकनीच्या!' बस वाल्याने शिवी घातली. गोंधळून तो पुन्हा रस्त्याच्या अलीकडे आला. बराच वेळ गेल्यावर त्याने रस्ता ओलांडला.

जिल्हा परिषदेच्या ऑफिसमध्ये पोचला तोच १२ वाजत आले होते. तहानेने जीव व्याकूळ झाला होता. त्यात लघवी पण लागली होती. ऑफिसच्या मुतारीत शिरला आणि मागून ओफिसातील शिपाई ओरडला,

'ओ श्रीमंत! कुठे चाललात? साहेब लोकांची मुतारी हाय ती! तिकडे जावा जनरल मध्ये!'

मागे वळून तो जनरल मध्ये गेला. मोकळा होऊन बाहेर येऊन पाणी कुठे मिळते का ते पाहू लागला! कुठेच दिसेना म्हणून हात धुण्याच्या जागेवर पाणी पिऊन पुढे झाला. जिल्हा परिषदेच्या ऑफिस मध्ये हे त्याची 10 वी फेरी होती. कोणाकडे, कुठल्या टेबलावर जायचे ते ठाऊक होते. तिथे जाऊन तो उभा राहिला.

'नमस्कार, साहेब! राम राम राम!' बाबूलाल

'हं! बोला काय काम होत?' साळवी म्हणाला.

'साळवी साहेब, तुम्हाला माहित आहे! पुन्हा काय सांगू? मी, बाबूलाल मास्तर! घणसोल बुद्रुक!'

साळवी ने दात कोरायला सुरुवात केली!

'साहेब, काय झाले?'

'कशाचे?' साळवी

'माझ्या पेन्शनचे!'

दातातून कोरून निघालेले कण जिभेने उडवून साळवी बाबुलाल कडे पहात राहतो!

'माझे पेन्शन अजून चालू नाही झाले! फंड पण नाही मिळाला अजून पुरा!'

'मग? मी काय करू?' साळवी

'तुमच्याकडेच आहे फाईल साहेब!'

'तुम्हाला कसे माहित?'

'शिंदे म्याडम नि सांगितले!'

'च्या मायला त्या xxxxxx! आणखी काही सांगितला नाय का?'

'नाही! म्हणजे त्या म्हणाल्या तुम्ही सगळ्या फायली तुमच्या जवळच ठेवता!'

' होय! माझ्याकडे ठेवतो! कारण मी काम पण करतो! तोड रंगवत बसत नाही दिवसभर!' साळवी, शिंदे बाईना ऐकू येईल अशा आवाजात बोलल्या !

'तोंड रंगवते, कारण ते चांगले आहे म्हणून! माकड तोंड्या काळ्याना नाही कळणार ते! आणि, घामाचे पैसे वापरतो आम्ही!' शिंदे म्याडम कडाडल्या!

'ओ ssssss ! तोंड सांभाळा! माकड कोणाला म्हणता?' साळवी

'उगाच अंगावर ओढवून घेऊ नका! मी असेच बोलले, तोंड रंगवताना!' शिंदे

'वाह! आवडेल अंगावर आले असे कुणी तर!' साळवी

'मला पण कुणाचे तोंड रंगवता आले तर खूप आवडेल! नवीनच चप्पल घेतीय काल, पगाराच्या पैशातून.' शिंदे

'तोंड सांभाळा! '

'तुम्ही सांभाळा! ते ड्रावर नीट बंद करा! कुणाला दिसेल गांधी चाप आतले! बाबूलाल इकडे या! तुमचे काम कसे होईल ते सांगते तुम्हाला! कोणाला तेल घालावे लागेल ते मी सांगते तुम्हाला! त्याशिवाय इथली माकडे प्रसन्न होत नाहीत!' शिंदे

'फार झाले आता! मी कम्प्लेंट करेन साहेबाना!' साळवी

'करा! ते तुमच्याच गटातले! ते अण्णा बसलेत तिकडे उपोषणाला! थोडे दिवस थांबा! उघड्यावर पडाल मग! शिंदे

बाबूलाल घाई घाईने शिंदे म्याडम कडे गेला!

'कोण अण्णा?'

'अहो, अण्णा हजारे!

'कुठल्या शाळेत होते? त्यांचे पण पेन्शन नाही मिळाले अजून?'

शिंदे बाईंनी बाबुलालकडे हताशपणे पाहिले!

'अहो पेपर वगैरे काही वाचता कि नाही?'

'कुठून वाचणार? बाई, दोन वेळचे जेवण कठीण झालेय, पेपर कुठून आणू?'

'अण्णा हजारे ठाऊक आहेत न?'

'हो! तो राळेगणसिद्धीचा महात्मा! मी पाहिले आहे त्यांना! शाळेत शिकविले आहे त्यांच्याबद्दल!'

'तेच ते! उपोषणाला बसले आहे! भ्रष्टाचारा विरुद्ध कायदा करण्यासाठी!'

'कुठे?'

'दिल्लीमध्ये! रामलीला मैदानावर!'

'बरे आहे! पण बाई तुम्ही मला सांगणार होता, माझे पेन्शन कसे चालू होईल म्हणून!'

'हो! हे पहा तुम्ही इथे येता! आपले काम झाले का विचारता! इथले महाभाग तुम्हाला सांगतात, अजून झाले नाही म्हणून! मग तुम्ही जाता, परत येता! किती दिवस चालणार असे?'

'बाई, तुम्ही मदत करा ना काही!'

'मी काय मदत करणार? तरी पण सांगते! एक गांधी छाप ५ वाला घेऊन या! त्या काळतोंड्याच्या थोबाडावर मारा! मग लगेच फाईल सरकेल पुढे! मग अजून दोन वेळा मध्ये दोन गांधी छाप, काम झालेच म्हणून समजा!

'गांधी छाप? ५ वाला?'

'बाबूलाल, ५०० ची नोट!'

'कुठून आणू?'

'ते मी काय सांगू?'

तिकडून साळवी केकाटला, ' काय खुसपूस चालली आहे तिकडे?'

'काही नाही साहेब, त्या म्हणतात ५०० रुपये.......'

'ओ म्याडम लुडबुड करू नका माझ्या कामात, सांगून ठेवतोय! बाबूलाल, तुम्ही जा! तुमचे ते अण्णा बसलेत तिकडे जा! दिल्लीला नाही तर इथे त्या मैदानात जा! खूप येडे जमले आहेत तिकडे ! गेले १० दिवस TV वर मस्त करमणूक चालली आहे. रोज मजा येतेय पाहायला! त्यांना सांगा, ते करतील तुमचे काम. च्यायला कटकट साली नसती! ओ जा ना आता! गायकवाड यांना दरवाजा दाखव!' साळवी

बाबूलाल बाहेर पडला. समोरून एक मिरवणूक चालली होती! हातात तिरंगा घेऊन...डोक्यावर गांधी टोपी.. आणि त्यावर 'मी अण्णा हजारे' असे लिहिलेले! बाबूलाल त्यांच्याबरोबर चालू लागला! पोटात भुकेचा डोंब उसळला होता. पण जवळचे पैसे गावी परत जाण्यापुरते होते! बरोबर चालणारे घोषणा देत होते! कॉलेजमधील मुले मुली उत्साहात होते.

'अण्णा नाही आंधी हैं, देश का दुसरा गांधी हैं!'

'भ्रष्टाचार विरोधी जन लोकपाल विधेयक मंजूर झालेच पाहिजे'

'अण्णा तुम आगे बढो हम तुम्हारे साथ हैं'

बाबूलाल भारल्यासारखा त्यांच्या बरोबर चालत होता. मिरवणूक चौकापर्यंत आली. कोणीतरी पाणी वाटत होते. बाबुलालच्या हातात प्लास्टिक पिशवीमध्ये पाणी पडले. त्याने ते घटा घट प्यायले! त्याला बरे वाटले! डोळ्यासमोर साळवी दिसत होता. दात कोरीत त्याच्याकडे धारदार नजरेने पहात होता. त्याचे घर दिसू लागले. ताराबाई, त्याची बायको दारात उभी होती! तिला सांगून आला होता तो. आज काही झाले तरी काम करून येणारच. मावळत्या सूर्याच्या तीरीपीने बाबुलालच्या डोळ्यासमोर अंधारी आली. मिरवणूक आता एका मैदानावर पोचली होती. आजूबाजूने वेगवेगळ्या वाहिनीचे प्रतिनिधी हातात माईक घेऊन बरोबर चालत होते. त्यांच्याबरोबरचे क्यामेरावाले दृश्य टिपत होते. इतक्यात शेजारून चालणाऱ्या माणसाचा बाबूलालला हलका धक्का लागला. तो जरासा कोलमडला. त्याच्या डोक्यावरची टोपी खाली पडली. ती उचलायला तो वाकला, पण बाजूचे कोणीतरी ती तुडवून निघून गेले. बाबूलाल ने टोपी उचलली. चिखलामध्ये पार माखली होती. त्या तोपिकडे पहात तो तसाच थांबला. इतक्यात बाजूच्या कोणीतरी एक टोपी पुढे केली. त्याने हातात घेतली, पांढरी स्वच्छ. त्यावर 'मी अण्णा हजारे' असे छापले होते. बाबुलालने ती डोक्यावर चढविली आणि पुढे चालू लागला. आता घोषणाना जोर चढला होता. आजूबाजूच्या आवाजाने एक प्रकारची झिंग चढली. पुन्हा त्याच्यासमोर साळवी तरळला, दात कोरत. कुठून आणायचे ५०० रुपये? घरामध्ये काही नाही. गावामध्ये पत नाही. तारण ठेवायला काही नाही. पेन्शन सुरु झाले कि सगळे ठीक होईल, पण त्याची शाश्वती काय? फंड आला कि सगळ मारवाड्याकडे जाणार. मुलीच्या लग्नाचे कर्ज अजून फेडायचे आहे. एकच मुलगी. जावई चांगला आहे, चांगली नोकरी आहे पण त्याच्याकडे कसे मागणार? साळवी आता खदखदून हसत होता. शिंदेबाई कावऱ्या बावऱ्या होऊन पहात होत्या. साळवीच्या हातात ५०० ची नोट होती. त्याने तो वारा घेत होता. त्याच्या टेबलवरची बाबुलालची फाईल त्याच्या वाऱ्याने उडत होती. बाबुलालने ती सावरण्यासाठी हात पुढे केला.

'अरे पाणी आणा पाणी!' कोणीतरी ओरडले. तोंडावर पाण्याचा हबका बसला. त्याने डोळे उघडले.

'हेल्लो, अहो काय झाले आपल्याला! हे पाणी प्या.' कॉलेजातला एक मुलगा त्याला सावरून बसवीत होता.

'फाईल उडाली.' बाबूलाल

'कसली फाईल?' अरे बाजूला व्हा! डॉक्टर आले!'

एक डॉक्टर आला. BP पाहिले.

'उपाशी आहात का?' डॉक्टर

'अं? म्हणजे तीन दिवस झाले!' बाबूलाल

तोवर आजूबाजूला बरीच गर्दी जमली. TV Chanel वाले आले. तो प्रतिनिधी हातामधल्या Mike मध्ये बोंबलू लागला.

'आताच एक नागरिक, इथे चक्कर येऊन पडला आहे. अण्णांच्या पाठिंब्यासाठी तीन दिवसापासून तो उपोषण करतोय! आपण त्यालाच विचारूया!'

'मला सांगा, तुम्हाला का वाटले आपण पण उपोषण करावे?

बाबुलालच्या तोंडामध्ये mike खुपसला गेला.

'अं?मी माझे पेन्शन.....'

'मला सांगा, काय करता आपण?'

'मी शिक्षक आहे! म्हणजे होतो.'

'वाह! retire आहात?'

'हो. दोन वर्ष झाली. नाही तीन झाली '

'तर तीन वर्ष आपल्याला निवृत्त होऊन झाली. मग या आंदोलनात कसे आलात?'

'आंदोलन? मी आलो माझे पेन्शन....पाणी...'

कोणीतरी पाणी देत.

' हं तर आपले पेन्शन म्हणत होता आपण.'

'ते अजून मंजूर नाही झाले... म्हणून आलो इथे...दर महिन्याला येतो...'

'आपले नाव काय? का नाही मंजूर होत आपले पेन्शन?'

'मी बाबूलाल! प्राथमिक शिक्षक होतो घणसोल बुद्रुक....माहित नाही... पण आज शिंदे बाई म्हणाल्या ५०० रुपये द्या साळवी ला , म्हणजे होईल..'

'पाहिलात आपण, भ्रष्टाचार किती खोलवर मुरला आहे या देशात. एक शिक्षक, त्याने आयुष्यभर इमाने इतबारे सेवा केली, एक पूर्ण पिढी घडविली त्याची ही दैना आहे...आज अण्णा त्याच कारणासाठी उपोषणाला बसले आहेत.' बोलत बोलत चानेल वाला दूर गेला. भोवतालची मुले आपापसात बोलू लागली. डॉक्टर अजून तिथेच होता.

'यांना कोणीतरी ज्यूस पाजा आणि काही तरी खायला द्या..' डॉक्टर

'नको! मी मी ठीक आहे!'

'नाही काका, असे करू नका! तुम्हाला उपोषण झेपणार नाही. आम्ही आहोत. कुठले ऑफिस म्हणालात आपण?'

'जिल्हा परिषद'

'साळवी ना? बोरकर, साळुंके, मन्या उद्या यांचे काम करायचे. त्या साळवीला टांगू आपण.! संध्या एक वडा पाव आणि फ्रुटी आण काकांसाठी. काका, तुम्ही तिथे स्टेजवर बसा!'

मुलांनी बाबुलालला सावरत नेऊन बसविले. कोणीतरी त्याला ज्यूस दिला. काहीतरी खायला आणून दिले.

..........

साळवीने TV बंद केला आणि घाम पुसला.

'च्यायला हे बेण बाराच निघाला कि?' लगोलग त्याने कपडे केले आणि बाईक काढून ऑफिस मध्ये पोचला. बाबुलालची फाईल तयार होती. त्यावरची धूळ झटकून त्याने ती साहेबाच्या टेबल वर नेऊन ठेवली. मोबाईल वर साहेबाशी बोलला.

'साहेब, गडबड आहे!'

'काय?'

'साहेब तो बाबूलाल TV वर आला होता.'

'कोण बाबूलाल?'

'साहेब एक retire मास्तर आहे! त्याचे पेन्शन मंजूर नाही झाले अजून!'

'मग?'

'मी थांबलो होतो, आपल्या procedure प्रमाणे...आता जरा गडबड आहे...त्याने TV वर सांगितले सगळे, माझे नाव घेतले...मी फाईल तुमच्या टेबलवर ठेवली आहे...कम्प्लीट आहे साहेब...सही करा लगेच...'

'हं ! असे करा घरी घेऊन या! मी सही करतो आणि तुम्ही रातोरात curriernे कागद पाठवा त्याला ! तुमच्या खर्चाने! मी उद्या रजेवर आहे... तुम्हीपण येऊ नका. dispatch वाल्याला सांगा पत्र गेले म्हणू! आणि जरा सांभाळून राहा. दिवस वाईट आहेत!'

'हो साहेब'

.....

बाबूलाल ला केव्हातरी झोप लागली. पोटात काही गेल्यामुळे असेल किंवा थकल्यामुळे असेल. पण सकाळ झाली तेव्हा आजूबाजूला बरेच जण झोपले होते. सकाळपासून पून्हा लोक यायला सुरुवात झाली. बाबूलाल उठला आणि जवळच्या पाण्याने त्याने तोंड धुतले. त्याची चाहूल लागून जवळच झोपलेली कालची पोरे उठली.

'काका, कुठे चाललात?'

'मी त्या ऑफिसात जातोय! '

'आम्ही पण येतो! एकटे जाऊ नका! च्यायला त्या साळवीच्या! मन्या उठ! ए चला रे! टोपी घाल सोन्या ती... झेंडा घे रे तू!'

असे म्हणून १०-१२ पोरे निघाली. मधोमध बाबूलाल!थोड्याच वेळात ही वरात ZP च्या ऑफिस बाहेर पोचली. अजून कोणी आले नव्हते. यांच्या घोषणा सुरु झाल्या!

'अण्णा हजारे झिंदाबाद'

'भ्रष्ट्राचारी सरकारी अधिकाऱ्यांना सजा झालीच पाहिजे'

' जन लोकपाल विधेयक संमत झालेच पाहिजे'

इतक्यात शिंदे म्याडम आल्या. त्यांनी बाबूलाल ला पाहिले. त्याने नमस्कार केला म्याडम ना!

'बाबूलाल? हा काय प्रकार आहे?'

'काही माहित नाही! ही पोरे आली आहेत, मोर्चा घेऊन!'

'कशासाठी?'

'ते, जन लोकपाल विधेयक आणण्यासाठी!'

'इथे?'

शिंदे म्याडमनी एका मुलाला विचारले,

'हे काय आहे?'

'आज आम्ही एका शिक्षकाला न्याय देण्यासाठी आलो आहोत. भ्रष्टाचाराचा बळी! ते काय तिथे आहेत! त्यांना पेन्शन नाही मिळाले म्हणून! कोणीतरी साळवी आहे! त्याला टांगणार आहोत आम्ही आज!'

'अरे वाह रे बाबूलाल! छुपा रस्तुम निघालास!' शिंदे

'या मी तुम्हाला दाखविते कोण तो ते!'

मंडळी आत शिरली. पण साळवी आला नव्हता! जावक कारकुनाने सांगितले बाबूलाल चे कागद पाठविले.

मग पून्हा विजयी घोषणा देऊन सारे जण परतले.

इतक्यात बातमी आली, अण्णांच्या मागण्या मान्य झाल्या! अण्णा उपोषण सोडणार!

......

बस मध्ये बसताना बाबूलाल खूप दमला होता! तिकीट काढले आणि तो विचारात गढून गेला. आता ताराबाईला बरे वाटेल. वाट पहात असेल.

घणसोल नाक्यावर गाडी थांबली! कंडक्टर ने आवाज दिला!

'मास्तर उठा!'

बाबूलाल गाढ झोपेत!

कंडक्टर पुढे झाला! त्याला हलवले!

बाबुलालची मान खाली पडली! वाटेमध्ये केव्हातरी त्याचा प्राणपक्षी उडून गेला होता!

......

पोचवून आलेली माणसे आता पांगली! शेजार पाजारच्या आया बाया पण गेल्या! ताराबाई आणि मुलगी दारात बसल्या होत्या!

कुरिअर वाला आला!

'बाबूलाल कोण'?

ताराबाईला रडू आवरेना! पोरीने काय ते सांगितले!

'आता काय करायचे?

'मला द्या ना!'

'देतो! पण उपेग काय?'

'आता तुमच्या आईला zp च्या हापिसात याव लागल! फेमिली पेन्शन साठी'

'येईल ना ती!'

....

ताराबाई zp च्या ऑफिसात आली!

'ते मास्तर लोकांचे पेन्शन इथेच होते ना?'

साळवी दुरून पहात होता!

'ओ बाई इकडे या!'

ताराबाई त्याच्या टेबल कडे गेली.

'काय हवाय?'

'ते शिक्षकाचे पेन्शन चे काम आहे!'

'तुम्ही शिक्षक होता?'

'नाही! माझे, ते, होते! गेले ते! फ्यामिली पेन्शन साठी आलेय'

'नाव काय त्यांचे'

'म्हणजे ते त्यांचे नाव या कागदावर आहे....'

साळवीने कागद घेतला आणि वाचू लागला! वाचता वाचता जोरजोरात हसू लागला!

'बाबूलाल का? झाले तुमचे काम आता! महिन्यात या! १०-१२ वेळा यावे लागेल!'

साळवी पुन्हा मोठ्यांदा हसला. ती त्याच्याकडे आश्चर्याने पाहत राहिली!

'उभ्या का? जा कि आता! गायकवाड, यांना दरवाजा दाखव.' साळवी

.......

ताराबाई बाहेर पडते!

वाऱ्याबरोबर एक कागद उडत येतो! ताराबाईच्या पायाशी पडतो!जुना पेपर असतो! त्यावर अण्णांचा उपोषण सोडतानाचा फोटो असतो! ताराबाईचा त्यावर पाय पडतो, ती तशीच पुढे जाते!

शिंदे म्याडम ऑफिसात शिरतात, तेव्हा, साळवी, साहेबांच्या केबिनमध्ये बसून चहा पिता पिता जोरजोरात हसत असतात!

**छायाचित्रण** — **मनोज चव्हाण**

छायाचीत्रणामध्ये खरे तर छायेऐवजी प्रकाशाचा उपयोग केला जातो,म्हणू खरे तर त्याला प्रकाशचित्रण म्हंटले गेले पाहिजे. असो हे माझे वैयक्तिक मत आहे...आपण जो नेहमचा शब्द वापरात आहे तोच घेऊ या...
छायाचित्रण : कॅमेरा हे प्रकाशाच्या साहाय्यानेछायाचित्रे ( क्षणचित्रे किंवा चलचित्रे ) टिपण्याचे एक यंत्र आहे.

केमेऱ्याचे तंत्रज्ञानानुसार प्रकार आहेत.

१) पॉइंट अँड शूट:

यामध्ये प्रामुख्याने एकच भिंग वापरले जाते आणि सोपे ऑप्टिक्स असते. हे तंत्रज्ञान प्रामुख्याने नवोदित आणि सामान्य, घरगुती उपयोगासाठी विकसित केले गेले आहे. सोपे तंत्र आणि वापरलेल्या भागांची स्वस्त उपलब्धता यांमुळे या प्रकारच्या कॅमेऱ्यांची किंमत कमी असते. तसेच सगळे नियंत्रण कॅमेरा स्वतःच ठरवत असल्यामुळे वापरण्यास हे कॅमेरे अतिशय सोपे असतात. पण नियंत्रणात मानवी हस्तक्षेपास वाव नसल्यामुळे किंवा फारच कमी असल्यामुळे हवी तशी प्रतिमा घेणे अवघड जाते. कुठला भाग अचूक फोकसमध्ये राहील याचे सर्व नियंत्रण कॅमेरा स्वतःच ठरवतो.

२) एसएलआर (सिंगल लेन्स रिफ्लेक्स कॅमेरा):
या प्रकारच्या कॅमेऱ्यामध्ये अतिशय अचूक ऑप्टिक्स, अचूक आणि योग्य तंत्रज्ञान वापरले जाते. ज्या वस्तूचे किंवा त्यानुसार भिंग (कॅमेरा लेन्स) बदलण्यास वाव असतो. तसेच या कॅमेऱ्याचे नियंत्रण अतिशय अचूकपणे करता येऊ शकते. त्याच अचूकतेमुळे या कॅमेऱ्याची किंमत थोडी (किंवा खूपच) जास्त असते. गरजेनुसार विविध लेन्स वेगळी विकत घेता येऊ शकतात. कुठला भाग अचूक फोकसमध्ये राहील याचे सर्व नियंत्रण फोटोग्राफरच्या हाती असते.

छायाचित्रणात वापरले जाणारे महत्त्वाचे तीन शब्द .आय एस ओ , ऐपरेचर , आणि शटरस्पीड .. याबद्दल माहीती

- आय.एस.ओ.(ISO) म्हणजे त्या फिल्मची सेन्सिटीविटी (संप्रेरणा).... कि किती प्रकाशाला किती सेन्सिटीविटी लागते...कारण प्रत्येक प्रकाशाची ती वेगळी येते...पण आता निगेटिव्ह कालबाह्य झाल्याने ती सेन्सिटीविटी (संप्रेरणा) सुविधा नवीन डिजिटल केमेर्यात थेट दिली आहे... म्हणजे कोणत्याही प्रकाशासाठी तुम्हाला रोल चेंज करावे लागत नाहीत. १०० पासून ते अगदी ६४०० पर्यंत त्याची सेन्सिटीविटी (संप्रेरणा) वाढवता येऊ शकते.

- ऐपरेचर (APT) ऐपरेचर म्हणजे फिल्मवर येणाऱ्या प्रकाशासाठी आता येण्यासाठी केलेली तजवीज. त्यासाठी केमेर्यामध्ये चांगली तजवीज असते. म्हणजेज्या छिद्रातूनप्रकाश आत येतो ते छिद्र आपण लहान मोठे करू शकतो असलेल्या प्रकाशाप्रमाणे. जर प्रकाश जास्त असेल तर ते छिद्र लहान केल्यास रोलवर (आता डिजिटल केमेरे आहेत )प्रकाश कमी येतो आणि प्रकाश कमी असेल तर ते छिद्र मोठे केल्यासप्रकाश जास्त येतो अन आपल्याला हवा तसा फोटो काढता येतो. हे ऐपरेचर आपण कमी जास्त करू शकतो अगदी १.८ पासून ३२ ते ३६ पर्यंत....

- शटर स्पीड (Shutter speed) शटर स्पीड म्हणजे ऐपरेचर वर अजून नियंत्रण ठेवण्यासाठी केलेली प्रणाली. शटर स्पीड हा सेकंदावर मोजता येतो. याचा वेग आपल्याला हवा तसा ठेवू शकतो. याचा वेग आपण कमीत कमी एका फोटोसाठी ३० मिनिट आणि जास्तीत जास्त ४०००/ सेकंद (म्हणजे सेकंदाचा ४०००वा भाग) आणि त्यापेक्षाही ठेवू शकतो. म्हणजे समजा तुम्हाला कमी प्रकशात ऐपरेचर एडजस्ट करूनही जर फोटो व्यवस्थित मिळत नसेल तर शटर स्पीड अगदी कमी ठेवून आपल्याला हवा असलेला फोटो आपण घेऊ शकतो. पण त्यासाठी ट्रायपोड जरुरी आहे. आणि जर एखाद्या चालत्या बाईकचा किंवा उडत्या पक्षाचा फोटो काढायचा असल्यास शटर स्पीड वाढवून त्याचा अगदी स्पष्ट फोटो घेऊ शकतो. अर्थातच ऐपरेचर आणि आय.एस.ओ. यांचा अचूक संगम साधुनच... आणि त्यासाठी तुमचे गणित पक्के असावे लागते.

**साउथ आफ्रिका - सुरक्षितता आणि मनोरंजन** ______ **अनिल गोविलकर**

साउथ आफ्रिका हा तसा 1st दर्जाचा देश मानला जातो. त्यामुळे, इथल्या सुविधा ह्या बहुतांशी उत्तम दर्जाच्या किंवा त्याच्या आसपास असतात. आता तुलना करायची झाल्यास, कमतरता नक्कीच आहे, जसे रविवार संध्याकाळी बाहेर जेवायला जायचे म्हणजे कर्मकठीण!! त्यामानाने आपली मुंबई कशी दिवसाचे २४ तास खिलवायला तयार असते!! मुंबईत रात्री-बेरात्री बाहेर रस्त्यावर पायी हिंडायला काहीच वाटत नाही पण, साउथ आफ्रिकेत असे पायी चालण्याचे नावदेखील काढायची सोय नाही. कधीकधी "कोंडवाडा" वाटावा, इतका एकांत असतो. मी, सेंच्युरीयन इथे राहात असताना, Eco Park या समृद्ध आणि प्रचंड Residential Complex मध्ये राहात होतो. तिथे भौतिक सुखासाठी लागणाऱ्या सगळ्या गोष्टी उपलब्ध आहेत. उत्तम हॉटेल्स, उंची मॉल्स, अत्याधुनिक व्यायामशाळा आणि त्यातील अप्रतिम पोहण्याचा तलाव, सुंदर वाचनालय, टेनिस तसेच इतर खेळ खेळण्यासाठी क्लब हाउस अशा सुविधांनी नटलेला परिसर पण, गप्पा मारायला शेजारचा माणूसदेखील उपलबद्ध नाही!! अर्थात, सोमवार ते शुक्रवार, सगळेच कामात बुडालेले असल्याने, तसे काहीच वाटत नाही. तसेच शनिवार आणि रविवार नेहमीच आपापल्या ग्रुपमध्ये व्यस्त असल्याने, तसा एकांत फारसा अंगावर येत नाही. पण, कधीतरी मुंबईची आठवण मनात उफाळून यायची. विशेषत: रात्रीचे जेवण झाले की मी, Complex मध्येच पायी हिंडत असे( याचे बऱ्याच गोऱ्या लोकांना विशेष वाटायचे पण ही माहिती काही महिन्यानंतर मला समजली!!) पण शेजारी हिंडताना, गप्पा मारायला कुणी नाही. मग, मनाशीच संवाद साधायची सवय लागली. तशी भारतातून बरीच पुस्तके आणली असायची, तसेच ऐकायला बरीच गाणी होती, घरातील टीव्हीवर काही भारतीय Channels बघायला मिळायची ( बहुतेक Channels वर आपल्या "सुप्रसिद्ध" हिंदी सिरियल्स असतात!!) पण तरीही रात्रीचा फेरफटका मला खूप आवडायचा. Complex मोठा असल्याने दोन, तीन फेऱ्या मारल्या की त्यात तासभर सहज निघून जायचा. इथेच मी राहात असताना, भारताने प्रथमच जिंकलेला T20 विश्वकप विजयाची धुंदी अनुभवली. माझ्या ग्रुपमध्ये मकरंद फडके म्हणून मित्र होता. मुंबईत त्याचा भाऊ, अविनाश फडके याची क्रिकेट क्षेत्रात बरीच ओळख असल्याने, त्याच्या ओळखीने, प्रथम डर्बन इथल्या, भारत आणि ऑस्ट्रेलिया यातील उपांत्य फेरीच्या सामन्याचे पासेस मिळाले होते. मी, मकरंद, आणि वैभव पोरे असे शनिवारी विमानानेच जोहानसबर्ग इथेऊन डर्बनला दुपारी गेलो. आमच्या ग्रुपमधील बंटी (समर्थ शाह) आधीच डर्बन इथे कामानिमित्ताने असल्याने, त्याने आधीच पासेस मिळवले होते. डर्बनला पोहोचल्यावर, प्रथम जबरदस्त खाणे उरकून घेतले आणि नंतर स्टेडीयममध्ये गेलो. स्टेडीयम खचाखच भरलेले होते. सुदैवाने, युवराज सिंग प्रथम,नंतर धोनीने जो काही धुवांधार खेळ केला, त्याने आम्ही चौघे जाम खुश. सामना बघत असताना बियरचा आस्वाद घेणे, हा शब्दात न मांडता येणारा अनुभव आहे. त्या सामन्यात शेवटी भारत जिंकला आणि जो काही मैदानात आरडा-ओरडा सुरु झाला, त्या तोड नाही, अर्थात, दोन दिवसाने, अंतिम फेरीतील धुंदी काही वेगळीच!! वास्तविक वैभव दुसऱ्या दिवशी भारतात परतणार होता पण जसे भारत अंतिम फेरीत आला, हे नक्की झाल्यावर त्याने जाण्याचे पुढे ढकलले. सामना रात्री आठच्या सुमारास संपला आणि आमचे तसेच रात्री जोहानसबर्ग इथे निघायचे ठरले. मला तर बंटीची कमाल वाटली. अक्षरश: रात्रभर गाडी चालवली आणि आम्ही पहाटे चार वाजता मकरंदच्या Complex मध्ये आलो. तिथेच आम्ही आमच्या गाड्या ठेवल्या होत्या. वास्तविक शहरात मी बरेच वेळा रात्रीची गाडी चालवली होती परंतु रात्रभरचे जागरण अंगावर घेऊन, गाडी चालवण्याचा पहिलाच प्रसंग!! तरीही आपला भारत जिंकला, याच धुंदीत गाडी हाणली (मकरंदच्या घरापासून माझे घर जवळपास ५० किलोमीटर्स दूर होते!!) आणि पहाटे घरात शिरलो आणि सरळ पलंग गाठला.

दुसऱ्या दिवशी दुपारी उठलो. लगेच मकरंदला फोन लावला आणि सोमवारच्या सामन्याचे कन्फर्म केले. एव्हाना, माझ्या इतर मित्रांना, आमच्या ग्रुपच्या हालचालीची माहिती कळली होती. अंतिम सामना, भारत आणि पाकिस्तान!! यापेक्षा वेगळी जाहिरात करायची गरजच नाही!! सोमवारी, इथे सार्जनिक सुटी असल्याने, शहरात प्रचंड उत्सुकता पसरली होती. दुपारी लवकरच जेऊन, मी मकरंदच्या घरी आम्ही सगळे जमलो. स्टेडीयम खऱ्याअर्थी खचाखच भरले होते, जिथे पाहावे तिथे भारतीय किंवा पाकिस्तानी!! तेंव्हा समजले की जोहानसबर्ग - प्रिटोरिया इथे किती आशियायी लोक राहतात!! सबंध सामनाभर नुसता आरडा-ओरडा चालू होता, त्यादिवशी मी जितका ओरडलो असेन इतका त्याआधी आणि नंतर कधीच नाही!! शेवटी आपण विश्वकप जिंकल्यावर तर धमाल करायला नुसते "उधाण" आले होते. भारत विश्वकप सामन्यात अंतिम फेरीत असावा आणि त्या सामन्यात जिंकावे आणि आपण साक्षी असावे, या आनंदाला दुसरी तुलना नाही. वास्तविक सामना संध्याकाळी उशिराने संपला पण आमचे

"सेलिब्रेशन" रात्री उशिरापर्यंत चालू होते. त्या दिवशी बियरला जी "चव" आली त्याला दुसरी तोड नाही!! साउथ आफ्रिकेच्या वास्तव्यात ज्या आठवणी कायमच्या मनात राहिलेल्या आहेत, त्यातील विश्वकप विजयाची आठवण सर्वात पाहिली.

पण असे प्रसंग साउथ आफ्रिकेत तुरळक अनुभवायला मिळाले. नंतर, मी इथल्या मराठी मंडळात सामील झालो आणि त्यानिमित्ताने बरीच मराठी माणसे भेटायला लागली आणि निदानपक्षी मराठी बोलायची हौस भागवता येऊ लागली. इथे तसे मराठी फार भेटत नाहीत. २००० नंतर, इथे बरीच मराठी माणसे यायला लागली. अजूनही संख्या फार तर २०० ते २५० कुटुंबे राहात आहेत. अर्थात त्यामुळे, इथे कार्यक्रम फारसे होत नाहीत, जसे अमेरिका, युरप किंवा दुबई, सिंगापोर इथे होतात. खरतर इथली मराठी माणसे, हा वेगळया निबंधाचा विषय आहे. हली, इथे आपल्या हिंदी चित्रपटातील बरेच कलाकार येत असतात, शुटींगच्या निमित्ताने किंवा गाण्यांच्या निमित्ताने. गेल्या काही वर्षात सोनू निगमचे इथे बरेच कार्यक्रम झाले आहेत. मी देखील दोनदा हा कार्यक्रम पहिला होता. माझे जे पूर्वी मत होते, ते या निमित्ताने पक्के झाले. इथे लोकांना फक्त "तालाशी" आवड आहे आणि तशीच आवड जपली आहे. "सूर" कसे आहेत, रचना कशी आहे, याकडे कुणाचेच लक्ष नसते. त्यामुळे, कितीतरी गाणी केवळ लयीच्या अंगाने ऐकण्यासारखी असतात, त्या गाण्यात देखील तालाचा भरमार उपयोग केला जातो आणि गाण्यांचा विचका!! अन्यथा इथे मनोरंजन म्हणजे मॉल्समध्ये भेटणे, तिथे गप्पा मारणे, कधीतरी सिनेमाला जाणे इतपतच असतो.

इथला सर्वात गंभीर प्रश्न आहे कायदा आणि सुरक्षा!! मला आजही आठवत आहे, १९९४ साली जेंव्हा साउथ आफ्रिका इथे आलो तेंव्हा, कितीतरी वेळा, मी मित्रांसह रात्रीचे बाहेर फिरायला जात होतो आणि तेंव्हा आमच्या मनाला कधीच सुरक्षिततेचा प्रश्न शिवला नव्हता. इथे १९९७ नंतर कायद्याचा प्रश्न अति उग्र स्वरूप धारण करायला लागला आणि अत्यंत अल्प काळात, कॅन्सरप्रमाणे सगळ्या देशाला विळखा घालून बसला. तरीही सुरवातीला, Robbing, Mugging इतपतच गुन्ह्याचे स्वरूप होते पण, इतक्या लगेच खुनांपर्यंत पोहोचले की जोहानसबर्ग, प्रिटोरिया तर सोडूनच द्या, पण डर्बन, केप टाऊन सारख्या शांत शहरात देखील त्याचा प्रादुर्भाव झपाट्याने झाला. संध्याकाळी उशिरापर्यंत समुद्र किनारी फिरणे जवळपास संपल्यातच जमा झाले!! अगदी मॉल्समध्ये देखील दरोडे, काही देखण्या मुलींवर बलात्कार अशा घटना नित्यनेमाने घडायला लागल्या. मुळातच समाजात स्वैर वागणूक पहिल्यापासूनच अस्तित्वात होती, आता त्या वृत्तीला वेगळेच खतपाणी मिळायला लागले.

इतके दिवस, मी रोजच्या वर्तमानपत्रात नेमाने बातम्या वाचीत होतो, तसा एक प्रसंग खुद्द माझ्यावर गुदरला होता. २०११ साली, फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यातील शुक्रवारी, सकाळी, मी, माझ्या ऑफीसमधील एक सहाध्यायाला बस स्टेशनवर ०८.०० सुमारास सोडायला गेलो होतो. त्याला मी सोडले, आणि परत गाडीत येऊन बसलो आणि कुणीतरी माझ्या डोक्यावर जोरदार प्रहार केला. त्या आघातात, माझा दावा पाय, गाडीच्या ब्रेकवर आपटला आणि ते हाड माझे कायमचे दुखावले गेले. जसा डोक्यावर प्रहार झाला, त्याक्षणी माझ्यावर हल्ला झाला, याची जाणीव झाली. त्याक्षणी, मी प्रसंगावधान राखून, मी ऑफीसमध्ये फोन करून हल्ल्याची बातमी कळवली आणि पुढील क्षणी माझी शुद्ध हरपली. त्यानंतर मला जाग आली ती, चार तासाने!! माझ्या ऑफीसमधील मित्रांनी मला अक्षरश: उचलून गाडीत घातले आणि आणले. मला, हा प्रचंड मानसिक धक्का होता. इतकी वर्षे, काही लोकांकडून, वृत्तपत्रातून बातम्या कळत होत्या पण आज, प्रत्यक्ष माझ्यावर असा जीवघेणा प्रसंग ओढवला होता. त्याही परीस्थित, संध्याकाळी, मी गाडी चालवत घरी आलो. घरी आल्यावर पायातील बूट काढले आणि अक्षरश: ब्रह्मांड आठवले!! तळपाय बटाटेवड्याप्रमाणे सुजला होता. पाय जमिनीवर टेकवत नव्हता. तशाच अवस्थेत, मी शेजारील एक भारतीय वंशाचा मित्र राहात होता, त्याला घरी बोलावले आणि सगळा प्रसंग सांगितला. तेव्हड्यात, त्याने. डोक्यातून मानेपर्यंत ओघळलेले आणि तोपर्यंत सुकलेला रक्ताचा ओघळ दाखवला आणि माझ्या मनात थोडेसे चरकलेच. त्या संध्याकाळी, लगेच त्याने त्याच्या शेजारील एक काळया माणसाला बोलावले आणि तळपाय Pain Killer Lotion लावून, बँडेजमध्ये बांधला!! रात्रीचे जेवण अर्थात, मित्रांच्या मदतीवर!! शनिवारी सकाळी, तसाच लंगडत, अंघोळ केली आणि त्याचा मित्रांबरोबर हॉस्पिटलमध्ये गेलो. तिथे, X-Ray काढला आणि झालेली जखम ही फक्त खरचटलेले आहे, यावर समाधान मानून परतलो.एव्हाना, घरी कळवायला लागले, कारण या मारहाणीत, हल्लेखोरांनी, माझ्या अंगावरून पाकीट पळविले होते. त्यात, भारतातील बँकेचे ATM Card, PAN Card होते. भारतीय रुपये देखील होते. एकूणच, हा सगळा मला जबरदस्त मानसिक धक्का होता आणि त्यातून सावरणे जरा अवघडच गेले.

तशातच पुढे, एप्रिल महिन्यात, अशाच एक शनिवारी,मित्राची वाट पहाट असता, माझ्याच Complex बाहेर दुपारी, तीन काळ्यांनी मला घेरले!! प्रसंग मी लगेच ओळखला. "Don't hit me or kill me!! Take whatever you want", इतकेच बोललो आणि अक्षरश: तीन मिनिटांत, त्यांनी

कार्यभाग साधला. परत एकदा, माझे पैशाचे पाकीट गेले!! तेंव्हा मात्र, मी मनानेच थोडासा खचलो!! लगोलग दोन महिन्यात, माझ्याच बाबतीत असे प्रसंग घडावेत, याचे संय्युक्तिक कारण सापडेना आणि मी भारतात परतायचा निर्णय घेतला. आता, हे सगळे माझ्याच बाबतीत घडावे, हा योगायोग!! Perhaps, I am the unfortunate victim!! असे सगळयांच्या बाबतीत घडते असे नाही. आता, माझाच मित्र मकरंद फडके, तिथे १९९२ पासून आजतागायत राहात आहे पण सुदैवाने त्याच्यावर असा अनुभव कधीच गुदरला नाही.

माझ्या मते, आपण भारतीय जरा "दिखाऊ" पद्धतीने वावरत असतो आणि ते सगळे तिथल्या काळयांच्या डोळयात येते. म्हणजे, मी असा दिखाऊपणा कधीच केला नव्हता पण असे जे प्रसंग इतरांवर गुदरतात, त्यामागे त्यांचा दिखाऊपणा, हे एक प्रमुख कारण असते. आपण जर का आपली राहणीमान मर्यादित स्वरुपात ठेवले आणि उगाचच सतत पार्ट्या, वगैरे प्रसंग साजरे केले नाही तर, शांतपणे आयुष्य काढता येते. अर्थात, माझ्यावर असे प्रसंग ओढवले म्हणून, साउथ आफ्रिकेला संपूर्ण दोष देणे चुकीचे ठरेल. असे प्रसंग मुंबईत घडत नाहीत का? मग इथे मी कशी कारणमीमांसा करेन? साउथ आफ्रिका, देश म्हणून खरेच अतिशय सुंदर, अप्रतिम आहे. भारतात ज्या सुखांना आपण वंचित असतो, तो सुखे तिथे सहज उपलब्ध होतात. भारताच्या मानाने, अधिक उंच स्तरावरील आयुष्य जगण्याची संधी विपुल प्रमाणात लाभते. आज इतकी वर्षे त्या देशात काढल्यानंतर, जर का माझ्या मनात हेच प्रसंग राहात असतील तर तो माझा कृतघ्नपणा ठरेल. त्या देशाने मला, आयुष्य कशाप्रकारे जगावे, हे नक्कीच शिकवले. आपले रोजचे जीवन हे सतत ताणतणावाचेच असते परंतू आठवड्याची अखेर ही कशा आनंदी प्रकारे करायची, हे मला साउथ आफ्रिकेने शिकवले. तसेच सर्वात महत्वाचे म्हणजे, वयाच्या ३५ वर्षांपर्यंत मी कधीच स्वयंपाक खोलीत पाऊल टाकले नव्हते पण, या देशात आल्यावर, आपले खाणे-पिणे हे आपल्यालाच करायला लागणार, तेंव्हा जेवण बनविणे, हे मला शिकावेच लागले. सुरवातीला बऱ्याच गमती-जमती झाल्या पण लवकरच सगळे अंगवळणी पडले. तसेच घरातील खर्चाचे नियोजन, हा भाग शिकायला मिळाला. जेवण बनविणे, सुरवातीला फारच त्रासदायक पण नंतर खूपच आनंददायी वाटायला लागले. इतके की नंतर तर मी बिर्याणी सारखे खास पदार्थ आवडीने करण्याइतके प्राविण्य मिळविले.

तिथे एकटाच राहात असल्याने, वाचनाची आवड संपूर्णपणे भागवता आली आणि संगीताचा छंद बराच वाढविता आला. आता उदाहरणच द्यायचे झाल्यास, आपल्या शास्त्रीय संगीतात, प्रत्येक रागाचा समय दिलेला आहे पण त्याचा नेमका प्रत्यय घ्यायचा, या उद्देशाने, मी सकाळचे राग संध्याकाळी तर रात्रीचे राग दुपारी ऐकायचे,असे प्रकार करायला लागलो, त्यातूनच माझी सांगितिक दृष्टी विस्तारित झाली. तसेच काही गोऱ्या लोकांच्या संगतीने, पाश्चात्य संगीताबद्दल बरेच शिकायला मिळाले, विशेषत: Jazz, Symphony हे संगीत कसे ऐकायचे, त्यातील नेमका उत्तम भाग कुठला, याची जाणीव झाली. एकदा डर्बन तर त्या आधी प्रिटोरिया इथे चक्क Philharmonic Orchestra हे कार्यक्रम प्रत्यक्ष बघितले. काही उत्तम इंग्रजी कादंबऱ्या मिळाल्या. ह्या गोष्टी मला भारतात राहून नक्कीच जमल्या नसत्या. मुळात, संपूर्ण वेगळया समाजाशी ओळखी झाल्या आणि सुदैवाने अजूनही मी त्यांच्याशी फेसबुकवर संपर्कात आहे. त्यामुळे, व्यक्तित्व विकास सारखे जडजम्बाल शब्द न वापरता, माझी विचार करण्याची वृत्ती अधिक विस्तारली. हे सगळे साउथ आफ्रिकेने मला शिकवले आणि तेही कुणाशी न मागता!! ही माझ्या आयुष्यातील फार मोठी जमेची बाजू आहे. अर्थात, त्याबद्दलची मोजावी लागणारी किंमत बरीच होती, पण ते इथे नको!!

**कातरवेळच्या गप्पा** — **श्रीपाद पु. कुलकर्णी**



माझ्या घुमटाकार झालेल्या डोक्याच्या परिघावरून कानांवर ओसंडणाऱ्या केसांना आळा घालण्यासाठी "शिरपेच केशकर्तनालयात" पाऊल टाकताच त्याचे मालक बोबडे यांनी अघळपघळ स्वागत केलं.

"या साहेब, खूप दिवसांनी."

मी : केस वाढायला जेवढे दिवस लागले.. अन् वाढण्यासाठी केस तरी पाहिजेत ना?

बोबडे : (बळेबळे जोरात हसून) साहेब माझ्याकडे एक जालीम औषधी तेल आहे. हा फोटो पाहिलात?

मी : हा पाठमोऱ्या टकलाचा?

बोबडे : हं.. अन् तो दुसरा फोटो त्याच टकलाचा.. आमचं तेल वापरल्यानंतरचा.

मी : (फोटो बघून..) काय? त्याला केसांची पोनी बांधायला लागली?

बोबडे : असं काय करता साहेब? तो उजवीकडचा फोटो फक्त इस्टाईलसाठी. तुम्ही तो डावीकडचा फोटो बघा. दिसतायत का केसांचे ठिपके टकलावर?

मी : पण महाग असेल ना ते तेल?

बोबडे : तुम्हांला कसं महाग देऊ? तुम्ही रमेशचं गिऱ्हाईक.

मी : ठीक आहे.. विचार करून सांगतो.

बोबडे : म्हणजे आपोआप केस येतायत का बघणार म्हणा की.

चला बसा या खुर्चीवर.

- बोबडे असं बाह्या सरसावत बोलल्यावर मी म्हटलं, "काय मालक आज जातीनं करणार का आमची?"

"जातीवर जाऊ नका साहेब.. हाऽहाऽहाऽ.." स्वत:च्याच पी.जें.वर बोबडे खूश झाले.

मी : म्हणजे तुमचा तो नेहमीचा कारागिर वाटला दिसत नाही.

बोबडे : त्यालाच वाट दाखवली.. फ्रॉडिश निघाला..

मी : तुम्हाला डँबिस म्हणायचंय का?

बोबडे : तेच ते! हिशेबात घोटाळा केला अन् जादा कमाई खाल्ली त्याला काय म्हणणार? पुन्हा स्वत:ची खास गिऱ्हाईकं नंबरात पुढे काढायचा गर्दीच्या टायमाला. म्हटलं आपण, हातात पाण्याची वाटी घेऊन अन् वस्तरा पारजून गिऱ्हाईकांची मुंडकी नाचवणारे अन् त्यावर कमावणारे. पण याला इमानाचं वाकडं तर मग म्हटलं उलथ. घेतली काढून पाण्याची वाटी आणि घेऊन फिर म्हटलं हातात उताणी करवंटी.

मी केशकर्तनासाठी खुर्चीवर बसून मान खाली घालून बोबडेंच्या तोंडातून कापलेल्या केसांसारख्या टपटपा गळणाऱ्या, शिव्या कानावर झेलत होतो. लगेच वेळ न दवडता त्याच आवेशात बोबडेंनी माझ्या शर्टाची वरची दोन बटणं ओरबाडली अन् एक श्वेतवस्त्र झटकून सरळ माझ्या मांडीवरून वर गळ्यापर्यंत सरकावून माझ्या मुसक्या बांधल्या.

एकदम माझं लक्ष समोरच्या आरशात दिसणाऱ्या टी.व्ही.कडे गेलं. बोबडेंना म्हटलं, "हे काय मालक, नवीन टी.व्ही.. गिऱ्हाईकांची करमणूक वाटतं! पण तुमचं लक्ष गेलं तिकडे केस कापता कापता, तुमच्या डोळ्यात ठसायचं मल्लिका शेरावतचं नर्तन अन् मग भरकटायचं तुमचं केशकर्तन."

बोबडे : नाही साहेब. आम्ही त्याच्यावर एक सी.डी. दाखवतो.. हेअरस्टाईलची. बघा ते दोन-तीन फोटो सोडले तर एक तरी फोटो आहे का आमच्या हेअरस्टाईलचा? म्हणून एक सी.डी.च करून आणली नटांची आणि मॉडेल्सची. आता तुमचं कटिंग कसं करायचं हे आम्हाला माहिती आहे म्हणून नाही लावली.

मी : माझ्यासाठी बघायची असेल तर..?

बोबडे : मग आहेत नं त्यात मॉडेल्स.. राघवेंद्र कडकोळ, सुरेश वाडकर.. अनुपम खेर..

मी : (वरमून) बरं.. बरं.. माझं आपलं नेहमीप्रमाणेच करा म्हणजे झालं.. कडेलाच कात्री लावायची. मानेवर वर्तुळाकार.. वर काय आपलं टेबललँडच आहे.

हे बोलताना मी स्वत:शीच हसलो. बोबडेंची नजर हातातल्या कंगव्याच्या दातेऱ्यांमधून माझ्या स्मितहास्यावर पडलीच.

बोबडे : का हो, हसलात का ते?

मी : अहो पाचगणीच्या टेबललँडवर गेलेलं असताना माझ्या पुतण्यानं माझा असा क्लोज अप घेतलाय कॅमेऱ्यात की तो फोटो आता मी 'टेबललँड' म्हणून दाखवू शकतो.

बोबडे मन लावून माझ्या टाळूवर कंगवा फिरवत राहिले. आहेत ते केस तसेच गळून जाताहेत का बघत असावेत अन् ते गंभीरपणे बोलले, "तुम्हांला सांगतो साहेब. ते तेल लावून बघाच."

तेवढ्यात एक चुणचुणीत मुलगा दारात स्कूटी लावून आत आला अन् बोबडेंना म्हणाला., "किती वेळ लागेल?"

बोबडे : हे आता होईल.. बस तिथं.. काय रे वय काय तुझं?"

मुलगा : अकरा.

बोबडे : (मला उद्देशून) बघितलं साहेब.. या एवढ्याशा मुलाच्या हातात फटफट्या देऊन पालक निर्धास्त राहतात.. (मुलाला) का रे बाळ कटिंग करायची ना?"

मुलगा : मग काय दाढी करायला आलो..?

- मुलगा मस्करीच्या मूडमध्ये होता अन् बोबडेंच्या चेहऱ्यावर 'काय आगाऊ कार्ट आहे' हा भाव लपत नव्हता.

मी : मालक, टी. व्ही.  लावा की.. कढछ चे क्रिकेटचे सामने लागले असतील.. जरा, पाहू दे कोण कोण खेळतंय.

बोबडे : या क्रिकेटनं एक जगाला वेडं करून सोडलंय बघा. माझा छोकरा अवघा सहा वर्षांचा आहे. त्या 'थिल्लर मुली' नाचायला लागल्या की हे बेणपण उशा हातात घेऊन नाचायला लागतं.

मी : छान! तुम्ही तेवढ्यापुरतंच बघता की काय हे सामने?

बोबडे : छे हो! आम्हाला काय तेवढाच उद्योग आहे का? पण हे क्रिकेटचं वेड सगळीकडे साथीच्या रोगासारखं पसरलंय बघा. आमचं इथून जवळच गाव आहे.. तिथं तर.. (टी.व्ही. चालू करता करता पुढे..) बायकांचेपण दोन संघ तयार झालेत.

मी : (आश्चर्यानं) असं! गाव भयंकर प्रगत दिसतंय तुमचं.

बोबडे : शहराचं वारं लागलंय यांना कामाला येऊन जाऊन करून. मग टुम निघाली वावरात लेडिज क्रिकेटची तालिम करायची.

मी : वा! पण मग संघ जमले तरी कसे?

बोबडे : एक आहे 'इंदीचा पापड लाटणाऱ्यांचा' संघ.. म्हणजे आय. पी. एल.! त्या सगळ्या शहरात एके ठिकाणी पापड उद्योगात काम करतात आणि दुसरा आहे 'मंदीचा पोळया लाटणाऱ्यांचा' संघ म्हणजे एम. पी. एल.! त्या शहरात येऊन घरोघरी पोळया  अन् स्वयंपाकाची कामं करतात.

मी : मग सामना..?

बोबडे :  रंगला की गेल्या आठवड्यात.

मी : मग काय 'चिअर्स बॉईज्' नाचले असतील गावातले सामन्याच्या वेळी ?

बोबडे : छे! मग शिट्ट्या मारत कल्ला कोण करणार ? याच दिवशी देवीची जत्रा पण होती गावात. अंगात आलेल्या चार-सहा बायकांना हातात

झाडपाला देऊन तिथं आणून सोडलं होतं. त्याच घुमत नाचत होत्या.

- बोबडे काम झालेली कात्री नाचवत बोलले अन् वस्तरा पारजून माझ्या कल्ल्यावर स्थिरावले. मी मनात असून हसू शकत नव्हतो. नाहीतर मानेवरनं रस्ता कापणाऱ्या वस्तऱ्यानं 'शॉर्टकट्स' घेतले असते.

- यथास्थित सर्व झाल्यावर समोरच्या आरशात आणखी एक आरसा दिसला.. माझ्या डोक्यामागे बोबडे तो घेऊन उभे होते. त्यांनी माझ्या डोक्यामागे त्या 'टकलाचा' फोटो धरला असता तरी मला काही कळलं नसतं. कारण केशकर्तनासाठी चष्मा काढून ठेवला होता. मग ते श्वेतवस्त्र उतरवलं तसा शर्ट सारखा केला आणि उठलो. उपचार म्हणून बोबडेंनी पुढे केलेला कंगवा मी माझ्या विराण माथ्यावरून फिरवल्यासारखं केलं अन् विचारलं, "किती द्यायचे?"

बोबडे : तीस रुपये.

मी : अहो, २५ रुपये ना?.. की कापण्यासाठी केस शोधण्याचे ५ रु. जास्त घेताय ?

बोबडे : (हसून) दर वाढल्यावर पहिल्यांदा येताय साहेब तुम्ही. तेवढ्यात बोबडेंचा पोलिसी वर्दीतला एक मित्र आत आला अन् बोबडेंपुढे उभं राहून उद्गारला.

दर वाढवले? कटिंगचे किती ३० रुपये अन् शेव्हिंगचे २० रुपये.. मग गड्या आपल्या डोक्याची शेव्हिंगच कर ना."

बोबडे : अरे लेका, तुमचे बापलेकसुद्धा आमच्यापुढे माना खाली करून बसतात. तू काय चेष्टा करतो माझी ?

- त्यावर बोबडेंचा तो मित्र त्यांच्यापुढे शर्ट काढून उभा राहिला. बोबडेंनी वस्तरा हातात घेतला अन् त्याच्याकडे वळून उद्गारले,

"डोकं भादरून झाल्यावर पैसे द्यायची वेळ आली की तुम्ही 'काखा' वर करून मोकळे होणार.. त्यापेक्षा अशा खऱ्या 'काखा' वर करून उभा राहा. गपगुमान. फुकटात तेवढंच परवडेल मला."

संपर्क :

**श्रीपाद पु. कुलकर्णी**

सी २१, सुयोग आदित्य रेसिडेन्सी नं २

बिबवेवाडी, पुणे ४११०३७

फोनः ०२० २४२१८४२१

## नेटीव्ह जनरल लायब्रेरी ते वाचन मंदिर भिवंडी. १५० वर्षांची जख्खड म्हातारी ________________ दीपक पळसुले

दिसामाजी काहीतरी थोडे लिहावे/प्रसंगी अखंडीत वाचीत जावे//

असं समर्थ रामदासांनी सांगितलं आहे.त्याचप्रमाणे अनेक थोरामोठ्यांनीच लेखन आणि वाचनाचं महत्त्व अधोरेखित केलं आहे.लेखन प्रत्येकजण करेल असं नाही पण, निदान वाचनाचा छंद तो स्वतःला जाणीवपूर्वक लावून घेउ शकतो.वाचनाची आवड असलेल्या माणसाला एकटेपणा कधाही जाणवत नाही की,असह्य होत नाही.वाचनाने संस्कृतता,सहिष्णूता माणसाच्या अंगी अगदी वाऱ्याच्या स्पर्शासारखी लागते आणि त्याची सुखद जाणीव इतरांना दिसून येते.

एकंदरीतच काय 'पुस्तक' आपला 'मित्र' असतो आपण म्हणवतो.आणि अर्थातचं मित्राला भेटायची जागा म्हणजे कट्टा,नाका..पण या मित्राला भेटायाची जागा म्हणजे वाचनालयं..तसा भेटू शकतो इतर ठिकाणी..पण त्यातल्या त्यात बरं आणि मोक्याची जागा म्हणजे तीच..हे जे काही लिहीतो आहे ती कथा आहे ती भिवंडीतल्या एका जख्खड म्हातारीची जी यावर्षी १५० वर्षांची झाली आहे.तुम्ही म्हणाल की १५० वर्ष जगलेली म्हातारी, अर्थातच वाचन मंदीर भिवंडी,सगळयात जुनी लायब्रेरी...मग तिची नोंद गिनीज बुक आॅफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद असावी. पण हेच तर या देशाचं दूर्दैव आहे की चांगल्या गोष्टींची किंमत त्या नाहीशा झाल्या की कळते. सद्ध्या दळणवळणाची इतकी साधनं उपलब्ध आहेत की,मुंबई-पुणे,मुंबई-दिल्ली काहीच अंतर वाटत नाही.पण १८६३साली इंग्रजांची राजवट असताना आणि बाहेरच्या जगाशी गंधवार्ताही नसताना इतकचं काय पण साधी दमडी खिशात (किंवा आताच्या मराठी भाषेत स्पॉन्सरर) नसताना ग्रंथालय सुरू करण्याची कल्पना प्रत्यक्षात आणणे हे नक्कीच कौस्तुकास्पद आणि धाडसीसुद्धा आहे.

त्याकाळी प्रथम चारआणे-आठ आणे जे आता पहायला सुद्धा मिळत नाहीत एवढ्या वर्गणीवर सुरू करण्यात आली.त्यावेळी तिचं नावं नेटीव्ह जनरल लायब्रेरी असं ठेवण्यात आलं,पूढे १९३९ साली तेच नावं भिवंडीकरांसाठी बदलुन वाचन मंदीर भिवंडी असं ठेवण्यात आलं.यानंतर वाचनालयाचा कारभार कर्वे यांच्यावाड्यात होता,नंतर प्रभू आळीत दूर्वे यांच्या वाड्यात ते हलवण्यात आले.आज आता दुर्वे यांच्या जागेत भिवंडीतील आंबेडकर वाचनालय उभे आहे. १८७३ ते १९३३ अशी तब्बल साठ वर्ष हे वाचनालय याच जागेत उभं होतं.यावेळी त्याची ग्रंथसंख्या ३६१ आणि सभासद संख्या ३३ अशी बरीच म्हटली पाहिजे.पुढे १९१७ साली मयुरेश मोफत वाचनालय या नावाने दुसऱ्या एका वाचनालयाची स्थापना झाली.पुढे आर्थिक महामंदीच्या काळात वाचनालय बंद पडतं की काय असा प्रश्न पडला असताना, वाचन मंदिर आणि मयुरेश वाचनालय विलीनीकरण झाले.यासाठी पुढाकार घेणारे तत्कालिन चिटणास केशव कर्वे यांच्या प्रयत्नाने वाचन मंदिराची भरभराट झाली असं म्हटल्यासं वावगं ठरू नये.वाचन मंदिराची एकंदरीत प्रगती पाहून त्यास सरकारमान्यता मिळाली.यानंतर वाचन मंदिराची उतोरत्तोर प्रगती झाली.याच दरम्यान संस्थेची घटना तयार केली गेली.यानंतर ६ मार्च १९६३ साली वाचन मंदिराचं शतक महोत्सवी वर्ष मोठ्या दिमाखात साजरं केलं गेलं. १९७१ साली ब्राह्मण आळी येथे करमरकर बंधूनी वाचनालयाला जागा दिली.या ठिकाणी रोवलेल्या बिजाचे आज दोन मजली भव्य इमारतीत रूपांतर झाले असून ६ मार्च रोजी वर्धापन दिन आणि १० ऑक्टोबरला इमारतीचा वर्धापन दिन साजरा केला जातो.त्याचबरोबर शारदीय व्याख्यनमालेसारखे अनेक उपक्रम हे वाचन मंदिर राबवत असून केवळ वाचक नाही तर माणसंही जोडण्याचं आणि तयार करण्याचे काम या मंदिराने केलं आहे.

आजमितीली वाचनालयात ५०००० हून अधिक पुस्तके असुन,नियतकालिके आणि वृत्तपत्रे हा खजिना वेगळाच आहे.तसेच नंतरच्या जडणघडणीच्या काळातले दोन डबे आहेत ते म्हणजे संस्थेचे माजी अध्यक्ष कै.दिनकर उर्फ आबासाहेब कुंटे आणि गेली ४५ वर्षे आजूनही ग्रंथपाल म्हणून काम करणारे शरद मराठे.यांच्यासारखे खंदे कार्यकर्ते संस्थेला लाभण हा त्या वाचनालायाचा गौरवच म्हणायला हवा. काळाचे सर्व आघात

पचवून या नेटीव्ह जनरल लायब्ररीचा प्रवास १५० वर्षानंतर वाचन मंदिर भिवंडी या नावाने अद्याप सुरू असून आत्ताच शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्ष तिने पाहिले.यात अनेक उपक्रम राबवले गेले कोणतंही ग्लॅमर न आणता.हा १५० वर्षांचा प्रवासावरचा हा एक पानी लेख पूर्ण करताना काही गोष्टी राहून जातील त्या अधोरेखित करणे गरजेचे आहे.कारण सुसंकृत म्हणवणाऱ्या महाराष्ट्रात फारचं कमी मंदिर आहेत जिथे देवाचे दर्शन रांगे शिवाय मिळतं आणि पासाशिवाय दिलं जातं त्यामुळे ही आम्हा भिवंडीकरांसाठी अभिमानाची बाब आहे ती म्हणजे ठिणगी पडताच पेटणाऱ्या भिवंडीत एक असाही ज्ञानाच्या कोर्ट आहे जिथे फक्त आणि फक्त माणूसचं घडवला किंबहूना घडवला जातो...

**पौर्णिमा** — **सौ .राजश्री रवींद्रनाथ जाधव**

पौर्णिमा! पुनव..पूर्णता..परिपूर्णता! थोडीशी देखील कमतरता नाही जिच्यात...म्हणजेच संपूर्णता ! फार सुंदर आणि मोठी अशी ही अवस्था ! जिचे आकर्षण चिरंतन आहे..गूढ आहे ! चन्द्रमा पूर्णत्व पावतो ते सोळा कलांच्या पायऱ्या पार करूनच या स्थितीपर्यंत पोचतो... थोडीशी देखील कमतरता नाही जिच्यात..चंद्र संपूर्ण दिसतो..सर्व कला पूर्ण असतात त्याच्या. तसं पाहिलं तर बीजेची ,चवथीची चंद्रकोरही देखणी असते. पण सौंदर्याची संपूर्ण खुलावट ही पूर्णचंद्रातच आढळते. समुद्राला उधाण येते ते पूर्ण चंद्रामुळेच ! ज्या तिथीला चंद्रमा स्वतः या पूर्णत्वाने खुलून उठतो त्या पौर्णिमेचे माणसाच्या जीवनात अत्यंत महत्वपूर्ण स्थान आहे. पूर्ण चंद्रावर मनुष्य मनापासून प्रेम करतो. एका अर्थी जीवनाचा आनंदमय ,सुखपूर्ण आदर्श म्हणून या गोष्टीकडे पाहण्याचा विवेकही मनुष्याकडे असतो. त्यामुळे पौर्णिमेबद्दल असणारा आदर,उल्हास,आनंद या गोष्टी पौर्णिमेनिमित्त भारतातील निरनिराळ्या भागात साजऱ्या होणाऱ्या उत्सवांमधून ,सणांमधून दिसून येतात . या एकूण १२ पौर्णिमांचे, त्यांच्या विविध पैलूंचे आणि रूपाचे दर्शन मोठे विलोभनीय असेच आहे...पाहू या का आपण ते कसे आहे ते ? ...

चैत्र पौर्णिमा ...

चैत्रपौर्णिमा हा दिवस भारतामध्ये हनुमान जयंती म्हणून साजरा होतो. या चैत्र शुद्ध पौर्णिमेस सूर्योदयाच्या सुमाराला हनुमंताने अंजनीच्या पोटी जन्म घेतला. जवळजवळ प्रत्येक शहरात आणि गावात असलेल्या हनुमानाच्या देवळांमध्ये सूर्योदयाच्या समयी हनुमानाचा जन्मोत्सव साजरा केला जातो. शक्तीचे उपासक असलेले मारुती हे दैवत ! त्यामुळे युवकवर्गाकडून तालमींच्या आखाड्यात ही साजरा केला जातो. कुस्त्या आणि नंतर विजयी वीरांची मिरवणुक निघते. हनुमंताच्या या जन्मदिवशी सामाजिक स्तरावर कीर्तने ,पूजा, भजने इ कार्यक्रम होतात. या दिवशी उपवास केला जातो.चैत्र पौर्णिमेला महाराष्ट्रात आणि देशाच्या इतरही प्रांतात निरनिराळ्या देवतांच्या यात्रा भरतात. वाडी रत्नागिरीच्या ज्योतिबाच्या यात्रेत लाखो लोक सहभागी होतात. ज्योतिबाची पालखी या दिवशी मिरवीत आणतात . देवाच्या पालखीपुढे अनेक ठिकाणांवरून आलेल्या मानाच्या काठ्या नाचविल्या जातात. ह्या काठ्या उंच ,सरळ वेळूच्या आणि लाल -पांढऱ्या पागोट्या आणि काळया-पांढऱ्या तुरयाचा झुपका बांधलेल्या असतात. ही भली मोठी काठी खांद्यावर घेऊन नाचविता यावी म्हणून खालून तिला एक आडवी लाकडी फळी जाम बसवलेली असते . या फळीवर काहीजण देवाची मुर्तीही बसवतात. मग, पालखी निघाली कि तिच्यावर गुलाल आणि खोबरे यांची उधळण होते, आणि हे खोबरे प्रसाद म्हणून उचलण्यासाठी भाविकांची मोठी धांदल उडते. "ज्योतिबाच्या नावे चांगभलं ! चांगभलं बोला चांगभलं ! असा जयजयकार केला जातो. या यात्रेच्या वेळी दवणा नावाची सुगंधी ,औषधी वनस्पती देवाला वाहण्याची ,सर्वांना ती प्रसाद म्हणून देण्याची पद्धत आहे. याला "दमनार्पण" असे म्हणतात. दवणा आणून त्याची पूजा करून तो जतन करून ठेवणे, देवास अर्पण करणे असा हा विधी असतो. चैत्र शुद्ध द्वितीयेस शंकरपार्वतीला, चतुर्थीला गणेशाला, षष्ठीस कार्तिकस्वामीला, सप्तमीस सूर्याला, नवमीस देवीला, द्वादशीस विष्णूला, त्रयोदशीस महादेवाला, आणि मग पौर्णिमेला सर्वच देवांना वाहतात.,

जेजुरीच्या तसेच पालीच्या ,मंगसुळी (बेळगाव) येथील भरणारी खंडोबाची यात्रा देखील प्रसिद्ध आहे. 'येळकोट येळकोट ! जय मल्हार !' असा खंडोबाचा जयजयकार ,भंडारा आणि खोबऱ्याची उधळण ,वाघ्यामुरळी नाच गाणी, नमन, पूजन, आरती, खंडोबाचे वर्णन करणारी गीते ..ही या उत्सवातील वैशिष्टे ! शिखर शिंगणापूरच्या महादेवाची यात्रा चैत्र शुद्ध पंचमीला सुरु होते. आणि ती पौर्णिमेपर्यंत चालते. हा महादेव छत्रपती शिवरायांचे आणि अनेक घराण्यांचे कुलदैवत! शहाजीराजांना याच महादेवाचा दृष्टांत आणि आशीर्वाद प्राप्त होऊन त्यांनी जरी पटक्या बरोबर भगवा झेंडाही प्रसाद म्हणून स्वीकारला . या महादेवाच्या यात्रेबद्दल असे सांगतात की शंकर पार्वती सारीपाट खेळत असताना दोघात रुसवा निर्माण झाला. मग कैलासावरून निघालेल्या शंकराने इथे या शिंगणापुरी मुक्काम केला. नंतर पार्वती शोध घेत आली आणि पांडुरंगाच्या मध्यस्थीने त्यांच्यात समेट झाला.त्यांच्या विवाहाचा उत्सव येथे साजरा करतात. चैत्र शुद्ध पंचमीला देवांना हळद लागते. अष्टमीला मध्यरात्री विवाह सोहळा होतो. या यात्रेचे वैशिष्ट म्हणजे भाविक कावडीने पाणी आणून त्याचा पिंडीवर अभिषेक करतात.या कावडीत सर्वात प्रसिद्ध आहे ती म्हणजे भुत्या -तेल्याची कावड..येथील डोंगरात मुंगी घाट म्हणून प्रसिद्ध असलेल्या अवघड घाटातून भुत्या तेली या महादेवाच्या भक्ताची कावड आजही त्यांचे वंशज वर आणतात .चतुर्दशीला शिंगणापूरचा दवणा ज्योतीबाला एका उंटावरून जातो.आणि हा दवणा ज्योतीबाला पोचल्याशिवाय ज्योतिबाची

पालखी निघत नाही. कर्नाटकात बेळगाव जवळ सौदत्तीच्या यल्लमाची मोठी यात्रा भरते.लाखोंनी आलेले भाविक देवीला नवस फेडतात.देवीची पालखीही मोठ्या हौसेने मिरवितात. देवीचे दर्शन घेऊन तृप्त होतात. गोव्यात चैत्र पौर्णिमेला साखळी येथे श्री पांडुरंग यात्रा भरते. पारोड्याला चंद्रेश्वर आणि बांदिवड्याला नागेश यात्रा भरते. जैन लोक याच चैत्र पौर्णिमेला शत्रुंजय पर्वत, संमेद शिखर, गिरनार आणि अबूचा पहाड या ठिकाणची यात्रा करतात.याच चैत्र पौर्णिमेला वैशाख स्नानाला प्रारंभ होतो.

वैशाख पौर्णिमा...

चैत्र शुद्ध पौर्णिमेला सुरु झालेल्या वैशाख स्नानाची समाप्ती ही वैशाख पौर्णिमेला होते. बौद्ध लोकांना या पौर्णिमेचे विशेष महत्व वाटते कारण या तिथीला भगवान गौतम बुद्धाचा जन्म झाला. याच तिथीला त्यांना ज्ञानप्राप्ती होऊन त्यांचे महानिर्वाण देखील याच तिथीला झाले. शुक्ल पक्षात चंद्र पुष्य नक्षत्रात असताना बुद्धाच्या प्रतिमेची मंदिरात स्थापना करतात. तीन दिवस देवाला नैवेद्य दाखवितात. आणि दान धर्म करतात. वैशाखी पौर्णिमेचे महत्व पंजाबी लोकांनाही आहे. हा दिवस पंजाबी लोक नववर्ष दिन म्हणून साजरा करतात. शीख धर्माच्या स्थापनेचा हा दिन असल्याने त्यांच्या दृष्टीने पवित्र आणि मंगल असा हा दिवस आहे. हलवा, जिलेबी,शिरा अशी पक्वान्ने बनवली जातात. भांगडा नृत्य आणि गायनाचा आनंद लुटतात.अमृतसर ला सुवर्ण मंदिराच्या भोवती असलेल्या तलावात स्नान करून पवित्र होऊन भाविक मंदिरात दर्शनासाठी जातात. शीख लोकांचे सर्वकाही असलेल्या 'ग्रंथ साहेबा'पुढे आदर आणि भक्तीभाव व्यक्त करतात. वैशाख पौर्णिमा ही तिथी नृसिंहजयंती म्हणून ओळखली जाते. हिरण्यकश्यपूने कठोर तपश्चर्या करून ब्रम्हदेवाकडून मनुष्य, पशु, पक्षी, नाग वगैरे प्राणी किंवा देवता यांचेकडून तसेच घरात किंवा घराबाहेर, दिवसा किंवा रात्री मृत्यू येऊ नये असा विलक्षण वर मिळवला. या वरामुळे हिरण्यकश्यपू उन्मत्त होऊन लोकांना त्रास देऊ लागला. हिरण्यकश्यपूचा मुलगा प्रल्हाद मात्र विष्णूचा भक्त असल्यामुळे त्याचाही हिरण्यकश्यपू अतोनात छळ करू लागला. प्रल्हादाला कड्यावरून ढकलून दिले, उकळत्या तेलाच्या कढईत टाकले पण भगवान विष्णुने आपल्या भक्ताचे रक्षण केले. भक्त प्रल्हादाच्या नारायण भक्तीने संतापून त्याचे वडील हिरण्यकश्यपू महालातील खांबावर लाथ मारून प्रल्हादास विचारतात, की 'या खांबात तुझा नारायण आहे का?' त्यावेळी काडकन आवाज होऊन तो खांब दुभंगतो आणि नृसिंहाच्या रूपाने साक्षात नारायणच प्रगटतो. ब्रम्हदेवाने हिरण्यकश्यपूला दिलेल्या वरातून अचूक पळवाट काढून भगवान विष्णूंनी नर-सिंहाच्या रूपात दिवस रात्रीच्या संधीकाळात, दरवाज्यात हिरण्यकश्यपूचा वध केला व त्यामुळे सर्वत्र आनंदी आनंद झाला.

ही घटना वैशाख पौर्णिमेला घडली. म्हणूनच या दिवशी नृसिंहजयंतीचा उत्सव जोरात उत्साहात साजरा केला जातो. भक्त लोक या दिवशी नरसिंहाची पूजा करून उपवास करतात. रात्री कथा श्रवण करतात.भजन, कीर्तन आणि श्रवण करून आनंदी होतात. ज्यांचे कुलदैवत नृसिंह आहे त्याच्याकडे नृसिंहनवरात्र आणि समाप्तीच्या दिवशी ही जयंत साजरी होते.

जेष्ठ पौर्णिमा ...

जी व्यासपूजा आषाढ पौर्णिमेला होते तीच सर्वत्र होते. तामिळी लोक याच दिवशी व्यासपूजा करतात. ही पौर्णिमा जास्त करून ओळखली जाते ती म्हणजे "वटपौर्णिमा" म्हणून ! या दिवशी स्त्रिया वटवृक्षाची पूजा करतात. त्या जे व्रत आचरतात त्यालाच वट सावित्रीचे व्रत असे म्हणतात. . हे व्रत सुवासिनी अपल्या पतिला उत्तम आरोग्य लाभावे, दीर्घायुष्य प्राप्त व्हावे म्हणून करतात.सतीशिरोमणी सावित्री हे पतिव्रतेचे आदर्श असे उदाहरण ! या सावित्रीची स्मृती भारतीय स्त्रियांनी आजपर्यंत जागृत ठेवली आहे. याबाबतची कथा अशी आहे.."अनेक वर्षापूर्वी भद्र देशात अश्वपती नावाचा राजा राज्य करीत होता. त्याला सावित्री नावाची कन्या होती. सावित्री अतिशय सुंदर, नम्र व गुणी मुलगी होती. सावित्री उपवर झाल्यावर राजाने तिलाच आपला पती निवडण्याची परवानगी दिली.सावित्रीने सत्यवान नावाच्या राजकुमाराची निवड केली. सत्यवान हा शाल्व राज्याचा धृमत्सेन नावाच्या अंध राजाचा मुलगा होता. शत्रूकडून हरल्यामुळे आपल्या राणी व मुलासहित राजा जंगलात राहत होता. भगवान नारदाला सत्यवानाचे आयुष्य केवळ एक वर्षाचेच माहित असल्यामुळे त्यांनी त्याच्याशी लग्न करू नको असा सल्ला सावित्रीला दिला.पण सावित्रीने ते मान्य केले नाही. तिने सत्यवानाशी विवाह केला. व जंगलात येऊन नवऱ्याबरोबर सासू सासऱ्याची सेवा करू लागली.सत्यवानाचा मृत्यू जेंव्हा

तीन दिवसावर येऊन ठेपला तेंव्हा तिने तीन दिवस उपवास करून सावित्री व्रत आरंभिले. सत्यवान जंगलात लाकडे तोडण्यास निघाला असता सावित्री त्याच्या बरोबर गेली. लाकडे तोडता तोडता त्याला घेरी आली व तो जमिनीवर पडला. यमधर्म तिथे आला व सत्यवानाचे प्राण नेऊ लागला. सावित्री यमाच्या मागे आपल्या पतीबरोबर जाऊ लागली. यमाने अनेक वेळा सावित्रीस परत जाण्यास सांगितले. पण तिने साफ नाकारले व पतीबरोबर जाण्याचा हट्ट धरला. अखेर कंटाळून यमाने पती सोडून तिला तीन वर मागण्यास सांगितले. सावित्रीने सासूसासऱ्याचे डोळे व राज्य परत मागितले व आपल्याला पुत्र व्हावा असा वर मागितला. यमराजाने गफलतीने तथास्तु म्हटले. तेंव्हा त्या वचनबध्द झाल्याची आठवण झाली व सत्यवानाचे प्राण परत करावे लागले. “यमधर्माने सत्यवानाचे प्राण हरण केल्यावर सावित्रीने यमधर्माशी तीन दिवस शास्त्रचर्चा केली. त्यावर प्रसन्न होऊन यमधर्माने सत्यवानाला पुन्हा जिवंत केले. ही चर्चा वटवृक्षाच्या झाडाखाली झाली; म्हणून वटवृक्षाशी सावित्रीचे नाव जोडले गेले. सावित्रीप्रमाणेच आपल्या पतीचे आयुष्य वाढावे म्हणून स्त्रियांनी या व्रताची सुरुवात केली.सत्यवानाचे प्राण सावित्रीने वडाच्या झाडाखालीच परत मिळविले म्हणून ज्येष्ठ महिन्यात पौर्णिमेला स्त्रिया वडाच्या झाडाची पूजा करून उपवास करतात व सावित्री व्रत आचरतात.वटवृक्ष हा शिवरूपी आहे. शिवरूपी वटवृक्षाची पूजा करणे, म्हणजे वटवृक्षाच्या माध्यमातून शिवरूपी पतीलाच एकप्रकारे स्मरून, त्याचे आयुष्य वाढून त्याची आयुष्यातील प्रत्येक कर्माला साथ मिळावी, यासाठी ईश्वराची पूजा करणे. ज्या वेळी वटवृक्षाच्या खोडाला सुती धाग्याने गुंडाळले जाते, त्या वेळी जिवाच्या भावाप्रमाणे खोडातील शिवतत्त्वाशी संबंधित लहरी कार्यरत होऊन आकार धारण करतात. सुती धाग्यातील पृथ्वी व आप या तत्त्वांच्या संयोगामुळे या लहरी जिवाला ग्रहण करण्यास सुलभ होतात.

वडाच्या पूजनामध्ये पाच फळे असतात .सर्व पवित्र वृक्षांत वटवृक्षाचे आयुष्य जास्त असून पारंब्यांनी त्याचा विस्तारही खूप होतो. अशा वटवृक्षाचे पूजन करून स्त्रिया `मला व माझ्या पतीला आरोग्यसंपन्न दीर्घायुष्य लाभू दे, धनधान्य व मुले-नातू यांनी माझा प्रपंच विस्तारित व संपन्न होऊ दे', अशी प्रार्थना करतात. ज्या स्त्रिया वडाला जाऊ शकत नाहीत त्या घरीच वडाच्या डहाळी ची किंवा वडाच्या चीत्राचीदेखील पूजा करतात. एकमेकींना कुंकू लावून ओटी भरतात. दुपारी देवळात पोथीचे वाचन करतात. याच जेष्ठ पौर्णिमेला गौतम बुद्धाने कपिल वस्तूत महासुत्ताला उपदेश केला होता. म्हणून, बौद्धलोकांच्या दृष्टीनेही ही पौर्णिमा महत्वाची ठरते.

<u>आषाढ पौर्णिमा…</u>

आषाढ शुद्ध पौर्णिमा… या तिथीला गुरुपौर्णिमा किंवा व्यासपौर्णिमा पौर्णिमा म्हणून ओळखतात. गुरुपौर्णिमा ही सद्गुरूंची पौर्णिमा! व्यक्तिमत्वाची पुनर्रचना घडविणारा हा गुरु असतो. दृष्टीतील उणीवा तो काढून टाकतो. आणि अज्ञानाचा , अंधकाराचा नाश करतो. व्यक्तीला आत्मविषयक जाणीव करून देतो..गुरु म्हणजे ज्ञानाचा सागर.. ‘अशा सर्व गुरूंना आभार प्रकट करण्यासाठी ही गुरुपौर्णिमा समर्पित केली जाते. जीवनाच्या खऱ्या ध्येयाची पूर्ती साजरी करण्याचा दिवस म्हणजे गुरुपौर्णिमा ! मनावर अधिपत्य करणारा चंद्र या पौर्णिमेच्या रात्री पूर्ण ,स्वच्छ,शीतल आणि तेजस्वी दिसतो. निष्कलंक ,तेजस्वी आणि अतिशय प्रेमळ गुरूची देखील स्तुती या दिवशी केली जाते. हा गुरु परमेश्वराला शरण गेलेला, सहनशील आणि अत्यंत शांत असतो. आपल्या शिष्यामध्ये जे सद्गुण विकसित व्हावेत असे त्याला वाटत असते , त्या सद्गुणांचे तो साक्षात स्वरूपच असतो.. आणि आपल्या आचरणातून तो ते आदर्श घालून देतो. "ओम पूर्णमदः पूर्णमिदम पूर्णात पूर्णमुदच्यते" असे वेदात सांगितले आहे.. जेव्हा पूर्णातून पूर्णता काढली जाते ,तेव्हाही उरलेले पूर्णच राहते..आणि हे गुणांच्या पूर्णतेविषयी आहे . खडीसाखरेचा लहानसा तुकडा काढून घेतला तरी त्यात तितकीच गोडी राहते ..किंवा सागराच्या पाण्यातील एक थेंब देखील संपूर्ण सागराच्या पाण्याइतकाच खारट असतो. सृष्टीतील सूक्ष्म-अतिसूक्ष्म गोष्टीपासून मोठ्यात मोठी गोष्ट ही परमेश्वराच्या पूर्णरूपाने व्यापलेली आहे आणि गुरुमध्ये साक्षात परब्रह्म वास्तव्य आहे..अशा या ”गुरूजवळ शिष्याने नम्र झाल्याविना त्याला ज्ञान प्राप्त होणार नाही..“गुरु साक्षात परब्रम्ह तस्मै श्री गुरवे नमः ॥

म्हणूनच ,आपापल्या क्षेत्रातील गुरुस्थानी असलेल्या थोर व्यक्तींबद्दल आदर आणि कृतज्ञता व्यक्त करण्याचा गुरुपौर्णिमा हा दिवस असतो… शिष्य

आपल्या गुरुवर्यांची पूजा करतात. महाभारत लिहिणाऱ्या व्यासमुनींना वंदन करण्याचा, त्यांची पूजा करण्याचा हा मंगलदिन ! महर्षी व्यास हे भारतीय संस्कृतीचे शिल्पकार आणि मूलाधार मानले जात. ज्या ग्रंथात धर्मशास्त्र, नीतिशास्त्र, व्यवहारशास्त्र, मानसशास्त्र आहे, असा सर्वश्रेष्ठ ग्रंथ त्यांनी लिहिला. त्यांच्याएवढे श्रेष्ठ आचार्य अद्याप झालेले नाहीत, अशी श्रद्धा आहे. अशा या आचार्यांना साक्षात देवाप्रमाणे मानावे असे शास्त्रात कथन केले आहे. सर्व ज्ञानाचा उगम त्यांच्यापासूनच होतो अशी भारतीयांची कल्पना आहे.म्हणूनच ,गुरु परंपरेत व्यासांना सर्वश्रेष्ठ गुरु मानलेले आहे. व्यास महर्षी हे शंकराचार्यांच्या रूपाने अवतीर्ण झाले अशी श्रद्धा असल्याने संन्यासी लोक आषाढ पौर्णिमेस शंकराचार्यांची पूजा करतात. स्नान करून संकल्प करतात, ' गुरु परंपरा सिध्यर्थ व्यासपूजां करिष्ये । ' एक धूतवस्त्र पुढे अंथरून त्यावर पूर्वेकडून पश्चिमेकडे आणि उत्तरेकडून दक्षिणेकडे अशा बारा रेषा गंधाने काढतात. म्हणजेच 'व्यासपीठ ' तयार होते. नंतर या व्यासपीठावर ब्रह्मा, परात्पर शक्ती, व्यास, शुक्रदेव, गौडपाद गोविंदस्वामी आणि शंकराचार्य यांचे आवाहन करून त्यांची षोडशोपचारे पूजा करतात. व्यासपौर्णिमेच्या दिवशी 'ओम नमोस्तुते व्यास, विशाल बुद्धे' अशी प्रार्थना करून, त्यांना प्रथम वंदन करण्याचा प्रघात आहे, परंपरा आहे. आपल्या देशात रामायण-महाभारत काळापासून गुरु-शिष्य परंपरा चालत आली आहे. महर्षी व्यासांपासून अशी प्रथा रूढ झाली, भारतीय गुरुपरंपरेत गुरु-शिष्यांच्या जोड्या प्रसिद्ध आहेत. जनक-याज्ञवल्क्य, शुक्राचार्य-जनक, विश्वामित्र-राम, लक्ष्मण, परशुराम-कर्ण, द्रोणाचार्य-अर्जुन , निवृत्तीनाथ-सत ज्ञानेश्वर अशी गुरु-शिष्य परंपरा आहे. मात्र
! एकलव्याची गुरुनिष्ठा काही निराळीच होती...फार उच्च
भगवान श्रीकृष्णांनी गुरूच्या घरी लाकडे वाहिली. तर ,संत नामदेव साक्षात विठ्ठलाशी भाष्य करीत असत. अनेक विद्यालयांतून, महाविद्यालयांतून विद्यार्थी आपापल्या गुरुजनांना या दिवशी विनम्र भावनेने नमस्कार करतात. ज्यांना गुरुंचे समक्ष दर्शन वा सहवास घडू शकत ...नाही ते त्यांचे स्मरण करून त्यांना प्रणाम करतात

आषाढ पौर्णिमेच्या दिवशी गौतम बुद्धाने महामाया देवीच्या कुशीत प्रवेश केला आणि त्याच तिथीला महाभिनिष्क्रमण केले आणि याच तिथीला धर्मचक्रप्रवर्तन केले म्हणून आषाढ पौर्णिमा महापर्व म्हणून बौद्ध लोकांना प्रिय आहे.. गुरुपौर्णिमेच्या दिवशी सद्‌गुण वाढीस लावावे..प्रेमात, श्रद्धेत वृद्धी करावी..साधनेद्वारे भावना, मन , इंद्रिये यांवर ताबा मिळवून अंतस्थ असलेल्या परमेश्वराला, त्या सद्‌गुरूला ओळखावे....निसर्गाचे प्रेमाने स्वागत करावे आणि त्याच्याकडून देखील शिकवण घ्यावी..हा गुरुपौर्णिमेचा संदेश असतो..

<u>श्रावणीपौर्णिमा</u>

श्रावण शुद्ध पौर्णिमा म्हणजेच नारळी पौर्णिमा किंवा राखी पौर्णिमा !

या दिवशी समुद्र किनाऱ्यावर राहणारे सर्व जातीचे आणि धर्माचे लोक समुद्राचा अधिपति वरुणराज याला विधीपूर्वक नारळ अर्पण करून त्याची पूजा करतात.शांती करतात.श्रावण पौर्णिमेनंतर खवळलेला समुद्र शांत होतो.वादळी वाऱ्याचा जोर कमी होतो. ज्यांचे समुद्राशी अत्यंत जिव्हाळ्याचे नाते जोडलेले असते,ते नाविक लोक ,मच्छीमार लोक होड्या पाण्यात घालण्याचा मुहूर्तदिन आला म्हणून हा दिवस फार आनंदाचा दिवस मानतात. त्यांच्या जीवनात समुद्राच्या भरती-ओहोटीशी निगडीत असलेल्या चंद्राचे , विशेषतः या श्रावणी पौर्णिमेच्या चंद्राचे फार महत्वाचे स्थान आहे. त्यामुळेच हे लोक चंद्राला दिवटी ओवाळतात आणि चंद्राचीही पूजा करतात.

नारळी पौर्णिमेला समुद्रापासून दूर भागात असलेले लोकही नारळाचे गोड पदार्थ करून खातात.

पूर्वी उत्तर भारतात मर्यादित असलेला हा रक्षाबंधनाचा सण आता भारतभर साजरा केला जातो. मथुरा-वृंदावनात यावेळी जणू यात्रा लोटते..कित्येक बहिणभाऊ या पवित्र स्थानी जातात आणि तिथे हा सोहळा साजरा करतात.जैन लोक हा दिवस रक्षापर्व म्हणून पाळतात. त्या दिवशी जैन मंदिरातून राख्या ठेवतात. जैनमुनी त्यांचा अगत्याने व आदराने स्वीकार करतात. राजस्थानात स्त्रिया एकमेकींना राख्या बांधतात. या श्रावण पौर्णिमेला जेजुरीच्या खंडोबाची मोठी यात्रा भरते. विशेष उत्सव होतो. पूर्वी श्रावण कर्म हा विधी श्रावण पौर्णिमेला करत

असत. सातूच्या लाह्या आणि खापरावर भाजलेली पोळी अग्नीला अर्पण करत आणि उरलेल्या लाह्या प्रसाद म्हणून खात असत.

रक्षा बंधनाच्या या दिवशी दुपार टळल्यावर किंवा सूर्यास्तानंतर रक्षाबंधन करतात .बहिणीने भावाच्या हाताला राखी बांधावयाची असते. भावाचा उत्कर्ष व्हावा आणि बहिणीला त्याने संरक्षण द्यावे ह्या हेतूने रक्षाबंधन केले जाते...शुद्ध रेशमाची बनवलेली आणि वर गाठ असलेली राखी घेऊन तिची 'रक्षायै नमः ' या मंत्राने गंध,हळदकुंकू,फुल,दीप,उदबत्ती या पंचोपचारांनी पूजा केली जाते ..आणि मग ही राखी बहिण तिच्या भावाला बांधते..दूर गावी असलेल्या बहिणी भावांकडे राख्या पाठवतात. ज्याला शक्य असेल तो भाऊ राखी बांधून घेण्यासाठी तिच्या घरी जातो.या राख्या रेशमी दोरा, मोती, मणी,मखमल इ.चा कलापूर्ण वापर करून आकर्षक बनवलेल्या असतात. या रक्षाबंधनाने भावाबहिणीमधले स्नेहसंबंध दृढ होतात.

सख्खा भाऊ नसेल तर भ्रातृसमान व्यक्तीस राखीबांधावी. आणि सख्खी बहिण नसेल तर बहिणीसमान स्त्री कडून राखी बांधून घ्यावी..राखी बांधण्यापूर्वी बहिणीने प्रथम देवास आणि नंतर भावास औक्षण करावे. म्हणजेच ,तेलाची निरांजने असलेली आरती ओवाळावी. भाऊ यावेळची 'ओवाळणी' बहिणीला घालतो. तिचा यथोचित भेट देऊन सत्कार करतो. रक्षाबंधन झाल्यावर भगिनीने बंधूस गोड पदार्थ खाण्यास द्यावा. या पौर्णिमेला भोजनात नारळी-भात करण्याची पद्धत आहे.

या रक्षाबंधनाच्या निमित्ताने पुराणातील कथा सांगावीशी वाटते..बलाढ्य बलीराजाचे वर्चस्व देवांना सहन झाले नाही आणि त्यावेळी त्यांची झोप उडाली होती..मग बळीराजाने उभारलेल्या यज्ञमंडपात जाऊन भगवान विष्णू वामन अवतार धारण करून बटूच्या रूपात बलीपुढे उभा राहिला..बळीने या तेजस्वी बटूचे कौतुक केले. बळीजवळ वामनाने तीन पावले जमीन मागितली. बळीने तीन पावले जमीन देण्याचे आनंदाने कबूल केले. दोन पावलातच बटूने पृथ्वी व्यापली आणि त्याला तिसरे पूल ठेवायला जागाच राहिली नाही. मग बळीने आपले मस्तक वामानापुढे नमविले. आणि वामनाने आपले तिसरे पाऊल बळीच्या मस्तकावर ठेवले. आणि त्याला पाताळात लोटले. अशा कपटाचा धनी झाल्याने मग वामनाला म्हणजेच विष्णूला बळीच्या वाड्यावर द्वारपाल म्हणून राहावे लागले. इकडे लक्ष्मीला विष्णूला शोधून काढल्यावाचून राहवेना .तिला मग नारदमुनींनी जी युक्ती सांगितली ,ती तिने अंमलात आणली..लक्ष्मी बळीच्या वाड्यावर गेली आणि साक्षात लक्ष्मीला पाहून अत्यंत आनंद झालेल्या बळीने ' काय सेवा करू ?' असे लक्ष्मीला विचारले. लक्ष्मीने त्याला सांगितले की "आज रक्षाबंधनाचा दिवस आहे. माझा भाऊ म्हणून मी तुला आज राखी बांधणार. ती तू बांधून घे." बळीने आनंदाने राखी बांधून घेतली. आणि "या गोष्टीची फेड, (ओवाळणी) कशी करावी?" असे विचारले. लक्ष्मीने त्याला सांगितले की,"तुझ्या द्वारपालाला तुझ्या सेवेतून तू मुक्त कर. तो माझा पती आहे." आपल्या दारावर असलेला हा द्वारपाल म्हणजे साक्षात विष्णू आहे हे कळल्यावर बळीने त्याला मुक्त केले आणि मग लक्ष्मीनारायणाचे दर्शन घेऊन तो धन्य झाला..रक्षाबंधनाचा मंत्र असा आहे.."येन बद्धो बली राजा दानवेन्द्रो महाबलः l तेन त्वामभिबध्नामि रक्षे मा चल मा चल l" याचा अर्थ असा आहे,"ज्या राखीने दानवांचा महापराक्रमी राजा बली याला बद्ध म्हणजे आपलेसे केले,ती राखी मी तुला बांधत आहे.माझे रक्षण कर.यात अंतर देऊ नकोस."

<u>भाद्रपद पौर्णिमा...</u>

ही प्रौष्ठपदी पौर्णिमा म्हणून ओळखली जाते. प्रौष्ठपदी हे श्राद्ध प्रपितामहाच्या (पणजोबांच्या )पूर्वीच्या तीन पुरुषांना उद्देशून केले जाते. काहीजण ही पौर्णिमा अनंत पौर्णिमा समजून त्या दिवशी अनंताची पूजा करतात . काहीजण अनंतचतुर्दशीला देखील ही अनंतपूजा करतात. शुद्ध पाण्याने भरलेला कलश घेऊन त्याला २ पंचे गुंडाळून त्यावर दर्भाचा शेष तयार करतात किंवा कलशावरील ताम्हणात शाळीग्राम किंवा अनंताची धातूची किंवा सोन्याची प्रतिमा ठेवून ती पुजतात. किंवा गाठी घातलेला तांबडा रेशमाचा दोरा घेऊन त्याच्या ठिकाणी अनंताची कल्पना करून तो पुजतात. या दोऱ्याला अनंत म्हणतात. अनंती म्हणूनही असते. ही पूजा झाल्यावर अनंत पुरुषाने आणि अनंती त्याच्या पत्नीने उजव्या मनगटावर बांधावयाची असते. भाद्रपदात त्रयोदशीपासून पौर्णिमेपर्यंत लक्ष्मिनारायणाची पूजा करण्याचा देखील प्रघात आहे.

<u>आश्विन पौर्णिमा ...</u>

शरद ऋतूच्या २ पौर्णिमा असल्या तरी शरद पौर्णिमा म्हणून ओळखली जाणारी अतिशय सुंदर अशी आजची आश्विन पौर्णिमा ! सौंदर्य आणि समृद्धी यांची देवता लक्ष्मी स्वतःच या पौर्णिमेच्या मिषाने पृथ्वीतलावर अवतरते अशी समजूत आहे.."को जागर्ति " म्हणून विचारीत फिरणाऱ्या लक्ष्मीची साक्षात भेट घडावी अशा इच्छेने आश्विन पौर्णिमेची सारी रात्र जगविण्याचा उपक्रम खूप जुना आहे..

भगवान श्रीकृष्णाने या शरद पौर्णिमेची उल्हासमय ,रहस्यमय, आनंदाची ,रोमांचकारी रात्र जागवली होती..कृष्णाच्या दिव्य बासरीचे स्वर शांत वातावरणात गुंजन करू लागले..ते स्वर ऐकून गोपींनी हातातली कामे तशीच टाकून दिली..आणि बासरीच्या आवाजाच्या रोखाने त्या निघाल्या. श्रीकृष्णाने त्यांचे स्वागत केले..पण मुद्दामच वेगळा पवित्र घेऊन त्यांना छेडले."इतक्या रात्री जंगलात कशाला आलात? घरचे लोक काळजी नाही का करणार ?तुम्ही परत जावं हे उत्तम !" श्रीकृष्णाचा हा निष्ठुरपणा पाहून गोपींच्या नेत्रांमधून अश्रुधारा बरसू लागल्या. ज्या प्रेमाच्या उमाळयाने त्या धावत आल्या होत्या , त्या उमाळयाला हे उत्तर म्हणजे अंगारे होते..त्यांनी मग कृष्णाला नानापरींनी विनविले..आणि त्यानंतर प्रसन्नचित्त होत कृष्णाने रासक्रीडा सुरु केली. यमुनेच्या चमचमत्या रेतीवर रासक्रीडा करणारा कृष्ण तारकांनी वेढलेल्या चंद्राप्रमाणे खुलून दिसत होता..आपल्या योगमायेच्या सहाय्याने त्याने आपली अनेक रूपे धारण केली .प्रत्येक गोपीला वाटत होतं कि कृष्ण फक्त माझ्याच बरोबर रासक्रीडा करतो आहे..कृष्णाने यावेळी सहा महिन्यांची एक रात्र केली असे म्हणतात ..असा तो दिव्य रासोत्स्तव होता.. हे असे रास आताही देशभरात हरियाली तिज (भाद्रपद कृ.तृ.) पासून आश्विन पौर्णिमेपर्यंत होत असतात..या पौर्णिमेला देशाच्या निरनिराळ्या भागातील कृष्ण मंदिरात उत्स्तव होत असतो.

आश्विन पौर्णिमा कोजागिरी पौर्णिमा म्हणून ओळखली जाते..या दिवशी चंद्राची पूजा, लक्ष्मीची पूजा, आणि इंद्राची पूजा करण्याचा प्रघात आहे..रात्री लोक चंद्रप्रकाशात , अंगणात किंवा गच्चीवर खेळत ,गप्पा मारत आनंदाने जागरण करतात. या नितांत सुंदर वातावरणात शुभ्रतेला खूप महत्व प्राप्त झाले आहे. शक्यतो सारे लोक पांढरी वस्त्रे धारण करतात.."को जागर्ति " असा प्रश्न करीत लक्ष्मी स्वतः विहार करते..जागे असणाऱ्यावर प्रसन्न होत घरात प्रवेश करते..लोक चंद्राला नैवेद्य दाखवून गरम मसाला दूध ,किंवा खीर प्राशन करतात. ही पौर्णिमा महाराष्ट्रातील शेतकरी वर्गात भोम्बी पुनव म्हणून ओळखली जाते..भोम्बी म्हणजे भूमी , भूमीची पूजा या दिवशी करतात. तुळजापूरची भवानीमाता नवरात्रीनंतर दसरा झाल्यानंतर झोपते, ती कोजागिरीला जागी होते.

आश्विन पौर्णिमेला बंगाल मध्ये लक्ष्मीपूजन करतात. या दिवशी घरात सर्वत्र लक्ष्मीची पाऊले , रुपया आणि भाताची लोंबी यांच्या आकृती काढतात..एक जलाचा कलश घेऊन त्यावर आंब्याची पाने आणि असोला नारळ ठेवतात. कलशावर शेंदराचे ठिपके देतात. त्या लक्ष्मीचे प्रतिक असलेल्या कलशाचे पूजन करतात. आणि लोकांना भोग नामक प्रसाद आणि खिचडी , खोबऱ्याची मिठाई वाटतात. या पौर्णिमेला कार्तिक स्नानारंभ होतो...

कार्तिक पौर्णिमा...

कार्तिक शुद्ध पौर्णिमा ही त्रिपुरारी पौर्णिमा म्हणून ओळखली जाते. त्रिपुर नावाच्या एक बलाढ्य राक्षसाने एक लक्ष वर्षे उग्र तप केले. आणि ब्रम्हदेवाला प्रसन्न करून घेतले. मग ब्रम्हदेवाला एक वर मागितला की," मला देवता, मनुष्य,निशाचर, आणि रोग यांच्यापासून अभय असावे.." या वराच्या प्राप्तीमुळे हा राक्षस माजला. या राक्षसाची तीन पुरे म्हणजेच शहरे होती. तो त्रैलोक्याला त्रास देऊ लागला. देवही या प्रकारामुळे त्रस्त झाले आणि शेवटी शंकराला शरण गेले. शंकराने ही तीनही पुरे जाळली आणि त्या त्रिपुराला ठार केले. भगवान शंकराने त्रिपुर नावाच्या या असुरावर कार्तिक पौर्णिमेला विजय मिळवला. म्हणून या विजयार्थ या दिवशी घराघरातून , शंकराच्या देवळात दिवे लावण्याची प्रथा आहे. दगडी दीप माळाही रात्री पाजळल्या जातात. या दीपोत्सवाला त्रिपुर पाजळणे असे म्हणतात. या दिवशी 'गंगास्नान' करून कार्तिकस्वामीचे दर्शनही घेण्याचा रिवाज आहे. काही ठिकाणी घराच्या भिंतींवर शिव-पार्वतीचे चित्र काढून त्याची पूजा केली जाते. आणि या प्रतिमांना उसाच्या रसाचा

नैवेद्य दाखवितात..या दिवशी दीपदानाही करतात..कोहळयाचे दानही करतात. गोव्यात साखळी येथे पांडुरंगाची आणि नागेशी येथे नागेशाची यात्रा या दिवशी भरते. त्र्यंबकक्षेत्री रथोत्सव होऊन यात्रा भरते. राजस्थानात पुष्कर क्षेत्री लाखो भाविक जमा होतात आणि तेथील सुंदर तलावात स्नान करण्याचे पुण्य मिळवतात. या दिवशी कार्तिक स्नान समाप्ती होते. या तिथीला गुरुनानक यांचा जन्म झाला. त्यामुळे ,शीख धर्मीयांमध्ये ही तिथी महत्वाची आहे.

मार्गशीर्ष पौर्णिमा...

या पौर्णिमेला दत्तजयंती असते. या तिथीला मृगनक्षत्रावर दत्तजन्म झाला . सायंकाळी दत्तमंदिरात दत्तजन्माचा उत्सव केला जातो. त्यापूर्वी ७ दिवस गुरुचरित्राचे पारायण करण्याचा प्रघात आहे. काही कुटुंबात ,विशेषत: ब्राह्मण कुटुंबात दत्त नवरात्र करतात. त्याची सांगत या पौर्णिमेच्या दिवशी होते . अनेकजण उपवासही करतात. या दिवशी महाराष्ट्रामधील दत्ताच्या प्रसिद्ध स्थानी , औदुंबर ,नृसिंहवाडी, गाणगापूर इ.ठिकाणी मोठ्या प्रमाणात उत्सव होऊन यात्राही भरतात. बेळगाव येथील सौंदत्ती येथे यल्लम्माची यात्रा भरते . याच तिथीला परशुरामाने आपल्या पित्याच्या आज्ञेवरून आपल्या मातेचा , रेणुकेचा वध केला होता. आणि या घटनेची आठवण म्हणून सांगली जिल्ह्यातील भोसे येथे जोगतिणी आपल्या हातातील बांगड्या फोडून घेतात. आणि २ महिन्यांनी माघी पौर्णिमेला पुन्हा बांगड्या धारण करतात.

पौष पौर्णिमा...

ही पौर्णिमा शाकंबरी पौर्णिमा म्हणून ओळखली जाते. शाकंबरी म्हणजे दुर्गा. दुर्गादेवीला अनेक भाज्यांचा प्रसाद या दिवशी दाखविला जातो. बागलकोटजवळ बदामीपासून काही अंतरावर बनशंकरीचे देवस्थान आहे. बनशंकरी ही काही घराण्यांची कुलदैवता आहे. सिंहावर विराजमान झालेली ही उग्रदेवता आहे. असे म्हणतात की या देवीला घुंगुरांचा नाद आवडत नाही. भक्तांना घुंगूर वर्ज्य आहे. पौषात या देवीचे नवरात्र असते आणि समाप्ती या पौष पौर्णिमेला असते. नवरात्र चालू झाल्यावर देव्हार्यात नऊ दिवस नऊ रात्री तेलाचे अखंड दिवे पाजळतात. तुपाचे दिवेही पाजळतात.पौर्णिमेच्या दिवशी नऊ सवाष्णी आणि पाच ब्राह्मण जेवायला घालतात. त्यांना दक्षिणा देतात. सवाष्णींची ओटी भरतात. देवीच्या नैवेद्यासाठी साठ प्रकारच्या भाज्या ,साठ कोशिंबिरी, चटण्या कराव्या लागतात. पौष पौर्णिमेला मीनाक्षीची मोठी यात्रा भरते. देवीची रथातून मिरवणूक निघते. भाविक स्वतः रथ ओढून घेतात. बेळगावातील मायाक्का चिंचली येथे अंबाबाईची यात्रा भरते. देवीची मोठ्या धुमधडाक्याने पालखी निघते. बैलांचा बाजारही येथे भरतो. चांगल्या बैलजोड्यांना बक्षिसे देतात. पौष पौर्णिमेला खंडोबा आणि म्हाळसा यांचा विवाह झाला. म्हणून ही तिथी पाली येथे मोठ्या उत्साहाने साजरी करतात. जेजुरीला विशेष उत्सव होतो. गोव्यामध्ये ही पौर्णिमा मालिनी पौर्णिमा म्हणून ओळखली जाते. गुजराथमध्ये 'पोषी पुनव' म्हणून एक व्रत प्रचलित आहे. हे व्रत लहान मुली आपल्या भावासाठी करतात. दिवसभर उपवास करतात. सायंकाळी गच्चीत किंवा एखाद्या मोकळ्या जागी चांदण्यात स्वयंपाक करतात. या स्वयंपाकात कणकेची चांदकी ही प्रमुख वस्तू असते. चांदकीला मधोमध भोक पाडलेले असते. या छिद्रातून पाहून मुली चंद्रदर्शन घेतात. त्यावेळी गाणे गातात. नंतर त्या आपल्या भावाजवळ जेवण्याची परवानगी मागतात आणि मगच अन्नग्रहण करतात. पौध पौर्णिमेला अनेक जण विष्णूमूर्तीला तुपाने स्नान घालतात. या दिवशी माघ स्नानाला प्रारंभ होतो. समुद्रस्नान घडल्याने विशेष पुण्य मिळते अशी कल्पना आहे.

माघ पौर्णिमा...

ही पौर्णिमा महाराष्ट्रातील नव्याची पौर्णिमा म्हणून ओळखली जाते. या दिवशी संध्याकाळी घरातील देवांची पूजा करून शेतकरी नवीन आलेल्या धान्याचा नैवेद्य देवाला दाखवितात. त्या धान्याच्या घुगऱ्या शिजवून त्या घुगरयांचा आणि पुरणपोळीचा नैवेद्य दाखवितात. नवीन गव्हाच्या कणकीचे ७ दिवे ,७ फळे आणि ७ मुटके तयार करून देव्हाऱ्यात ठेवतात . या दिव्यांमध्ये तुपात भिजवलेल्या वाती ठेवून दिवे पाजळतात. फळे, मुटके ,दिवे यांवर हळद कुंकू वहातात. उदबत्ती लावून कापराची आरतीही करतात. घुगऱ्यांची पूजा होते. यानंतर बाजरीच्या ताटांची ,सरमाडांची चुडी करून ती पेटवून चंद्राला ओवाळतात. आणि घरातील सर्व माणसे चंद्राला नमस्कार करतात. या पौर्णिमेला चुडी पुनव असेही म्हणतात. आणि

दुसऱ्या दिवशी फळे,घुगऱ्या इ.प्रसाद म्हणून खातात. यानंतर नवीन धान्य खाण्याला सुरुवात होते. माघ पौर्णिमेलाही निरनिराळया ठिकाणी जत्रा भरते. गोव्यात संस्थानात श्री मांगिरीश जत्रा भरते. जेजुरीला खंडोबाची जत्र भरते. माघ पौर्णिमेच्या दिवशी गौतमबुद्धाने वैशाली येथे आपल्या आयु:संस्कारांचा त्याग करून घोषणा केली होती की "आजपासून ३ महिन्यांनंतर तथागताचे परिनिर्वाण होईल ." म्हणून, हा दिवस बौद्ध लोक पुण्यप्रद मानतात. माघ पौर्णिमेला माघस्नान समाप्ती होते.

फाल्गुन पौर्णिमा...

फाल्गुन पौर्णिमा म्हणजेच होळी पौर्णिमा. हिवाळा संपून उन्हाळयाला सुरुवात होते. थंडी जाऊन उब येते. होळी म्हणजे थंडीच्या दिवसात आपल्याला उष्णता देणाऱ्या अग्नीला कृतज्ञतापुर्वक केलेला प्रणाम. होळी म्हणजे ऋतुराज वसंताचे स्वागत.या सुमाराला वसंत ऋतूच्या प्रारंभी होलिकोत्सव भारतातील अनेक भागात साजरा होतो. उत्तरेत याला होरी, दोलायात्रा...तर गोवा, कोकण व महाराष्ट्रात शिमगा, होळी व हुताशनी महोत्सव,होलिकादहन आणि दक्षिणेत कामदहन अशा संज्ञा आहेत. याला `वसंतोत्सव' अथवा `वसंतागमनोत्सव' म्हणजे वसंत ऋतूच्या आगमनासाठी साजरा करायचा उत्सव हे नाव देता येईल. होळीच्या सणाचे , धूलिकोत्सव आणि रंगोत्सव हे तीन पदर तर सहज उठून दिसतात. फाल्गुन पौर्णिमेला हुताशनी पौर्णिमा म्हणतात .या दिवशी होळीचा उत्सव साजरा केला जातो. यानंतर पुढे पाच दिवस वेगवेगळे उत्सव साजरा होतात. दुसऱ्या दिवशी धुळवड असते. पंचमीला रंगपंचमी साजरी करतात या उत्सवाला आपण होळी म्हणतो. 'होळीला महाराष्ट्रात 'शिमगा' म्हणतात, दक्षिणेत 'कामदहन' म्हणतात. तर बंगालमध्ये दौलायात्रा म्हणून होळीचा सण होतो. `हुताशनी', असेही होळीला नाव आहे.

देवळासमोर किंवा सोयीच्या ठिकाणी पौर्णिमेच्या सायंकाळी होळी पेटवतात. शक्यतो ग्रामदेवतेसमोर होळी उभी करतात. सर्वप्रथम मध्ये एरंड, माड, पोफळी अथवा ऊस उभा करून नंतर त्याच्या भोवती गोवऱ्या व लाकडे रचतात . व्रतकर्ता स्नान करून संकल्प करतो . नंतर `होलिकायै नम: ।' हा मंत्र म्हणून होळी पेटवतो . होळीची प्रार्थना करतो . होळी पेटल्यावर लोक होळीला प्रदक्षिणा घालून शंखध्वनी करतात आणि पेटलेल्या होळीभोवती 'बोंबा' मारत लोक प्रदक्षिणा घालतात. होळी पूर्ण जळाल्यानंतर दूध व तूप शिंपून ती शांत करतात . नंतर जमलेल्यांना नारळ, पपनस यांसारखी फळे वाटतात. दुसऱ्या दिवशी पहाटे होळीच्या राखेची पूजा करून ती राख अंगाला लावून स्नान करतात . म्हणजे मानसिक व्यथा, चिंता व रोग होत नाहीत.

पौर्णिमांची ही अनेक रूपे पाहिल्यावर आपल्या या देशाच्या जिवंत असलेल्या ,विविधता असलेल्या सुरेख संस्कृतीची एक प्रकारे ओळखच होते. भक्ती ,उल्हास ,उपासना, जीवन प्रणाली दिसून येते ..आणि हीच विचार आणि जीवन प्रणाली आपल्याला निरंतर उच्च स्थानावर राहण्यासाठी मार्गदर्शन करते. त्यामुळेच नुसते पौर्णिमा म्हंटले की डोळयांसमोर लखलखून उठलेल्या दीपमाळा ,उजळलेल्या शेकडो त्रीपुरवाती,बिल्वदलांनी आच्छादलेली शंभूमहादेवाची पिंड,या वसुंधरेला दिव्य सुधेच्या अमृतधारांनी न्हाऊ घालणारा तो अत्यंत तेजपुंज असा पूर्णचंद्र दिसू लागतो...हे चैतन्य असेच चिरंतन राहो ,आपल्याला प्रेरणा देत राहो ही ईश्वरचरणी मन:पूर्वक प्रार्थना !

**कधी -कधी** **अरुण वी.देशपांडे**

तुम्हा -आम्हा सर्वांच्या मनात आठवणीच -आठवणी साठ्लेया असतात ."व्यक्ती तितक्या प्रकृती "- तसे आठवणींचे असते. कुणाच्या आठवणीत काय असेल ? सांगता येत नाही."आठवणीत हरवून जाणे "- हे आपल्या स्वभावातील हळवेपानाचे लक्षण आहे.कारण आठवणी ह्या बहुतांशी " निकटच्या - आपल्याशा वाटणाऱ्या व्यक्तीशी निगडीत असतात. त्या अनुषंगाने घडलेले "प्रसंग किंवा घटना " या आपल्या मनात , स्मृतीपटलावर कायमच्या कोरल्या गेलेल्या असतात. सहाजिकच त्या क्षणांना आपण कधीच विसरू शकत नाही."हे पुन्हा पुन्हा आठवणे सुद्धा मनाला एक हळवे समाधान देणारे सुखच आहे."

मनाच्या हुरहुरत्या अवस्थेत "आठवणीत हरवून जाणे" ही हमखास घडणारी एक मानसिक प्रक्रिया आहे."आपण आपल्यातच हरवून जाणे," आजूबाजूच्या दुनियेचा विसर पडून जाणे " असे हे आठवणीत हरवून गेल्यावर होऊन जाते. या आठवणी "कधी डोळयांच्या कडा ओलावून टाकणाऱ्या असतात, कधी अस्फुट असे हुंदके घशाशी आणणाऱ्या असतात." तर "कधी आठवणी मनाला नवी उमेद देतात ", आठवणी पुन्हा ताज्या झाल्या की "मनाला हुरूप आल्या सारखे वाटून जाते."

"जुन्या जखमा कुरवाळीत बसणे..." म्हणजे "आठवणीत हरवून जाणे " एवढेच नसते."सहवासात येऊन गेलेल्या माणसांना भरली मनाने आठवणे "- ही सुद्धा आठवणी आहे. "आपल्या हातून घडून गेलेल्या चुकांपासून बोध घेणे आणि त्या दुरुस्त करण्याचा प्रयत्न करून पाहणे" हे ही घडून जाऊ शकते ते केवळ "आठवणीच्या पाठबळावर ." कारण त्या घटना , ते घडून घेलेले प्रसंग " आपल्याला जीवनानुभव " देऊन गेलेले असतात. ते पुन्हा – पुन्हा आठवणे ' आणि मनाला "नव्याने काही शिकण्यास मिळणे ", हे आठवणींचे आपल्या उपकारच आहेत ", असे म्हणावेसे वाटते. "एक-एकट्याचा एकांत - आणि आठवणी" यांचे अतूट असे नाते आहे. दूरवर नजर लावून विचारात गढून गेलेले कुणी दिसले के समजावे" आठवणीच्या

आठवणीत हरवून गेलेला दिसतेय स्वारी.'!

" आठवणीचे ."-हे येणे
झुल्यावारचे झुलणे
हिंदोळयावर झुलावे
मनालागी सुखवावे .......||

कधी -कधी आपल्याला काय झाले आहे हेच कळत नाही, एक विचित्र हुरहूर मनाला घेरून टाकते ,आणि एकाएकी

सगळे बेचव, नीरस ,बेरंग वाटू लागते , आज सकाळी माझ्याकडे एक मित्र येवून गेला ,नेहमी गप्पा मारणारा ,खळखळून हसणारा ,दुसर्याला हसायला लावणारा , हा माणूस आज एकदम अबोल वाटला ,गभीर दिसला ,नाराज भासला , मी त्याला बोलता करून पाहिला ,खुलवण्याचा प्रयत्न करून पाहिला, कशाचा ही उपयोग झाला नाही. "माझ्या मित्राला नेमके काय झाले असावे ?, अपेक्षा -भंग ?,दुर्लक्ष होत असल्याची भावना, की आर्थिक परावलंबन झाल्याची भीती ?

तसे पाहिले तर "सगळ काही ठीक" असे चित्र .मग काय झाले असावे? तुमचा मानस-अभ्यास "चांगला आहे, जरा विचार करा आणि सांगा ? या माझ्या मित्राला काय झाले असावे? मी नंतर मित्राला तो नार्मल झाल्यावर विचारीनच- कधी कधी ",तुला काय होत रे बाबा सांगशील का ?

मित्रांनो ,आपण सामन्य माणसे आहोत, बुद्धी पेक्षा आपण भावनेने वागत असतो , या दृष्टीने कधी -कधी असे आठवणीत हरवणे मनाला आनंद देणारे असते हे नक्की.

**नागा समस्येचं त्रांगडं** — **पुरूषोत्तम रानडे**

मंगळवार दि. १६ ऑक्टोबरच्या 'लोकसत्ता'मधील अन्वयार्थ सदरात 'नागालँडमधील शुभसंकेत' हा लेख प्रसिद्ध झाला. एन्.एस्.सि.एन (ईसाक-मुईवा गट) ही फुटिरतावादी संघटना व भारत सरकार यांच्यात गेली १५ वर्षे सुरु असलेल्या प्रदीर्घ वाटाघाटीतून नागालँडच्या प्रश्नावर समाधानकारक तोडगा निघाल्याचे या लेखात म्हटले होते. असा तोडगा दृष्टीपथात असून कोणकोणत्या मुद्द्यांवर तडजोड होणार याचे संकेत मिळाले आहेत, अशा स्वरूपाची बातमी 'ईशान्यवार्ताच्या' सप्टेंबर अंकात प्रसिद्ध झाली होती. त्यामुळे लोकसत्तात त्या बातमीला दुजोरा मिळूनही आजपर्यंतचा इतिहास पाहता खरोखरच अशी तडजोड झाली असेल का? ही शंका वाटत होतीच.

दुर्दैवाने ही शंका खरी ठरली आहे. भारतीय राज्य घटनेच्या अंतर्गत तडजोड करण्यास हा गट तयार असल्याचे वरील बातमीत म्हटले होते. मुळात ही बातमी इंडियन एक्सप्रेसच्या १५ ऑक्टोबरच्या अंकात प्रसिद्ध झाली होती.
परंतू लगोलग दुसऱ्याच दिवशी म्हणजे १६ ऑक्टोबर रोजी एन्.एस्.सि.एन च्या सूत्रांनी ही बातमी खोडसाळ व गैरसमज पसरवणारी आहे असे म्हणून फेटाळून लावली. "आम्हाला जर भारतीय घटना मान्य करायची असती तर १९७५ च्या शिलाँग करारावर आम्ही तेव्हाच सह्या केल्या असत्या आणि गेली १५ वर्षे वाटाघाटीचे गुऱ्हाळ कशाला घालत बसलो असतो?" असाच प्रश्न या सूत्रांनी विचारला आहे.

एन्.एस्.सि.एन च्या खालपांग (K) गटानेही तडजोडीसाठी प्रयत्न करणाऱ्या 'नागालँड विधानसभा प्रतिनिधी मंडळा'च्या दाव्यांपासून स्वतःला दूर ठेवले असल्याची घोषणा केली आहे. नागा प्रश्नाला गेल्या साठ वर्षांचा इतिहास आहे; भारत सरकारशी सुरू असलेल्या गेल्या १५ वर्षांच्या वाटाघाटींशी आम्हाला काही देणे-घेणे नाहि, 'नागा' प्रदेशाचे सार्वभौमत्व या मुद्द्यावर आम्ही अजूनही ठाम आहोत. त्यामुळे 'अंतीम तोडगा काढण्यासाठी पर्यायी व्यवस्था म्हणून सर्व विधानसभा सदस्य राजीनामा सादर करतील' या प्रतिनिधी मंडळाच्या निर्णयाला आमची बिलकुल मान्यता नाही. जर वाटाघाटीत आम्ही पक्षकार नाही तर तडजोडीचा प्रश्न येतोच कुठे?' असेही खापलांग गटाने विचारले आहे. (नागालँड पोस्ट - संपादकीय, १६ ऑक्टोबर २०१२)

जरी सर्व नागा संघटनांचा ( NCC, NSCN, NSCN (IM), NSCN (K), NSCN (K,Z) ) एकोपा होऊन तोडगा निघाला, तरी मणिपूरचे काँग्रेसचे मुख्यमंत्री इबोबीसिंह यांची भूमिका फार महत्वाची ठरणार आहे. वरील संभाव्य तोडग्याला मणिपूरच्या खोऱ्यातील जनतेकडून आताच विरोध सुरू झाल्याच्या बातम्या आहेत.

मणिपूरमधील बहुसंख्य डोंगरी जिल्हे सेनापती, तमेंगलाँग, उखुल व चांदेल मणिपूरपासून तोडण्याचा हा डाव आहे अशा प्रतिक्रिया मणिपूरमधून नक्कीच उमटणार आहेत. त्याला इबोबीसिंह कसे तोंड देतात हे पहायला हवं. वरील जिल्हे मणिपूरपासून तोडण्यात येणार नसून त्यांना केवळ अधिक स्वायतत्ता व केंद्राकडून थेट अर्थपुरवठा करण्यात येणार आहे. हे जरी खरं असलं तरी मणिपूरवासियांच्या मनातील साशंकता मुख्यमंत्री कशी दूर करणार यावरच सर्व काही अवलंबून राहणार आहे.
एकूण काय, तर नागा प्रश्न सुटावा व ईशान्येत शांतता नांदावी अशी सर्वच भारतीयांची इच्छा असली तरी एकीकडे सर्व गटांना समझोत्यासाठी तयार करणे व दुसरीकडे मणिपूरच्या भौगोलिक सीमांना कोणताही धोका पोचणार नाही, आजची मणिपूरची भौगोलिक अखंडता यापुढेही तशीच कायम राहील' हा विश्वास मणिपूरवासियांच्या मनात निर्माण करणे आवश्यक ठरणार आहे; तरच नागा समस्येवर कायम स्वरूपी तोडगा निघू शकेल.

मृदगंध — शशांक रांगणेकर

उद्विग्न मनाने पंचमला चल चलतो रे म्हणून मी निघालो. पंचम, स्वामी आणि बंधूंचा हा त्रिकोण इतका बांधीव झाला होता कि मला त्यात कुठूनच प्रवेश नव्हता. याबद्द्ल बंधूंना भेटून त्यांना समजावण्याचा प्रयत्न करावा अस मला वाटलं. म्हणून बंधूंना मी फोन केला. त्यांना सांगितलं कि मला त्यांना भेटायचं आहे. जरूर जरूर कविराज, बंधू म्हणले. कुठे भेटूया? पंचमच्या घरी का? नाही, त्याच्या अनुपस्थितीत मला तुम्हाला भेटायचे आहे. तुमच्या ऑफिसमधे भेटूयात का? ओके सर, बंधू म्हणाले. बरोबर सहा वाजता या. संध्याकाळी सहा वाजता मी बंधूंकडे गेलो. केबिनवर knock करून मी आतमध्ये गेलो. या या कविराज असं प्रसन्नपणे हसून बंधूंनी माझं स्वागत केलं. काय घेणार चहा कि कॉफी? काहीही नाही मला लवकर निघायचं आहे. असं कसं चालेल? प्रथमच येताय तुम्ही. काहीतरी तुम्हाला घ्यावंच लागेल. असं म्हणून दोन कॉफी आण म्हणून ऑर्डर दिली. बोला कविराज काय विचारायचं तुम्हाला? काय विचारावे, सुरुवात कशी करावी हेच कळेना. चला तुम्हाला आम्ही धर्मसंकटात पाडत नाही. आमच्या पंचमचे तुम्ही लाडके मित्र आहात. तुम्ही आम्हाला आमच्या आणि पंचमच्या संबंधाबद्दल जाब विचारायला आला आहात. खरे म्हणाल तर मी किंवा पंचम दोन सज्ञान नागरिक आहोत. आमचे वैयक्तिक संबंध हा कोण्या अन्य व्यक्तीच्या चर्चेचा प्रश्नच होऊ शकत नाही. तरीही आम्ही तुमचा अधिकार मानतो.

आजपर्यंत तुम्ही पंचमला भरवलेल्या दहीपोह्यांच महत्व आम्ही जरूर जाणतो. तुमच्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर द्यायला आम्ही नुसतेच तयार नाही तर बांधिलही आहोत. फक्त आमच्या एकाच प्रश्नाचे तुम्ही उत्तर द्यावं. फाशीची सजा झालेल्या गुन्हेगारालाही त्याच्या गुन्ह्याची ओळख करून द्यावी लागते. कोणत्या गुन्ह्यासाठी जो आम्हाला माहीतही नाही प्रत्येकाची नजर आमच्यावर एकेक खिळा ठोकते आहे? दोन माणसातील जिव्हाळा, तिसऱ्याला आक्षेपार्ह्य वाटावा. कारण काय? ते दोघे लौकिक अर्थाने एकमेकांचे कोणीही नाही म्हणून? त्यांच्या नात्याला कुठलेही लेबल लागत नाही म्हणून? कि त्या दोघांच्या वयात अंतर आहे म्हणून? कारण काय कविराज? सभ्यतेच्या कोणत्याही प्रस्थापित सीमारेखांना न उल्लंघता फक्त स्वामी निष्ठेच्या श्वासावर या पवित्र ब्रम्हकमळात आक्षेपार्ह्य असं आहे तरी काय? पंचम आमचा कोण लागतो किंवा आम्ही एकेमेकांच्या इतके जवळ का आलो आहोत, आमचे एकमेकांशी काय नाते आहे, हे प्रश्न आमच्यापुढंचे नाहीतंच. स्वामींनीच आम्हाला एकत्र आणले आहे आणि त्यांच्यावरची निष्ठा हा एकमेव आधार आहे. कविराज आमच्या दोघांच्या मनात एकाच दैवतावरची भक्ती फुललेली आहे. हे वयातल अंतर आम्हाला कधीही बोज वाटत नाही. उलट पितापुत्राच्या वात्सल्याचा एक शेलाच वाटतो. एकवीस वर्षाचा युवक आमच्या नजरेत एक निरागंस बालकंच दिसतो. रागावणारा, रुसणारा, आपले लाड पुरवून घेणारा, श्रीकृष्णाच्या सर्व रुपात बाल कृष्ण हे सर्वात मनमोहक रूप आहे. कविराज प्रेम, सत्य आणि परमेश्वर अनेक रुपात भेटतात. वाळूच्या रस्त्यावरून चालताना आपल्याच पायाच्या खुणांनी ठसे उमटतात आणि त्यात पाणी भरल्या नंतर रात्री दिसणारे चंद्राचे प्रतिबिंब हाच तुमचा चंद्र असतो. कारण त्याच्या चांदण्याला तुमच्या अस्तित्त्वाचा गंध असतो. आकाशातल्या चंद्राशी आपल काय देणं घेणं? फक्त फरक असतो बघण्याचा. आमच्यासमोर जेव्हा पंचम येतो तेव्हा तो बाळकृष्ण म्हणूनंच येतो. सगळंच विसरतो आम्ही. डोळयांसमोर गोकुळ उभं करणाऱ्या भक्ताला पाहिजे त्या रुपात परमेश्वर दर्शन देतो म्हणतात. म्हणून तर प्रत्येकाचा विठोबा वेगळा असतो. आमचे स्वामीच त्याच्या रुपात आम्हाला भेटतात. त्यांना जी सेवा आमच्याकडून करून घ्यायची आहे ती सर्व लाड ते आमच्याकडून करून घेतात. त्यांच्या इच्छेनेच त्यांनी हा प्रेषित आमच्याकडे पाठविला आहे आणि त्याचे लाड करणं, बाल रुपाकडे पाहणं हि आमचीच नव्हे तर स्वामिंचीही इच्छा दिसते. ज्या आमच्या सख्याला हाक मारून मारून आम्ही थकलो तो जर या रुपात आम्हाला भेटायला आला तर या रुपाला नाकारण्याचे करंटेपण आम्ही कसे करू शकतो?

बंधू, ज्याला तुम्ही परमेश्वराचे रूप मानता तो एक सर्वसामान्य माणूस आहे. माझ्या सारखाच एक तरुण आहे. सिगारेट ओढणारा. कधीकधी दारू

पिणारा. समवयस्क मित्रांबरोबर आणि मैत्रिणींबरोबर रमणारा. हा तरुण तुम्ही जेव्हा बघाल, त्याचे ते दर्शन तुम्हाला रुचेल का? वास्तवाच्या काठीच्या तडाक्याने तुमच्या मनातल्या या बाल कृष्णाच्या मूर्तीचा चक्काचूर तर होणार नाही ना? मोठ्या ममतेने या बालकृष्णाच्या चेहऱ्यावरून हात फिरवताना सत्य परिस्थितीचे दाढीचे खुंट तुमच्या हाताला टोचायाचे तर नाही ना? बंधू विचार करा. कल्पना आणि भावनांच्या पंखांवर कितीही भराऱ्या मारल्या तरीही वास्तवाच्या एका बाणाने तो पक्षी मातीतल्या धुळीत तडफडेल. तुमच्या या प्रेषिताचे पंख सोन्याचे असले तरीही पाय मातीचेच आहेत. हा कसला वेडा अट्टाहास.? एका सर्वसामान्य माणसाला देवाच्या रुपात पाहण्याची वृत्ती हि विकृतीच आहे. तुमचे वय काय, त्याचे वय काय? तुमच्या दोघांच्यामध्ये ते अंतर एखाद्या कालिंदीच्या प्रवाहासारखे वाहते आहे. ते तुम्ही कसे पार करू शकाल. बंधू खरोखरच तुम्हाला बजावतोय या वयातल्या अंतराच्या कालिंदीच्या भोवऱ्यात तुमच्या कल्पनेतला हा बाळकृष्ण तुम्हाला बुडवूनही टाकेल. बुडत्याला काडीचा तरी आधार असतो. तुमच्या दोघांतल्या शाब्दिक कलाकुसरीवर उभे राहिलेले हे नातेसंबंधं तुम्हाला कसलाही आधार देऊ शकणार नाहीत. दोघांच्या वयातल अंतर कधीही संपणार नाही. ज्याला तुम्ही परमसखा म्हणता तो तुमचा साधा मित्रही होऊ शकत नाही. नियतीची चूक सुधारण्याची चुक करण्याचा प्रयत्न करू नका. कारण त्या चुकीला माफी नसते आणि शिक्षा एकच असते. ती म्हणजे एकटेपणाच्या ज्वालेचे दाहक वास्तवाचे चटके. बंधू हात भाजतील तेव्हा त्यावर फुंकर घालायला काय पण थुंकायलाही हा तुमचा बाळकृष्ण तयार नसेल. कुठल्याशा मोरपंखीसाठी हा तुमचा बाळकृष्ण तुमच्या भावविश्वाचं घर सोडून आकाशात भरारेल तेव्हा तुमचं एकटेपण तुम्हाला जाळेल. सर्वसामान्य जगात राहणाऱ्या माणसाला जगाचे सर्व नियम पाळावेच लागतात. नाते संबंधांच्या यमुनेलाही नियमांच्या किनाऱ्यांच्या आतच वाहावं लागतं. फक्त शब्द आणि भावनांच्या आधारावर उभारलेले हे नाते संबंध वाळूच्या किल्ल्यासारखे कोसळून पडतात.

बंधूंच्या चेहऱ्यावर रागाची एकही छटा नव्हती ,माझ्याकडे बघून ते म्हणाले "कविराज क्षमा करा पण तुमच्या या सल्ल्याचा आम्हाला राग येत नाही पण आम्हाला तुमची कीव येते. शब्द सृष्टीचे अनभिषक्त राजे तुम्ही आणि तरीही शब्द आणि भावनांची ताकद विसरता? कविराज शब्द म्हणजे केवळ स्वर आणि व्यंजनांचे वंध्या मैथुन नव्हे तर तो असतो एक उत्त्पती यज्ञ. ज्या विश्वात तुम्ही आणि मी आहोत त्या विश्वाची उत्पत्ती एका ओंकारातून झाली आहे हे तुम्ही विसरलात का? आम्हाला आमच्या ह्या प्रेषिताची सुवर्ण कांती जेवढी भावते तेवढाच त्याच्या मातीच्या पायाचा मृद गंधही. ज्या दैवताने हा प्रेषित आमच्यासाठी पाठवला आहे त्या आकाशापेक्षाही मोठ्या असलेल्या दैवताचे नाते मात्र सदैव मातीशीच

जोडलेले आहे. वयातले अंतर सांभाळून आणि जगाचे नियम पाळून केलेले प्रेम हे बऱ्याच वेळा बुद्धिबळाच्या पटावरचा दूत असतो, जिथला हत्ती सरळच चालतो आणि उंट तिरका. कोणीतरी हरण्यासाठी आणि कोणीतरी जिंकण्यासाठी हा खेळ चालतो. ज्या खेळात हार आणि जीत नसतेच त्याला कसले यम आणि नियम? यम नियमांचे पालन न करता बहरणारे हे प्रेम जेव्हा भक्तीचे रूप घेते तेव्हाच ते अमर होते. कविराज काहीतरी गल्लत होते आहे तुमची. 'प्रणय आणि पराक्रमाचे' पार लाऊन आमचा पंचम मयूरपंखीच्या शोधात भरारी मारेल हे आम्हाला माहितीच आहे. तो हि आमचाच पंचम असेल पण आमच्या कुशीत शांतपणे पहुडलेला आमचा बाळकृष्ण मात्र आम्हाला सोडून कधीही जाणार नाही. भावना आणि भक्तीच्या पान्ह्यावर पोसलेला हा बाळकृष्ण मात्र सदैव आमच्या हृदयातच राहील.

कविराज ज्या देवाला तुम्ही कधी पाहिलेही नाही त्या देवाला तुम्ही मूर्तीचे रूप देता आणि त्याची तुम्ही भक्ती करता. चराचरी परमेश्वर पसरला आहे म्हणून कंठशोष करता पण जिवंत माणसातले परमेश्वर रूप नाकारता. जर जिवंत माणसातले देवत्व जाणवले नाही तर अमुर्तातल्या देवत्वाला कसे जाणाल? पंचम मध्ये आम्हाला दिसणारा बाळकृष्ण आणि तुम्हाला दिसणारा तरुण एकच आहे हे समजायला शंकराचार्यांचा अद्वैतवाद कळण्याची जरुरी नाही. ते ज्ञान आम्हाला अडीच अक्षरांच्या मंत्र बळाने प्राप्त होते. त्या मंत्राला तुम्ही प्रेम म्हणा अथवा भक्ती, अक्षरे अडीचंच. ही अडीच अक्षरे तुम्हाला तुमच्या पलीकडे जाऊन विचार करण्याची साधना करवते. ते माणसाचे माणसावरचे प्रेम असो कि ईश्वरावरची भक्ती ही विविधता एकाच परब्रम्हाची ललिते आहेत हे कळायला हा अडीच अक्षरांचा मंत्र आत्मसात करावा लागतो. म्हणून तर महाकविलाही अगम्य असलेले हे ज्ञान अक्षर ओळखही नसलेल्या संतालाही प्राप्त होते ,

आमच्या मनातला बाळकृष्ण हा फक्त आमचा आणि आमचाच आहे. खऱ्या कृष्णालाही आमचा हा बाळकृष्ण कदाचित दिसणार नाही कारण तो बघायलाही आमचीच दृष्टी लागेल.

भक्ताच्या डोळयाला जसा परमेश्वर पूर्णत्वाने दिसतो तसा कदाचित परमेश्वरालाही दिसत नसेल. म्हणून तर राधा कृष्णाला म्हणते, "तुम राधे बनो श्याम."

राधेच्या डोळयांना जसा दिसतो त्या कृष्णाची मुरलीचे सूर फक्त तिच्यासाठीच घुमतात. त्याच्या मोरपिसाचा साक्षात्कारी स्पर्श फक्त तिच्यासाठीच असतो 'कारण वास्तवाचे काटे तिला कधीच टोचत नाहीत. तिच्यासाठी तिच्या मनमोहन कृष्णाने प्रेमाच्या पायघड्या घातलेल्या असतात.

कविराज जन्मापासून आंधळया असलेल्या सुरदासालाही रंगज्ञान देणारा हा दिव्यस्पर्श फक्त प्रेमाचाच असतो. वास्तवाचे कडक ऊन त्या निळयाची गडद छटा कधीही फिकट करू शकत नाही.

आम्हाला वाटते कि स्वामी त्याच्याच रूपाने आमच्या कडून भक्ती करून घेतात. आकाशातल्या चंद्राचे प्रतिबिंब तळयातल्या पाण्यात स्वच्छ दिसावे तसे ह्या साक्षात्काराचे एक प्रतिबिंब त्याच्याही मनात उमटलेले आम्हाला दिसते. आमच्या भक्तीला त्याच्या रूपाने स्वामीच प्रतिसाद देताहेत असे आम्हाला मनोमन वाटते. त्याच्याच रूपाने ते छोट्या बाळासारखे रुसतात, भरव म्हणून हट्ट करतात, मला थोपटून झोपव म्हणून सांगतात. आमच्या दोघातले प्रेम हे त्यांच्याच इच्छेचे कारण आहे असे आम्हाला वाटते

आणि हे सर्व एकतर्फी नाही पंचमही तेवढ्याच जिव्हाळयाने हे नाते जपतो आहे. आमच्याकडे तो जेव्हा येतो तेव्हा तो खरोखर लहान होऊन येतो. त्याच्या चेहऱ्यावरची निर्व्याजता आमच्या मनातल्या पितृभावना पुकारते. कविराज हे जन्मजन्मांतरीचे नाते आम्ही नाकारूच शकत नाही. त्या जिव्हाळयाच्या महापुरात बाकी सगळया भावभावना वाहून जातात. उरते ते ते फक्त ह्या नातेसंबंधांचे एक दृश्य रूप. कविराज तुम्हीच सांगा आमचे काही चुकते का? एवढ्यात पंचमच दरवाजा उघडून आत आला. त्याचे माझ्या कडे लक्षही नव्हते. "बंधू भूक लागलीय आम्हाला", त्या निरागस चेहऱ्यावर एक भुकेजलेले बालक विराजत होते.

## पट्टागडाची एक उनाड भटकंती

चेतन र. राजगुरू

ट्रिंग ट्रिंग .......... ट्रिंग ट्रिंग

चेतन :- हेलो..हा सुबोध बोल..

सुबोध :- अरे चेतन यार ..कंटाळा आलाय..ट्रेकला जायचं का ?

चेतन :- कुठे ?

सुबोध :- पट्टागडला ..चल एक दिवस राहून येवू तिकडे. खूप बोर झालोय. नुसत काम काम काम ..

चेतन :- हो यार मी पण कंटाळलो आहे. नुसते काम काम काम .. चल जावूया ..कधी जायचं ?

सुबोध :- उद्या रात्री निघू .... १ ला. रविवारी घरी येवू ? येताना जेवनाच समान घेऊन ये

चेतन :- बर ठीक आहे ... तू अंथरून पांघरून घे .

पट्टा गडाची ती उनाड भटकती ...तस ती भटकंती म्हणता येईल कि नाही माहित नाही ..पण माझ्या घरच्यांच्या मते आणि मित्रांच्या मते आणि माझ्या मते तरी ती एक अंगातली मस्ती हेच आहे. कारण दुर्गभ्रमण म्हंटल कि आम्ही दोघे उतवालेच. एका पायावर तयार. तसे एका मित्राची कमी खूप भासत होती. मकरंद केतकर ..मक्या ..आमचे पंत , पण तो नाही येऊ शकला. असो.. तर हि भटकती आहे पट्टा गडाची दिनांक २२ जुन २०१२ रोजी कामावरून थेट मी ठाणे गाठले . अन रात्री १:०० ला आम्ही पट्टा गड येथे प्रस्थान केले . रात्रीची वेळ म्हणून गाडी सावकास हाणत होतो. मस्त चांदण पडल होत. अन थोडी थंडी हि. मनात थोडी भीती कि..पाऊस पडायला नको. तसे आम्ही तयारीतच होतो पण मनाला ते नको होते.

ठाणे -कसारा -नाशिक रोड ह्या महामार्गावरून आमची भटकंती चालू होती. सकाळच्या पहाटेला ३ :०० च्या दरम्यान आम्ही कसारा घाट पार केला . कसारा घाट ते इगतपुरी या रस्त्यावर धुक्यांनी तांडव घातले होते. तेथून पुढे आम्ही घोटी मार्गे भंडारधरा च्या मार्गी कूच केले. रस्ता तसा नवीनच होता ..म्हणून हळू हळू अन पाट्या बघत बघत निघत होतो.

पट्टागडाला जाण्यासाठी मुंबई -नाशिक महामार्गावर इगतपुरी नंतर घोटी हे गाव आहे. घोटी गावातून एक रस्ता सिन्नरला जातो. अन याच रस्त्यावर भंडारदरयाला एक फाटा फुटतो. भंडारदऱ्याच्या रस्त्यावरून जाताना डावीकडे टाकेद गावाकडे जाणारा रस्ता लागतो. घोटी ते टाकेद गावात पोहचण्यास पाउन तास लागतो.टाकेद गावाच्या बाहेरच प्राचीन राम मंदिर आहे. अन त्याच मंदिर संकुलनात जटायुचे मंदिर हि आहे.

रामायणातील जटायुने रावणाशी युद्ध करून इथेच प्राण सोडला अशी येथील लोकांची श्रद्धा आहे. पण हे बघणे आम्ही येताना करायचे ठरवले आणि कोकणवाडीचा रस्ता विचारात पुढे प्रस्थान केले. सकाळचे ४:३० झाले होते. गावातली मानस शेताकडे तर काही सकाळच्या समोपचाराला ( तुळस लावायला ) :) जात होती. ती मज्जा काही औरच :) टाकेदहून राममंदिराला जाणाऱ्या रस्त्यावर उजव्या हाताच्या फाट्यावरून म्हणजेच पुणेरी भाषेत वरच्या अंगाला :) जाणाऱ्या रस्त्यावरून आम्ही पुढे प्रस्थान केले. टाकेद ते कोकणवाडी हे अंतर १ तासाचे आहे .यासाठी टाकेद ते कोकणवाडी अशी जीप सेवा पण आहे. कोकणवाडी येथे पोहचण्याआधी म्हैस वळण घाट लागतो . तो चढत असताना आम्हाला दोनदा विजा कडकताना दिसल्या.

चेतन :- सुबी..भुसकात .... मेला पाउस पडायची वेळ आली रे :(

सुबोध :- शत यार..... अरे पण वीज अशी चमकत नाही रे ..... काही तरी पंगा आहे .

एका वळणावरून दुसऱ्या वळणावर गाडी वळत होती . अन आता सूर्याची किरणे अलगत आकाशातून बाहेर पडत होती. घाटमाथ्यावर पोहचलो तेव्हा कळल कि आम्ही ज्या विजा चमकताना पहिल्या त्या विजा नव्हत्या ट्रान्स फोर्मर फुटला होता . कारण त्या घाटमाथ्यावर पवन चक्क्या बसविल्या होत्या. म्हैस वळण घाट पार करून आम्ही घाटमाथ्यावर आलो. अन थांबलो. कारण वर आल्यावर दोन फाटे फुटतात . एक जातो एकदरा गावाकडे त्याच रस्त्यावर बितनगड हा किल्ला आहे , अन दुसरी जाते कोकणवाडी कडे. पण नक्की कोणती हे आम्हाला रस्ता चुकल्यावरच कळले . कारण म्हैस वळण घाट पार केल्यावर घाटमाथ्यावर पोहचल्यावर डावीकडे वळायचे होते आम्ही उजवी कडे वळलो आणि एकदरा गावाचा रस्ता पकडला . नशीब एक गृहस्त आम्हाला भेटले अन रस्ता विचारण्याची सद्बुद्धी आम्हाला देवाने दिली. परत मागे वळून कोकणवाडीचा रस्ता पकडून पट्टावाडी कडे निघालो. याच रस्त्यावर भले मोठे असे पवन -चक्क्या बसवल्या आहेत. कोकणवाडी ते पट्टा -वाडी हे वीस मिनिटाचे अंतर पार करून आम्ही पट्टा - वाडी जे किल्ल्याच्या पायथ्याचे गाव आहे तिथे पोहचलो साधारण सकाळचे ५:३० झाले होते. पट्टा - वाडी हे गावच मुळातच डोंगराच्या पठारावर बसलेले आहे. गावातील लोकांना रस्ता विचारून आम्ही गाडी जितकी वर नेता येईल तितकी वर नेली . गावातूनच किल्ल्यावर जाण्यास वात आहे. गावातून किल्ल्याच्या माथा गाठायला अर्धा तास पुरेसा आहे . पण आम्ही १ तास लावला. किल्ल्याची पाहणी करत..फोटो काढत..अन अफाट असे बुरुज पाहत पाहत वर जात होतो.

पट्टा-वाडीतून पायऱ्याच्या वाटेने वर आल्यावर दोन गुहा लागतात. यातल्या एका गुहेमध्ये एका साधूचे वास्तव आहे . ती गुहा कुलूप बंद होती म्हणून आम्ही राहण्यासाठी दुसऱ्या गुहेकडे गेलो. पण ती सुद्धा बंद होती. :( ह्या गुहांच्या पुढेही काही गुहा होत्या.पण त्या वापरत नसल्याने त्यांची अवस्था वाईट होती. गुहेच्या बाजूला एक देवीचे मंदिर होते अन त्याच्याच बाजूला पाण्याचे स्त्रोत सुद्धा होते. आम्ही इथेच राहण्याचे ठरवले. अन पुढे किल्ला पाहण्यास निघालो. गुहा जवळून जाणार्या पायऱ्याच्या वाटेने वर चढताना मध्ये तट-बंदीचे अवशेष दिसले. पायऱ्या चढून वर गेल्यावर उजवीकडे उत्तरमुखी प्रवेशद्वार दिसले. त्याची ती कमान अजूनही शाबूत आहे. प्रवेशद्वाराच्या उजव्या बाजूला बुरुज आहे. प्रवेशद्वार पाहून वरच्या दिशेने जाताना कातळात खोदलेल्या पायऱ्या दिसल्या. त्याच्याच पुढे एक पाण्याचे टाके आहे. त्यातले ते पाणी पिण्यायोग्य होते. टाक्यापासून वर आलो कि ८भूज म्हणजेच अष्टभूज देवीचे मंदिर आहे. सध्या त्या मंदिराचे कामकाज चालू होते. मंदिर पाहून आम्ही मग वर चढत गेलो. अन तिकडे एका प्रशस्त इमारतीपाशी येऊन थांबलो . "अंबरखाना " ती प्रशस्त इमारत . काळया पाषाणात या अंबरखाण्याची बांधणी केली होती. आत मध्ये होते, पण राहता येईल असे नव्हते. आत मध्ये जनावरांनी त्याचे गोठे केले होते. शेन शेन शेन... सगळीकडे

सुबोध:- आयला इथे राहायचे का ?

चेतन:- खाली जावून पाणी घेऊन ये..मी शेन सारवून तुला झोपायला जागा करतो ...मेल्या काही गरज नाही..खाली झोपू.पाण्याचा स्त्रोत हि जवळच आहे.

अंबरखाना पाहून आम्ही वरच्या दिशेने चालत गेलो आणि किल्ल्याच्या माथ्यावर पोहचलो. ह्या कील्ल्याचा माथा म्हणजे एक प्रशस्त पठाराच आहे. माथ्यावरून डावीकडे पहिले कि औंध किल्ल्याचा सुळका अन त्याच्या खालच्या बाजूला धुक दिसत होत. आम्ही आधी उजवीकडे जाण्याचे ठरवले. अ न्जेवून आराम करून संध्याकाळी डावीकडे फिरू असे ठरले. औंध किल्ल्याच्या दिशेने चालत असताना दोन मोठी पाण्याची टाकी लागली..पण त्याला हि कोरड पडली होती. आम्ही राहण्यासाठी गुहा शोधात होतो. कारण वाचले होते कि याच टाक्यांच्या पुढे १२ टाकी लागतात अन तिकडे काही गुहा आहेत. आम्हाला १२ टाकी दिसली पण गुहा नाही. हा पण त्या पठारावर बिळच बीळ खूप दिसली. मला वाटले खेकड्यांची घर असतील पण कसलं काय .... नुसत हे मनात आल आणि समोर पाहतो तर काय ..एक सर्प राजे एक बिळातुन बाहेर निघून दुसऱ्या बिळात शिरले. तिथेच ठरवले. सुबोध आता वर नाही खालीच जावून राहायचे. १२ टाकीच्या पुढे जो रस्ता लागतो तो थेट औंध च्या किल्ल्यावर जातो. तिथे न जाता आम्ही खालच्या बाजूस उतरलो कारण धुक्याच्या आड आहाला खालच्या बाजूस हि पाण्याच्या टाक्या दिसत होत्या. पण ते खाली उतरताना तेथील वार्याने आम्हाला चांगलेच झोडपले . कसला तुफान वारा वाहत होता. आम्ही पाठी ढकलले जात होतो. कारण पट्टा-गडाचा आकारच असा आहे कि..हवा हि खालून वरच्या अंगाला येते अन खालच्या अंगाला पूर्ण पठार तेथून बेभान होऊन सुटते.

तसा हा किल्ला मध्यम श्रेणीत पडतो, किल्ल्याची डोंगररांग हि कळसू बाईच्या रांगेत येते. किल्ल्याची उंची साधारण ३५०० ते ३८०० फुट इतकी असेल. सह्याद्रीच्या उत्तर दक्षिण रांगेची सुरवात हि इगतपुरी पासून सुरु होवून थळ -घाटाच्या पूर्वेकडे जाते.याच रांगेला कळसू-बाई रांग म्हणतात. याच रांगेच्या पश्चिमेला अलंग,मदन,कुलंग,कळसू-बाई तर पूर्वेच्या दिशेला औंध,पट्टा ,बितनगड हे किल्ले आहेत. याच किल्ल्याला दुसरे एक नाव आहे. "विश्रामगड "

त्या बेभान सुटलेल्या वाऱ्यातुन एक ४रोली सुचून गेली ..अरे गड्या शब्द हो हवा हवास वाटणारा .....नको होवूस वादळवारा, सगळ काही मोडणारा

हे सारे पाहून आम्ही खालच्या दिशेने निघालो. गुहेत आलो. अन सकाळच्या न्याहरीची तयारी करायला लागलो. "म्यागी" ...............लवकरात लवकर अन पोटभरून खाता येईल अस हे आमचा नाश्ता .

नाष्टा अन चहा घेवून आन सार आवरून आता थोडी झोप घेवू. दुपारच जेवण बनवून संध्याकाळी डावीकडचा माथा बघायला जावू असा फुलप्रूफ प्लान बनवला. पण त्या प्लानला नजर लागली. ८ -९ च्या दरम्यान आमच्या त्या नाश्त्याच्या वेळात असा वास त्या म्यागीचा किल्ल्यावर दरवळला होता. अन त्याचाच हाहाकार आमच्यावर मजला होता. ९:१५ ते १०:१५ हे एक तासाची झोप ,अन चांगल्या तंद्रीत असताना माकडांनी आमचा पाहुणचार केला. किसका कूच तो किसका कूच..... :( झोपेच खोबर केल कारण त्यांना हि त्या वासाने चत लावली होती. जोरजोरात मंदिरातील शिखा वाजवीत होते . मोठमोठ्याने ओरडून आम्हाला घाबरवत होते. ४५ मिनिटाच्या या तांडवात आम्ही माघार घेतली.

सुबोध :- चेत्या ..हि काय झोपून देणार नाही आपल्याला ... चीताळली कि चावायला पण कमी करणार नाही.

चेतन :- हो रे सुब्या ... च्यामारी त्या पिल्ल्याच्या अंगात किती मस्ती बघ न..त्याला राग काय दिला..त्याच्या बापाला घेऊन आला. हा ..च्यामारी सिंघम आठवायला लागला.

हा किल्ला माझा आहे ..अन मी या किल्ल्याचा जयकांत शिकारे :(

सुबोध :- काय करायचं ?

चेतन :- निघायचं ..नाहीतरी..जेवणाच्या सामानात तेल नाही घेतलं आहे आपण :( अन आज शनिवार गावात पण कुणी तेल देणार नाही आपल्याला . त्यापेक्षा निघू.

दोघांच सहमत जुळल आन गाठोडी भरायला घेतली. मी माझ गाठोध भारत असताना सुबोध ताठ वाजवत होता ... आणि नंतर तो त्याच गाठोड भरत असताना मी ताठ वाजवत होतो. ब्याग भरून अन डोळयांवर प्रचंड झोप घेऊन आम्ही त्या गुहेच्या बाहेर पडलो. पुन्हा ठरल्याप्रमाणे आम्ही किल्याच्या माथ्यावर आलो अन डावीकडचे काही वास्तूंचे अवशेष पाहायला गेलो. गडाच्या डाव्या बाजूच्या टोकावर भव्य बुरुज आहे, हा बुरुज आपल्याला पायऱ्या चढताना डाव्या बाजूला दिसून येतो. त्याच्या पुढे गेल्यावर काही झाडी आहेत. तिथे प्रातविधी उरकून ..आम्ही परत सुरवातीच्या गुहेपाशी आलो. संपूर्ण गडमाथा फिरायला २-३ तास पुरेसे आहेत. माकदांमुळे झोपेच खोबर झाल... अन दुपारच्या १२ च्या ठोक्याला परत एकदा घराकडे प्रस्थान केले. थोडेसे छायाचित्र काढून अन गावाची माहिती घेऊन आम्ही पुन्हा टाकेद गावाकडील जटायूच्या मंदिराकडे आलो. मंदिर सुरेखच होते, श्री रामाने जटायुला पाणी पाजण्यासाठी जमिनीत बाण मारून केलेला झरा आणि पाण्याचे कुंड तेथे आम्हाला दिसले. पहिले २ ठीक होते ... नंतरचे २ कुंड हे खराब केले होते. तेथील दर्शन घेवून गाडी घोटीच्या मार्गे लागून कसाऱ्याच्या दिशेने लागली.

कसारा घाट उतरून आम्ही एका धाब्यावर जेवणासाठी थांबलो. डोळयावर प्रचंड झोप होतीच.. पण काय करणारा आमच्या अंगातले ते किडे ना.... थोड सोसायला हवाच. मस्त पेट भर खाके..गाडी ठाण्याच्या दिशे कडे कूच केली.

सुबोध :- चेत्या ...इला जेवण करून झोप वाढली रे :)

चेतन :- हो... माझी तर झोप पण पूर्ण झाली नाही.... आता खल तर बर वाटत आहे .

सुबोध :- तुला बर वाटत आहे ? :) छान ...मग गाडी आता तू चालव

चेतन :- :o ...... इला हे भारी आहे....

सुबोध :- अरे घे गाडी..अन पळव ...झोपायचं आहे आता मस्त घरी जावून ...ते हि ताणून .

भ्रूम म्म्मम भ्रौम्म्म ....

संध्याकाळी ६ च्या ठोक्यावर ठाण्यातील खोपट गाठले. सुबोधच्या घरी गेलो. ब्याग बाजूला ठेवून ...चटई -चादर हांथरून मस्त झपी गेलो. अंगातले किडे ...ते आमच्या .....ते हि त्रासले होते..आमच्या ह्या अश्या वागण्याला :) थेट सकाळीच जाग .ती पण १० वाजता ..भ्रमण-ध्वनी जवळ घेवून पहिले तर ३२ मिस कॉल होते. .

पण हे सारे भुलून ...कालच्या प्रवासात मन अगदी रमून गेल होत.

आयुष्य म्हणजे एक सांजवेळ.... , कळसू-बाईच शिखर , क्षितिजावरचा सूर्य आणि आपला तो जिवलग मित्र.

कूच और हि बात होती हे :) ....

पट्टागड ..एक उनाड भटकंती ...संपूर्णम

## जी बी जे जे

श्रीपाद पु. कुलकर्णी



सिनेमाची नावं नसतात का.. डी.डी.एल्.जे., के.के.के.जी... अन ते एच्.ए.एच्.के. वगैरे..तसंच या गोष्टीचं नाव जी.बी.जे.जे. म्हणजेच 'घर बसल्या .जिंकाल जग'. बरोब्बर
.कौन बनेगा करोडपतीचा "जॅकपॉट" प्रश्ण... त्याला आमच्या दामूनं कसं 'लोटपोट' केलं त्याचाच हा किस्सा

त्याचं झालं असं की नेहमीप्रमाणेच दामूला ऑफिसमध्ये काहीही काम नव्हतं. आपलं काम आपलं कसं नाही हे दुसऱ्यांच्या गळी उतरवण्यात पटाईत असलेला तो एक गव्हर्नमेंट 'सुरवंट' असल्यामुळे कायम आपल्या ठरवून दिलेल्या कार्यकोषात (आणि आपल्या लायकीप्रमाणे उपलब्ध करुन दिलेल्या 'कोषागारा'त संतुष्ट राहून) काम करणारा आणि बाक़ी वेळात काम न करून कुणालाही उपद्रवी न ठरणारा असा दामू एक कादंबरी वाचता वाचता पेगू लागला. नुकतंच झालेलं जेवणही गुंगी आणायला कारणीभूत होतच. रामूला पाणी आणायला सांगून तो नुकताच कादंबरी उघडून वाचू लागला .होता

डिपाडी डिपांग..डिचिपाडी डिपांग.. दामूचा मोबाईल वाजू लागला तसा त्यानं तो आळस देत उचलला आणि "हॅलो...." असं जांभईमिश्रीत उच्चारत .त्यानं तो घेतलाही

"..दामू दांगटजी"
.हांजी... " दामूनंही जी ची री ओढली"
"...मै अमिताभ बच्चन बोल रहा हूं... कौन बनेगा करोडपतीसे"
"...दामूला खरं वाटेना. तो संशयी आवाजात बोलू लागला, "अरे, आता अमिताभच्या नावानं पण
".... जी मै सचमुच"
हे बघा, माझ्यापुढं तुमचा हा मार्केटिंग कॉलचा गनिमी कावा चालणार नाही.. अमिताभसारख्या शहेनशाहला तुमचा सेल्समन कशाला बनवू"
".पाहता आणि तसं भासवून आम्हाला तरी कशाला बनवू पाहता... उगा माझी झोपमोड
".देखिये, आप गलत मोड पे जा रहे है... मै अमिताभ बच्चनही बोल रहा हूं"
"कसं ग्राह्य धरू मी ते?"
"..गाणं म्हणून दाखवू का... मेरे अंगने में"
"ते काय सुदेश भोसलेनं म्हणलं तरी अमिताभच्या नावावर खपवतात..."
"..हे बघ.. रिश्ते में तो हम तुम्हारे बाप लगते हैं..नाम हैं शहेनशाह"

"..छे! काहितरीच काय.. आमचं मायबाप सरकार एकचं आम्हाला काम न करताही वेळच्यावेळी पगार देणारं.. कोणाला हवाय इथं शहेनशाह"
मग काय आता मास्टर भगवानटाईप नाच करू का.. पण तो तुम्हाला फोनवर कसा दिसणार आणि नाच दिसला असता तर अख्खा मी नसतो का"
दिसलो... " अमिताभचा वैतागलेला आवाज ऐकून दामूनं जास्त न ताणण्याचा निर्णय घेतला आणि तो म्हणाला, "जाऊ दे... ते डायलॉग म्हणून
दाखवा नं..'आय कॅन वॉक इंग्लीश...आय कॅन टॉक इंग्लीश..' वगैरे वगैरे..." अमिताभनं तेही निभावलं आणि मग दमलेल्या आवाजात दामूला
,विचारलं
"अब हो गयी तसल्ली?"
वा,वा, अमिताभजी, धन्य भाग हमारे, आप फोन पे पधारे, कानों में तरंग, मन में उमंग, खुशी की आयी बहारे. " दामूचं हे ऐकून अमिताभ काही"
.सेकंद अवाक्
.आपको मालूम था क्या हमारा फोन आनेवाला है करके.. " अमिताभनं खोचकपणे विचारलं"
".नाही.. ही तर नुकतीचा झालेली प्रसुति.. ज्याची केली मी प्रस्तुति"
.प्रसुति.... प्रस्तुति....?" अमिताभ"
म्हणजे तुमची सून म्हणजे आपली ऐश्वर्या हो..ती ज्याची वाट पाहतेय.. ती प्रसुति..तशी मला कविता झाली..ही आत्ताच आणि लगेच तुमच्यापुढं.."
".म्हणून दाखवली म्हणजे प्रस्तुत केली
हं हं म्हणजे तुम्ही कविता जन्माला घातली, तीही फोनवर आत्ताच्या आत्ता.. " हे हिंदीत बोलले अमिताभजी. "तुमच्या प्रतिभेला प्रणाम..." हेही"
.हिंदीचं भाषांतर
"शीघ्रकवीजी हम आपको शीघ्रही बताना चाहते हैं की आपने घर बैठे जीतो जॅकपॉट में १ लाख रुपये जीत गये हैं..."
साला मैं तो साहब बन गया..." दामू हर्षोल्हासात गाऊ लागला तसं त्याला अडवत अमिताभनं सांगितलं, "दामूसाहब, आप और भी धनराशी"
"?जीत सकते हैं अगर आपने हमारे जॅकपॉट सवाल का सही जवाब दिया तो.. और ४ लाख रुपये.. बोलिये पढू सवाल
त्याचं काय आहे नं... माझं नशीबाशी आहे जरा वितुष्ट, जे मिळालंय त्यात आहे मी संतुष्ट." अमिताभ आणि पब्लिकचा हसण्याचा जोरदार आवाज."
,दामू पुढं बोलत राहिला
"..खरंच. चेष्टा नाही.. मी धावलो घ्यायला जॅकपॉट तर हातात यायचा खाली पॉट.."
"अरे ऐसा क्युं कहते हो, दामूजी ?"
"".नाही हो, २० रुपयांचं लॉटरीचं तिकिट घेतलं तर १० रुपये पण लागत नाहीत"""
ये आपका नसीब नहीं, दामूजी, ये आपका सोचकर्म हैं... २० रुपये के लॉटरी पर १० रुपयेका सपना देखना ये मराठी मिडलमन का सोचकर्म हैं.""
"..हमारे कॉम्प्युटरने लाखों में आपको चुना ये आपका अच्छा नसीब ही हैं ना?"" अमिताभचं बोलणं चालूच राहिलं
आपका नसीब भी आज खुल सकता हैं...खाली पॉट फुल हो सकता हैं.. ऍं..मैं भी आप जैसा बोलने सीख गया." अमिताभनं आपला टिपिकल"
.पर्सनल टच दामूला दिलाच..."अभी आपके लिये ये जॅकपॉट सवाल.." दामूच्या हो..ना..ची वाट न पाहता अमिताभनं प्रश्ण मांडायला सुरुवात केली
इनमेंसे किसका पहिया पंक्चर नही होता हैं... और आपक पर्याय हैं.. अ)बस ब)स्कूटर क) एअरोप्लेन या ड) रोडरोलर?.. जल्दी कीजिये.. ३०"
"...सेकंद
.हो हो माहितीय..ते अर्ध्या मिनिटात संपतील.. अरे, ह्याचं उत्तर तर शेंबडं पोरसुद्धा देईल." दामूनं अमिताभला तोडत म्हंटलं.."
".म्हणुनच तर तुम्हाला विचारला हा प्रश्ण.. " दामूला तोंडात मारल्यासारखं झालं. पण पुढच्या क्षणी तो उत्तरला, "एअरोप्लेन.. सिंपल"
ये गलत हो गया, दामूजी.." अमिताभ. दामूला जरा गरगरलं, पण लगेच सावरत तो गुरगुरला, "छे. बाक़ी सग़ळे पर्याय रोडवरचे म्हणजे.. आपले"
रोड गाडया मोडण्यासाठी किंवा पंक्चर होण्यासाठीच बनवलेले असतात..पण विमानाची चाक अशातशा रोडवर लॅंड होतच नाहीत आणि
यदाकदाचित दुर्दैवानं झालीच तर ती एकदम बर्स्टच होतात..पंक्चर नाही होत." दामू स्पष्टिकरण देऊन दम खाऊ लागताच अमिताभनं दामूला
हवेतनं रस्त्यावर उतरवत सांगितलं.. "पर रोडरोलर के पहियोंमें ना तो टायर होता हैं ना रबर ट्यूब.. वो कैसे पंक्चर होगा?" सारं पब्लिक हसू
..लागलं, तसा दामू वरमला आणि मग पिसाळलाही
"..चलो, जाने दो वो जॅकपॉट.. मेरा लाख रुपया दे दो"

.वो भी चला गया गलत उत्तर दिया तो.." अमिताभनं दामुची सारी हवा काढून घेत म्हंटलं"

.अरे, ते कुठं सांगितलं होतं तुम्ही मला..." दामूनं बाजी उलटवण्याचा केविलवाणा प्रयत्न केला"

".आप मेरे ३० सेकंद का हिसाब करने में व्यस्त थे तब मैं वही तो बता रहा था श्रीमान"

...नाही.. नाही.. हे चीटिंग झालं... घर बसल्या जिंकायच्या जगावर तुम्ही असं पाणी नाही ओतू शकत..." दामू जीवाच्या आकांतानं ओरडत होता"

पाणी... दामूच्या चेहऱ्यावर पाण्याचे थेंब उडाले तसा तो जागा झाला. रामूनं पाण्याचा जग दामूच्या पुढ्यात टेबलावर आपटला होता आणि भयचकीत होऊन त्याच्याकडं बघत होता. 'सालं हे सारं स्वप्नच तर...' ठीक आहे..काही कमावलं नाही अन काही गमावलं नाही यातच दामूनं .समाधान मानलं आणि त्यानं रामूकडं दुर्लक्ष करत पाणी पिऊन घेतलं

तेव्हढ्यात काणेबाई किंचाळत आल्या,

बर्फी काढा दामूमामा..." दामूच्या प्रश्णार्थक चेहऱ्याकडं बघून हसत त्या म्हणाल्या, "अहो, तुम्ही मामा झालात आज, ऐश्वर्याच्या मुलीचे.." आता" मात्र दामूला हसावं का रडावं कळेना. त्याला एकदम आठवण झाली ती काणेबाई बाळंत झाल्या त्यावेळची. त्यांना मुलगी झाल्याचा निरोप सांगायला दामू जोशीसाहेबांच्या केबीनमध्ये गेला तर ते सांगितल्यावर साहेब त्यालाच म्हणाले, "कॉंग्रॅच्युलेशन्स.." दामूला काय प्रतिक्रिया द्यावी कळेना.. 'मी काय केलं यात' असा कन्फ्युज्ड चेहरा होऊन बसला त्याचा.. मग साहेबांनीच आपलं बोलणं सावरत त्याला ते अभिनंदन काणेबाईंना पुष्पगुच्छाच्या रुपात पोहोचवायला सांगितलं होतं. ..आणि आत्ता हे सारेजण अमिताभच्या सुनेला म्हणजे 'आपल्या ऐश्वर्याला' मुलगी झाली हो $$ $ म्हणत जल्लोष करत आहेत. अगदी जी बी जे जे..घर बसल्या जग जिंकल्यासारखे. काही का असेना बच्चन कुटुंबानं तर जग जिंकलेलंच आहे. .आता ऐश्वर्याचं सारं ऐश्वर्य त्या 'बच्ची'ला मिळो म्हणजे झालं असा जागतिक दर्जाचा विचार मनात येऊन दामू स्वतःच भारावून गेला

तेव्हढ्यात दामूला आठवलं, अरे, आज राजा दामलेचा वाढदिवस. त्यानं लगेच त्याला फोन लावला, "राजा, वाढदिवसाच्या शुभेच्छा.... हो ते समजलं ना... अभी-ऐशला मुलगी झाली.. काय? 'आयडिया' झाली..हा$$हा$$ हा$$.. पण तिचा वाढदिवस सगळयांच्या लक्षात राहणार बरका.. "?अरे, कसा म्हणून काय विचारतोस.. तुझा वाढदिवस तोच तिचा ना

**परंपरा आणि नवता!!** — **अनिल गोविलकर**



सर्वसाधारणपणे आपल्याला कै.विं.दा. करंदीकर हे असामान्य कवी म्हणून ज्ञात आहेत आणि ते तसे चुकीचे नाही. तरीही, गद्य लेखन देखील अतिशय समृद्ध आणि वैचारिक आहे, यात शंकाच नाही. "स्पर्शाची पालवी"," आकाशाचा अर्थ" सारखे ललित निबंध, "राजा लियर","ऑरीस्टोटलचे काव्यशास्त्र" सारखे अनुवाद इत्यादी पुस्तके त्यांच्या व्यासंगाची व्यवस्थित साक्ष देणारी आहेत. याच रांगेत सहजपणे बसणारे पुस्तक म्हणजे, "परंपरा आणि नवता" हा समीक्षा ग्रंथ. या ग्रंथात लेखकाने, विषयाचा नेमका गाभा लक्षात घेऊन, अतिशय तर्कशुद्ध पद्धतीने विचार केल्याचे लगेच जाणवते. अर्थात, पुस्तकाच्या नावाप्रमाणेच, पुस्तकाची सुरवात केलेली आहे. यात काही भाषणे आहेत तर काहीठिकाणी तत्वचर्चा आहे. मुळात प्रत्येक विषयाचे निकष ध्यानात घेऊन, कुठेही कसलाच फापटपसारा न मांडता लेखन केल्याचे .जाणवते. त्यामुळे, वाचन करताना, वाचक सहज त्या विषयात पूर्णपणे गुंतत जातो आणि त्या विषयाची आवड निर्माण होते

पहिलाच लेख "परंपरा आणि नवता" हा आहे. नावातच विषयाची कल्पना येते. आपल्याकडे एक गंमत वारंवार पाहायला मिळते. लिखाण करणारा प्रत्येकजण, मी काही तरी नवीन, अद्भुत आणि क्रांतिकारी लिहिले आहे, अशा राणा भीमदेवी थाटात पुकारा करीत असतो आणि जुन्या चाली-रीती या जीर्ण-शीर्ण झाल्या आहेत, तेंव्हा फेकून द्याव्या, असा आव आणला जातो. खरतर, आपली परंपरा काय आहे, याची नेमकी माहिती लक्षात न घेता, नवीन काहीतरी घडवत आहोत, असा गदारोळ उडवला जातो. याच दृष्टीकोनातून, लेखकाने आपल्या साहित्यिक परंपरा काय आहेत आणि त्यात नवता आणायची म्हणजे नेमके काय करायचे, याबाबत सविस्तर विचारधारा मंडळी आहे. मुळात, परंपरा म्हणजे काय, याचे विवेचन करताना, इतिहास, संप्रदाय, आणि प्रघात या गोष्टींपासून परंपरा कशी वेगळी असते, हे अतिशय सुरेख पद्धतीने लिहिलेले आहे. याच दृष्टीने पाहिल्यावर नवता म्हणजे काय आणि ती नेमकी कशी ठरवावी, याचेही आपल्याला ज्ञान होते. वास्तविक हा विषय अति गहन आहे पण जर का विचारात सुसूत्रता असेल तर, कुठलाही विषय अर्थपूर्ण रीतीने मांडता येतो, हेच या लेखाबद्दल म्हणता येईल आणि दुसरा भाग म्हणजे, या .विषयाला काळाचे कसलेच बंधन नाही. आजची नवता ही उद्याची परंपरा होते, हेच एक प्रमुख सूत्र याबाबत लिहिता येईल

मराठी भाषेवर मर्ढेकरांच्या समीक्षेचा फार मोठा प्रभाव पडलेला आहे, याचे मुख्य कारण मराठीत, "सौंदर्यशास्त्र आणि त्याची मुलतत्वे" या विषयावर पूर्वी कुणीच काहीही लिहिलेले नव्हते. त्यामुळे, अजूनही त्यांची समीक्षा हा सगळ्या समीक्षकांचा आधार आहे. त्यात मतभेद जरूर आहेत आणि ते असणे संय्युक्तिक आहे पण, त्यांना अग्रमान देणे देखील आवश्यक ठरते.मुळात ललित साहित्याची निर्मिती, स्वरूप आणि मूल्यमापन याबाबत काही ठाम स्वरूपाचे निकष आणि विचार, मराठीत मर्ढेकरांनी मांडले, हे तर कुणीही मान्यच करील. मर्ढेकरांनी निर्मितीच्या स्वरूपाविषयी लिहिताना, "सौंदर्यनिष्ठ रहस्य" हा शब्द वापरलेला आहे आणि तो वापरण्यामागील त्यांचे प्रयोजन आणि त्यातील कमतरता याचे यथोचित दर्शन, करंदीकर, मर्ढेकर ही व्यक्ती पूर्णपणे बाजूला सारून करून देतात. याच दृष्टीने "मार्क्सवाद","वर्गकलह" आणि साम्यवाद: या तत्वांचे परिशीलन होते, ते खरोखरच वाचण्यासारखे आहे. साहित्यांतर्गत भावानुभावाचे व्यापक आणि सखोल चित्रण साधणे, हे लेखकाच्या व्यासंगाप्रमाणे त्याच्या प्रत्यक्ष जीवनानुभवावरही अवलंबून असते, ह्या विचारसरणीची नेमकी वैचारिक फोड करून दिली आहे. त्याच्याच जोडीने येणारी नैतिकता आणि आचारतत्व यांचे साहित्यावर कसे परिणाम होतात, हे अभ्यासण्यासारखे आहे. अर्थात हा लेख प्रदीर्घ आहे आणि तो तसाच असायला हवा,

.अन्यथा विषयाच्या सगळ्या अंगाचा परिचय होणे अवघडच होईल. विषय अत्यंत जटिल आहे, हे तर खरेच पण म्हणून नजरेआड करणे योग्य नव्हे आपण साधारणपणे ललित साहित्य आवडीने वाचतो, पण या साहित्याची सांस्कृतिक फलश्रुती काय असते, याबाबत फारशी जाण ठेवत नाही. त्यासाठी मुळात, ललित साहित्य म्हणजे काय, त्याचे कसले निकष असायला हवेत, आणि आपण जी संस्कृती असे जे म्हणतो, त्याच्यावर साहित्याचा कसा आणि किती व्यापक परिणाम होतो, हेच ह्या लेखात वाचायला मिळते. प्रत्येक कालखंडात बरे, वाईट साहित्य नेहमीच जन्माला येत असते आणि त्या साहित्याचा बरा-वाईट असा परिणाम समाजावर नेहमीच घडत असतो. समाजाची संस्कृती ही अशाच काही घटकांवर बेतलेली असते. या विषयात अनेक मतभेद अस्तित्वात आहेत.म्हणजे, शास्त्रीय साहित्य आणि त्यातून उद्भवणारा विकासशिळ विचार, धार्मिक, नैतिक आणि राजकीय हेतूने लिहिलेले साहित्य, ललित साहित्याचे सृजन, आणि सर्वात महत्वाची अडचण म्हणजे ललित साहित्याचे स्वरूप व फलश्रुती याचे नेमका अर्थ ठरविताना होणारे गैरसमज!! त्यासाठीच प्रथम स्वरूप आणि फलश्रुती या पदांचा नेमका अर्थ शोधण्याकडे लेखकाचा कल आहे, हे जाणवते. त्यामागोमाग येणारे, "हेतुगार्भ ललित साहित्य", "जीवन्दर्शी ललित साहित्य", "विशुद्ध ललित साहित्य" असे पोटविभाग करंदीकरांनी मानून, त्यानुसार ललित साहित्याच्या निर्मितीचा विशेष मांडला आहे आणि त्यानुरुपच पुढे लिहिताना, ललित साहित्यात्चे तोकडेपण दर्शवून दिले आहे. या वरती निर्देश केलेल्या घटकांमुळे, ललित साहित्यात जीवनदर्शन नार्याडीत स्वरूपातच येते, हीच ती ललित साहित्याची .तोकडेपणाची नेमकी विचक्षण जाणीव दाखवून दिली आहे

करंदीकर हे मुलत: कवी असल्याने, "काव्य आणि सामाजिक जाणीव" हा लेख येणे क्रमप्राप्तच आहे. मध्यंतरी आपल्याकडे आणि अजूनही त्यात फारसा बदल नाही, असा एक प्रघात पडला होता की, काव्यात जर का सामाजिक जाणीव नसेल तर ते काव्य हिणकस ठरते. याच विचाराचा, इथे करंदीकरांनी प्रतिवाद केला आहे. त्यांच्या मते, "व्यक्ती आणि समाज यांतील संबंधाची काव्यामध्ये व्यक्त होणारी प्रकट किंवा सुप्त जाणीवच अभिप्रेत असते" याचाच वेगळा अर्थ असा की, काव्य आणि सामाजिक जाणीव असे वेगळे फारसे करता येत नाही. आपल्या मुलभूत जाणीवेतच सामाजिक भानाचे प्रत्यंतर येत असते. अर्थात, प्रत्येक कविता ही केवळ सामाजिक तत्वांवर तपासणे अयोग्य आहे. यासाठी, त्यांनी ज्ञानेश्वरांचे पसायदान, रामदासांनी घडवलेले समाजमन पासून केशवसुत ते मर्ढेकर इतका दीर्घ पल्ल्याचा प्रवास थोडक्यात घेतलेला आहे. सामाजिक जाणीव असणे हा एकमेव निकष असणे जसे चुकीचे आहे तसेच केवळ तशी जाणीव काव्यात दिसत असेल तर नाकारणे देखील चुकीचे आहे, हे आग्रहाने प्रतिपादन केले आहे. याच संदर्भात पुढे लिहिताना, काव्यातील प्रतिमा,त्याची प्रतवारी, वास्तवाशी सहकंप होण्याची शक्ती, इत्यादी घटकांचा सविस्तर विचार वाचायला मिळतो. याच संदर्भात त्यांनी, मुक्तिबोध आणि मर्ढेकर यांच्या काव्यातील प्रतिमासृष्टी, त्याचा घाट आणि कलात्मक सामर्थ्य या बाबींचा .सुरेख उहापोह केलेला आढळतो

सामाजिक जाणीवेतून पुढे अवतरलेली काव्यातील दुर्बोधता, हा विषय असाच सुंदरपणे मांडलेला आहे. मुळात, दुर्बोधता ही नेहमीच वाचक आणि अपेक्षा यातील विसंवादातून निर्माण होते. "कोणतीही पूर्वकल्पना मनाशी न धरता सृजन कारणे आणि मनाशी काहीही न धरता त्याच सृजनाला सामोरे जाणे, ही कवी आणि वाचक यातील आदर्श अवस्था म्हणता येईल" असे सूत्र मांडून, निरपेक्षवृत्तीने कवितेचे ग्रहण करणे आवश्यक असते. मराठी काव्यक्षेत्रात दुर्बोधतेचा प्रश्न जरी अर्वाचीन असला तरीही काव्यात दुर्बोधता ही प्राचीन आहे, हे दाखवून, त्या संदर्भात केशवसुत, मर्ढेकर आणि अरुण कोलटकर यांच्या कवितेमधून दाखवून दिले आहे. कवितेतील प्रतिमांचे भावनासापेक्ष किंवा विचारसापेक्ष असे विश्लेषण शक्य नसल्याने सगळे शब्द कळून देखील अर्थाने कविता दुर्बोध होते, हाच त्यामागील नेमका विचार आहे. खरतर वाचक आणि कविता यात दुर्बोधता असणे, हे .योग्य नव्हे आणि ते खरेतर समीक्षकांनी करायला हवे

माझ्या काव्याची भूमिका" आणि "माझ्या कवितेची वाटचाल" या दोन्ही लेखात, करंदीकरांनी, स्वत:च्याच कवितेविषयी विवरण केलेले आहे." करंदीकरांची कविता ही प्रत्येक दशकात वेगवेगळी वळणे घेत गेली. त्यांचे विषय, त्यातील प्रतिमा, कवितेच्या रचनेचा घाट आणि नंतर सरळ सरळ .मुक्तछंदाचा केलेला वापर, ह्या सगळ्या गोष्टींकडे ते किती सजगदृष्टीने बघतात, याची जाणीव आपल्याला नेमकेपणाने होते

त्यापुढे, मंगेश पाडगावकरांनी त्यांची घेतलेली मुलाखत आहे आणि ती प्रामुख्याने, काव्यातील प्रतिमासृष्टी या विषयावर आहे. मुळात, प्रतिमा आणि त्यांचे कवितेतील संयोजन, हा विषय नेमकेपणाने जाणून घेणे नेहमीच व्यामिश्र होत असते. कवीला अभिप्रेत असलेला भाव, ज्यासाठी प्रतिमा प्रामुख्याने वापरल्या जातात, आणि वाचकाला आकळलेला भाव यात नेहमीच अंतर पडते. ही मुलाखत वाचणे, हे आपल्या वैचारिकतेला अप्रतिम .खाद्य आहे

हेमिंग्वे - एक लेखक, हा लेख करंदीकर साहित्याकडे कशा नजरेतून बघतात, याचा वस्तुपाठ आहे. इंग्रजीतील एक असामान्य लेखक म्हणून हेमिंग्वे

ओळखला आजतो आणि ती ओळख अत्यंत रास्त आहे. खरतर त्याच्या प्रत्येक साहित्यकृतीवर दीर्घ निबंध भाव, या योग्यतेचा हा लेखक आहे. असे असले तरी, करंदीकरांनी, अगदी थोडक्यात, त्याच्या अति महत्वाच्या पुस्तकांची ओळख आणि त्यातील नेमके मोठेपण कशात आहे, याची नेमकी जाणीव दाखवून दिली आहे. करंदीकरांचे वैशिष्ट्य असे की, इथे त्यांनी हेमिंग्वे - एक लेखक म्हणूनच समीक्षा केलेली आहे. त्याच्या व्यक्तिगत आयुष्यात ते अजिबात डोकावलेले नाहीत. मला स्वत:ला ही पद्धत मनापासून आवडते. कुठलाही कलाकार हा त्याच्या कलेतून बघावा आणि त्याचे .विश्लेषण करावे. त्याचे आयुष्य, ही त्याची खासगी बाब आहे आणि त्याचा, त्याने निर्मिलेल्या कलेशी कसलाच संबंध जोडू नये

मराठी कविता, संत काव्याच्या प्रभावातून केशवसुतांनी प्रथम बाहेर काढली. त्यांनी, प्रतिमांचे वेगळेच जग निर्माण केले. त्यादृष्टीने, त्यांचे कर्तृत्व हे असाधारण असेच म्हणायला हवे. या दृष्टीने, करंदीकरांनी, पुढील लेखात केशवसुत आणि त्यांची कविता, याचा अतिशय दीर्घ आणि साक्षेपी अभ्यास केलेला आहे. तसेच पुढील लेखात, त्यांनी मर्ढेकरांची कविता घेतलेली आहे. खरेतर, मराठी कवितेतील हे दोन कवी म्हणजे दोन टप्पे आहेत, ह्यांनी, मराठी कवितेला वेगळे वळण दिले. हे दोन्ही लेख दीर्घ आहेत पण ते तशा लांबीचे असणे आवश्यकच आहे. त्याशिवाय त्यांच्या कवितेंचा अभ्यास अशक्य आहे. अर्थात, कितीही झाले तरी, जसे कुणीही कलाकार नेहमीच अत्यात्तम दर्जाची कलाकृती सतत सादर करू शकत नाही आणि या न्यायाने, त्यांच्यात काही अप्रतिम तर काही फसलेले, असा प्रकार नेहमीच आढळतो. करंदीकरांचे मोठेपण यातच आहे की, त्यांनी आपली विवेकदृष्टी कायम ठेऊन, यांच्या कवितेंचे रसग्रहण केलेले आहे. "सतारीचे बोल" ही केशवसुतांची कविता,कविता म्हणून कशी असामान्य आहे हे तर दाखवून .दिलेच आहे पण मर्ढेकरांचे प्रतिमा संयोजन कसे वेगळे होते, हे त्यांच्याच कवितेतील ओळी दाखवून, आपला मुद्दा ठामपणे पटवून दिला आहे

एखादा विषय अभ्यासाला घेतला की त्याचा किती वेगवेगळया अंगाने अभ्यास करता येतो, तसेच एकाच विचाराच्या अनुषंगाने इतर किती विचार त्यात अनुस्यूत असतात, याचे नेमके दर्शन आपल्याला या पुस्तकात जागोजागी वाचायला मिळते आणि वाचताना आपल्याला देखील, आपल्या .नेहमीच्याच साहित्यिक जाणीवा अधिक विस्तारल्या आहेत, हेच सारखे जाणवत असते आणि हेच या पुस्तकाचे खरे यश म्हणावे लागेल

**नवविधा भक्ती** ________________________ **विनायक फडके**

**नवविधा भक्ती ------- १-श्रवण, २-कीर्तन, ३-नामस्मरण, ४-पादसेवन, ५-अर्चन, ६-वंदन, ७-दास्य, ८-सक्ख्य, ९-आत्मनिवेदन**

साधनेचे पाच योग प्रकार आहेत हे आपल्याला माहित आहे. भाक्तीयोग, प्रेमयोग, कर्मयोग, ज्ञानायोघ आणि राजयोग. ह्यापैकी भक्ती म्हणजे काय ते आपण पाहणार आहोत. विविध वैचारिकते प्रमाणे नऊ प्रकारे भक्ती करता येते, यालाच नवविधा भक्ती असे म्हटले आहे. मराठी संतांनी भक्तीला सर्वात जास्त महत्व दिले आहे. भक्ती हि खरोखरच अद्भुत आहे. इतर साधक ईश्वराच्या दिवाणखाण्या पर्यंत जातात. पण भक्त थेट (डायरेक्ट) भगवंताच्या स्वयंपाकघरात जातो. हे भक्तीचे सामर्थ्य आहे. प्रेम आणि भक्ती तसे वेगळे नाही. जे प्रेम माणसावर साजीवावर केले जाते. तेच प्रेम ईश्वरावर केले कि त्याला भक्ती म्हणतात. भक्त म्हणजे विभक्त नाही -- म्हणजे वेगळा नाही तो भक्त. ईश्वराशी सतत जोडलेला. पण एकरूप होत नाही. भक्ताला अद्वैत मानण्य नाही. किंबहुना त्याला ते नकोच असते. तो ईश्वराशी द्वैत ठेऊन त्याचा सखा बनू पाहतो. त्याला समोरासमोर भेटू इच्छितो. आलिंगन देवू इच्छितो. त्याशिवाय त्याला समाधान होत नाही. म्हणजे दोघेही मनाने एक असले तरी देहाने वेगळेच असावे असे नेहमी भक्ताला वाटते. ज्ञानी मात्र भगवंताच्या अस्तित्वाच्या जाणीवेने-ज्ञानाने संतुष्ट होतो. पण भक्त? --------त्याला इच्छा समूळ नष्ट होणे, सायुज्य मुक्ती पूर्णपणे मुक्त होवून जाने हे भक्ताला मान्य नाही. तो देहाने ईश्वरापासून वेगळाच राहू इच्छितो. म्हणून तर संत तुकाराम महाराज म्हणतात, मला मुक्ती नको. जर तुझी भक्ती मला कायम लाभणार असेल तर मी कितीही वेळा गर्भवास भोगण्यास तयार आहे. मानवी देह हा सर्वात जास्त मोह पडणारा आहे. त्यामुळे बाकी वासना जश्या ह्या देहात अधिक तरलतेने अनुभवता येतात तश्या इतर योनीत त्या येत नाहीत. हाच नियम वासानाविरहित भक्तीला हि लागू होतो. भक्तीचा आणखी एक अद्भुत गुण म्हणजे लौकिकात भक्त ईश्वराचा दास दिसतो. पण प्रत्यक्षात इथे ईश्वरच भक्ताचा दास होतो. हे भक्तीचे सर्वात मोठ्ठे रहस्य आहे. महाराष्ट्रातील संतांनी महाराष्ट्राला हि भक्ती कशी करायची ते प्रत्याक्षानुभावावरून दाखवले शिकवले आहे. मला भक्तीचे जे पैलू दिसले ते मी इथे आपल्याला दाखवण्याचा प्रयत्न करत आहे. पटले आवडले तर नक्की कळवा ------- मर्मज्ञ विनायक ( विनायक प्रभाकर फडके - पत्ता २७/ २२२, उन्नत नगर नंबर ४, ऑफ महात्मा गांधी रोड, गोरेगांव पश्चिम, मुंबई - ४०० ०६२ मोबिल नंबर -- ९८६९ ०६ १६ )

नवविधा भक्ती ------- १-श्रवण

पाहिली भक्ती श्रवण. श्रवण म्हणजे ऐकणे. आपल्याला पाच ज्ञानेंद्रिये आहेत. पण ज्ञान मिळवण्याची सुरुवात दृष्य आणि श्रवण म्हणजे डोळे आणि कान ह्याने होते. त्यात हि कानाने म्हणजे ऐकून ज्ञान संपादनाची क्रिया सर्वात आधी सुरु होते. इतकेच काय गर्भावस्थेत आईच्या कानावर पाडणाऱ्या शब्दांचाहि परिणाम गर्भावर होत असतो. आता तर हे विज्ञानाने सिद्ध झाले आहे. त्यामुळेच श्रवणाने ग्रहण केलेले ज्ञान दीर्घ काळ स्मरणात राहते. म्हणून श्रावण हा भक्तीचा पहिला प्रकार ठरला. इथे भक्त ईश्वराचे गुणगान ऐकतो. त्याचे विचार ऐकून आत्मसात करतो. जिथे जिथे म्हणून ईश्वराचे ईश्वराच्या नामाने कोणतेही कार्य चालले असेल ते श्रावणाच्या माद्ध्यामातून त्याला कळले तरी तो त्यात संतुष्ट होतो. ईश्वराबद्दलचे जे जे काही विचार ऐकायला मिळतील ते आपल्या र्हुदयात साठवून ठेवतो. श्रवण माद्ध्यमाने ईश्वराशी सतत अनुसंधान ठेवतो. निसर्गदत्त पहिली शक्ती ज्याचा माणूस देहरुपाने जगात येण्या अगोदर अनुभवतो त्याचा उपयोग ईश्वराच्या अनुसंधानासाठी करणे म्हणजे श्रवण भक्ती. त्यामुळे ह्यात सहजता आहे. बाकी सर्व ज्ञानेंद्रिय बंद असली तरी कान बंद करता येत नाहीत. झोपेत एखादा सूर शब्द कानावर पडला तरी ऐकला जातो म्हणून हि भक्ती पूर्ण पणे कष्ट विरहित आहे. विकलांग माणसाला सुद्धा जो पर्यंत ऐकायला येते आहे तो पर्यंत तो हे उपभोगू शकतो.

नवविधा भक्ती ------- २-कीर्तन,

दुसरी भक्ती कीर्तन. आपल्याला जे आवडते ते दुसऱ्याला सांगितल्या शिवाय माणसाला चैन पडत नाही. फेस बुक सारख्या साईट वर

पहा. एखाद्या पोस्ट वर कॉमेंट्स टाकतांना सुद्धा कित्येक जण निव्वळ कॉमेंट्स न टाकता आपले संपूर्ण अनुभव किंवा वाचलेले इथे सदर करतो. ह्या सहज स्वभावामुळे. जेजे ऐकले तेते सांगावे, रंजक करून सांगावे जेणेकरून दुसऱ्यासही ते मनोमनी आवडेल असे माणसाला मनोमनी वाटते. ह्या नाम कीर्तन. मात्र इथे हे काही सांगणे असते ते सर्व ईश्वरासंबंधी असते. त्याचे गुण, रूप, कार्य, आवड निवडी, सर्व काही तो भक्त दुसऱ्याला सांगतो, त्याशिवाय त्याला चैनच पडत नाही. हीच कीर्तन भक्ती. कीर्तन हे रंजक असते. कीर्तनात संगीत आहे, नाट्य आहे, नृत्य आहे, वक्तृत्व आहे, थोडी जास्तीची प्रतिभा असणेही अपेक्षित आहे, हे सर्व गुण कीर्तनकाराच्या अंगी असणे आवश्यक आहे कि ज्या मुळे. ऐकणाऱ्यावर त्याचा उत्तम प्रभाव पडेल. हा भक्त सतत ईश्वरचे गुणगान लोकांना सांगत कीर्तन भक्ती सिद्ध करतो. हे त्याचे सांगणे संपतच नाही कारण त्याच्या मनात सतत आपल्या ईश्वराचेच विचार येत असतात. सगुण ईश्वर तर सर्व गुण संपन्न आहे. त्यामुळे त्याची गुण सांगून सांगून संपतच नाहीत त्यामुळे कीर्तनातून त्याची भक्ती सतत सुरु राहते.

नवविधा भक्ती ------- (२-कीर्तन,३-नामस्मरण,) *ह्या मदध्ये थोडेसे*

आज माद्ध्येच एक वेगळया विचारवर भाष्य करत आहे कारण काही विनंती आली आणि अशा प्रकरची विनंती शंका कुशंका आल्यावर त्यांचे वेळीच निरसन होणे जास्त योग्य आहे असे मला वाटते. म्हणून क्रमशः लिखाणात थोडा खंड घेवून हे लिहित आहे. बोलण्याच्या ओघात मला काही प्रश्न विचारले. त्या सर्वांना प्रथम मनापासून धन्ण्यावाद. आपल्या मुळे मी हे लिहायला आज प्रवृत्त झालो. आपल्याकडे आपले तत्वज्ञान, संस्कृती, अद्ध्यात्म, हे विज्ञाननिष्ठ आहे अशी नेहमी ओरड केली जाते. ते तसे खरोखरच आहे. पण आपलाच समाजाकडून होणारा सगळयात कहर म्हणजे. आधुनिक भौतिक प्रगत वैज्ञानिक शोधांशी ते जोडण्याचा आटापिटा केला जातो. हे माझ्या मते वृथा आहे. कारण एकीकडे आम्ही भोगी नाही असे ठाम प्रतिपादन करतो आणि दुसरीकडे आमचीही भौतिक प्रगती किती आणि कशी आहे ते शोधण्याचा आटापिटा करतो. पूर्वी बोलणाऱ्याच्या शब्दात शाप व उश्शाप वर देण्याचे सामर्थ्य होते. स्वतःच्या देहावर आणि मनावर संपूर्ण पणे स्वतःचा स्वतःच्या इच्छेप्रमाणे अंमल गाजविणे हे घडत होते. जो माणूस स्वयं सिद्ध असतो तोच दुसऱ्याला ताब्यात ठेवू शकतो. ह्या सर्व शक्ती माणसाच्या मनात, विचार, भावना, कल्पना, विवेक बुद्धी, ह्या रूपाने वास करत असतात. परमार्थ हे मनाचे विज्ञान आहे. ते देहबुद्धी पासून दूर नेवून मनाला अंतर्मुख करून आत्मबुद्धी अवलंबायला शिकवते. मग त्या आपल्याच मनात उतरून काय शोध लागतात ते पाहणे म्हणजेच परमार्थ. असे असतातंना भौतिक प्रगतिशी त्याची सांगड घालण्याचा आटापिटा करण्याची वास्तविक काहीच गरज नाही, नाही का? किंबहुना त्या शक्ती घालवल्या मुळेच माणूस आज जनावाराहून हीन होत गेला. आत असलेल्या शक्तीचा शोध घ्यायचे सोडून तो बाहेरून शक्ती, आधार, मदत, मिळवायच्या मागे लागला आणि मानसिक दृष्ट्या अपंग झाला. लाचार झाला भिकारी झाला. त्यात आमची संस्कृती भोगी नाही असे ओरडून ओरडून सांगतांना मात्र, प्रत्यक्षात मात्र भौतिकाचा आधार शोधाय्च्या मागे लागला आहे. ह्या पेक्षा वेगळी विसंगती नाही. का ह्याला ढोंगी पणा म्हणायचे? कि आणखी काही ते आपणच आपले ठरवावे. मानवी देह हा पंचा महा भूतानंचा बनला आहे. त्यामुळे त्या पंचाम्हाभूतांच्या सर्व शक्ती व गुणधर्म मानवी देहातही सदैव वास करून आहेत. त्याचा शोध घेणे अधिक शक्तीशाली आहे. त्याने मानवता अधिक वाढीला लागेल. परमार्थिकता म्हणजे मानवी मनाची उत्क्रांती आहे. त्यात जे साधते ते देवादिकांनाही साधत नाही. मुक्ती सही देवांनाही मानव जन्म घ्यावा लागेल. असे स्वामी विवेकानंदांनी शिकागोच्या धर्म परिषदेत स्पष्ट सांगितले होते कि. तुमचे प्रचंड वाटणारे भौतिक शोध हे मानवी मानाच्या अंतर्मनात लागणाऱ्या शोधांचे मंद प्रतिध्वनी आहेत. ह्याच वाक्याने मी आयुष्यभर प्रभावित होऊन त्या दृष्टीने विचार करू लागलो आणि कोणत्याही धार्मिक संस्कार मागे मानाच्या सहज शक्ती कश्या वापरल्या जात असाव्यात ह्याचा तर्कबुद्धीने शोध घेत गेलो त्यातूनच आजवर मी माझे सर्वच लिखाण करत आलो आहे. हे माणसाच्या मनाचे विज्ञान आहे ज्यावर सर्व अध्यात्म आधरलेले आहे. हा एक दृष्टीकोन आहे. जो मी अहं म्हणून सांगत नाही पण आजवर माझ्या तरी कधी वाचनात आलेला नाही म्हणून मी लिहिण्याचे धाडस केले. आपल्याला हा कसा वाटतो ते जरूर कळवा. ------- मर्मज्ञ विनायक ( विनायक प्रभाकर फडके - पत्ता २७/

२२२, उन्नत नगर नंबर ४, ऑफ महात्मा गांधी रोड, गोरेगांव पश्चिम, मुंबई - ४०० ०६२ मोबिल नंबर -- ९८६९ ०६ १६ )

नवविधा भक्ती ------- ३-नामस्मरण,

तिसरी भक्ती नामस्मरण. महाराष्ट्रीय संतांनी ह्या भक्ती प्रकाराला सर्वात ज्यास्त महत्व दिले आहे. त्याला कारणही तसेच आहे. प्रथम आपण ऐकतो मग ऐकलेले लोकांना सांगतो आणि मग ---- "सहजच" ---- त्याचा ध्यास घेतो, धावा करतो, सतत स्मरण करतो, त्याशिवाय आपल्याला चैनच पडत नाही. सहज निदिद्ध्यास हेच प्रेमाचे लक्षण आहे. हे प्रेम ईश्वरावर करतो तीच भक्ती. ह्यात बेचैनी, विरह वेदना, प्रत्यक्ष भेटीची आस, कडाडून भेटण्याची इच्छा हे सर्व भाव अंतरभूत आहेत. श्रावण भक्ती साठी सांगणारा किंवा लिहिणारा तरी लागतो. कीर्तन भक्ती साठी कोणीतरी ऐकणारा लागतो. नामस्मरणाला दुसरा कोणी लागत नाही. माझे नाम मी माझ्या मनात घेतो. इथे व्यक्ती ऐकायला लागत नाही. कारण नाम घेतो म्हणजे बोलावतो. ज्याचे नाम घेतो त्याला बोलावतो. आपल्याला माहित आहे कि अनेक लोक आहेत. त्यातही आपण एखाद्याचे नाव पुकारले कि तो सहज आपल्याकडे वळतो. कारण श्रवण --- त्याला ते कोठूनही ऐकायला जाते. नामाला स्थळ, काळ, वेळ, देश, धर्म, जात, लिंग, शौच, अशौच कशाचेही बंधन नाही. कारण ते मी कधीही कुठे हि केव्हाही घेऊ शकतो. हो घेऊ शकतो पण घेतोच असे नाही कारण. माणसाचे मन अनेक प्रकाह्र्च्या आसक्तीच्या ओढीने त्या त्या अनेक ठिकाणी ओढ घेत असते म्हणून हे सोपे असले तरी सोपे नाही. पण भक्ताची मनाची तयारी असल्यास नाम अखंड चालू राहू शकते. हे मात्र १०० टक्के सत्य आहे. हेच नामाचे महत्व आहे. ह्याच्या आखाडात्वाला अनुसंधान म्हणतात आणि नामाचे हे अखंडत्व राहणे फक्त नामस्मरण भक्तीत शक्य आहे. प्रीयातामचे/ईश्वराचे नाम घेण्यासाठी कधी सांगावे लागत नाही. हे सर्व वास्तव विचारात घेता भक्तीचा सर्वात प्रभावी, सहज साद्ध्य, सोपा, सर्व प्रकरच्या माणसांना पेलणारा प्रकार आहे असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. म्हणून हा भक्ती प्रकार आपल्या समाजात विशेष प्रचलित झाला. त्यामुळे नवविधा भक्तीच्या मद्ध्ये हा मुकुट आहे / तुरा आहे.

नवविधा भक्ती ------- ४-पादसेवन,

चौथी भक्ती पादसेवन. ईश्वरापुढे नतमस्तक होणे. त्याच्या पायाशी राहणे. ईश्वरापुढे स्वतःला न्यूनतम समझने. ज्या माणसांना न्यूनगंड आहे अश्यानसाठी सुद्धा हा प्रकार सोपा पडेल असे म्हटले तर अयोग्य होणार नाही. नुन्गंड असलेल्या माणसाला स्वतःवर अजिबात विश्वास नसतो. आपल्याला काही येत नाही काळात नाही आपण क्षुद्र आहोत हि प्रचंड भावना त्याच्या मनात सतत वास करत असते हि इथे अत्यंत उपयोगी पडते. कारण मी क्षुद्र आहे तू सर्वस्व. हि भावना ह्या भक्ती प्रकारात प्रबळ आहे. म्हणजे नकारत्मक विचार करणारा माणूसही ईश्वर भक्ती सहज करू शकतो. साधनेच्या पायरीतील शेवटची पायरी अनन्य शरणागती हीच इथे पाहिली पायरी आहे. अर्थात बाह्य शरणागती हा आभास असतो. मनाची अनन्यता अत्यंत महत्वाची आहे. ती बोलायला जितकी सोपी आहे तेव्हढी अचारायला कठीण आहे. मी क्षुद्र आहे हा मी काढून टाकणेही वाटते तितके सोपे नाही. कारण मुळात ह्या भावनेमुळे ईश्वरावरची श्रद्धा सुरवातीला प्रबळ ठरते आणि काही सौम्य चमत्कार अनुभवायला येतात. त्यातून मी ईश्वराचा लाडका आहे. आणि म्हणूनच जरा विशेष आहे. हि भावना बळावण्याची दाट शक्यता असते. बाकी काही करू नका फक्त शरणागत व्हा. बाकी सर्व मी म्हणजे ईश्वर पाहून घेईल. हा ह्या भक्तीचा आदि मद्ध्य आणि अंत आहे. वरवर हा प्रकार साधा सोपा वाटला तरी अंतरात अचारायला अत्यंत कठीण आहे. कारण सर्वच प्रकारचा शेवट हा अनन्ण्यातेत आहे. हि अनन्यातच अत्यंत कठीण. स्वत्वाचे मूळ स्वतःहून नष्ट करणे हे वाटते तितके सोपे नाही. स्वतःचा अहं स्वतःहून नष्ट करणे.

नवविधा भक्ती ------- ५-अर्चन,

अर्चन म्हणजे अर्पण. भक्ती हि सगुण असते. ह्या भक्ती प्रकारात पूजा आहे. पूजा म्हणजे आदर सत्कार. आवाहन वगैरे षोडश उपचार पूजा हे सर्व आले. इथे ईश्वराला म्हणजे आपला जो कोणी देव आपण मानत असू त्याला जे जे आवडते ते ते त्याला अर्पण करणे म्हणजे

अर्चन भक्ती. हे करता करता भक्त स्वतःला अर्पण करतो. म्हणजेच त्याचे मी पण अर्पण करतो. पूजा हा सगुण भक्तीचा सर्वांना माहित असलेला प्रकार आहे. पूजा प्रकार हा साग्रसांगीत आहे. हा कर्मकांडाचा एक भाग आहे. पण हे कर्मकांड करत असतांना मनाची स्थिती काय आहे हे आपले आपण जाणीव करून घेणे आवश्यक आहे. भक्तीचे अवडंबर माजविणे हे आपल्यातली ढोंगी वृत्ती दर्शवते. त्यामुळे अत्यंत प्रचलित असून ह्या मार्गाने जाणारे आपल्याला खूप दिसतात त्या मनाने त्यातून पारमार्थिक प्रगती साधलेले फार फार थोडे असतात. षोडशोपचार पूजा प्रकारची सविस्तर माहितीची एक लिंक इथे देत आहे.

https://www.facebook.com/note.php?note_id=10150316470239044

नवविधा भक्ती ------- ६-वंदन,

वंदन म्हणजे नमस्कार करणे, नमणे, नतमस्तक होणे, लीन होणे, शरण जाणे, दुसर्याचे वर्चस्व स्वीकारणे, स्वतःला न्यूनतम मानणे, म्हणजे वंदन. समोरच्याचे मोठेपण स्वीकारणे. माणसाने नम्र राहणे हे ह्या प्रकारत अभिप्रेत आहे. कोणत्याही साधना शिवाय नामस्मरणाच्या खालोखाल सहज शक्क्य आणि सोपा असा हा प्रकार आहे. नम्रता हि अशी शक्ती आहे कि बऱ्याच अशक्क्य गोष्टी आपल्या ह्या वृत्तीने सहज साद्ध्य होतात. ज्या गोष्टी ज्ञानाने साधणे शक्य होत नाहीत, त्या नम्रतेने सहज शक्क्य होतात. सर्वांनविषयी आदर बाळगणे हि वृत्ती व्यवहारालाही फार फार उपयोगी असते. पण व्यवहार्तील वास्तव असे असते कि मानले बऱ्याच वेळा दिन होतात, पण लीन होत नाहीत. दिन असता कामा नये. वंदनाने लीनता अंगी येते. मनाला स्थिरता येते. मानाच्या स्थिरते मूळे आत्मविश्वास वाढतो. त्यामुळे हा भक्ती प्रकार सामाजिक दृष्ट्या हि अत्यंत महत्वाचा आहे. चमत्काराला नमस्कार घडतो असे म्हणतात पण नमस्कारनेहि चमत्कार घडतो, असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. तो असा कि समोरच्या माणसाची कठोरता नक्की कमी होते. माणसाचे मन पालटणे हे सर्वात कठीण गोष्ट आहे. म्हणून तर स्वामी विवेकानंदांनी आपल्या मित्रांना उत्तर दिले कि माणसाचे मन पालटणे फक्त ह्यांनाच (रामकृष्ण पराम्हन्सांनाच) शक्क्य होते म्हणूनच तुझ्या दृष्टीने अशिक्षित असणाऱ्या ह्या माणसाला मी गुरु केले. भक्तीने मन पालटत नाही पण मृदू होते अनुकूल सुद्धा होऊ शकते. त्यासाठी आपण हि भक्ती नक्की अनुसरावी. आणि अनुभव घ्यावा. नमस्कारात एक हात आपले मन आणि दुसरा हात हे समोरच्याचे मन जोडले जाणे हे अभिप्रेत आहे. वंदनात मनाचे अर्पण आहे. हात जोडले आता माझे काय राहिले? हि भावना ह्या भक्तीप्रकारचे सार आहे. ईश्वर हा चराचरात भरलेला आहे अर्थात तो यच्चयावत सजीवत आहेच आणि माणसात तो प्रकट होवू शकतो इतक्या उत्कटतेने व्यापून आहे. म्हणून वारकरी पंथात आपल्याला असे लक्षात येईल कि प्रत्येक समोरच्या माणसाला वंदन करण्याची प्रथा आहे मग तो वयाने, मनाने, पैशाने, कितीही लहान असु दे त्यात ईश्वर आत्मरूपाने भरून आहे ह्या वास्तवाची जाणीव त्या वेळी प्रत्येक माळ-धारकाच्या मनात वास करत असते. आणि विठ्ठलाकडे जातांना तर ते लोटांगण घालत जातात. हे लीनातेची पराकोटी आहे. मात्र हे सर्व मनात घडणे ह्याला फार मोठ्ठा अर्थ आहे. त्यातच परमार्थ आहे.

नवविधा भक्ती ------- ७-दास्य,

माणसाच्या अनेक स्वभावापैकी दास्य हा हि एक स्वभावातील पैलू आहे. त्याला एखाद्याचे दास्य स्वीकारणे अपमानस्पद वाटत नाही. राग मानू नये पण काही जाण स्वभावतःच बरयाच औशी लाचार असतात. स्वामित्व त्याच्या स्वभावातच नसते. कधी कधी तर अगदी कोणत्याही भूमिकेतून लहानात लहान असलेया व्यक्तीशी सुद्धा हे दास्य वृत्तीने वागतात. अशा स्वभ्वाच्या माणसांना दास्य भक्ती हि सहज सोपी जाते. स्वाभाविकच अश्या माणसांमद्ध्ये अहंकार कमी असतो. त्यामुळे भक्त होणे त्यांना सहज शक्क्य होते. तोच स्वभाव वापरून इथे हे ईश्वरचे दास्य करतात. आणि पूजेच्या माद्ध्यामातून आपली सेवा ते ईश्वराला अर्पण करतात. अशा प्रकारची माणसे सत्गुरुसेवा करणे झटकन स्वीकारू शकतात. परमार्थी प्रवासात अंतिम सत्गुरू लागतोच. पण असा सत---गुरु आज भेटणे हे खरोखरच कठीण. खऱ्या सत्गुरुची लक्षणे जी स्वामी समर्थांनी दिली आहेत ती वाचल्यावर तरी आज कोणी सुबुद्ध माणूस अशा प्रकारचा गुरु करायला पटकन धजणार नाही. गुरु जो पर्यंत आपल्या मनातील दुसऱ्या विषयीची त्वेष बुद्धी नाहीशी करत नाही तो सत्गुरू असूच

शकत नाही मग ती कोणतीही का असे ना. त्यामुळे ह्या वृत्तीचे लोक बऱ्याच वेळा फसवले जातात आणि हि स्वतःची झालेली फसवणूक त्यांच्या लक्षात येईपर्यंत कधी कधी आयुष्य खर्ची जाते. इतकेच काय पण आपण अशा गुरु? कडे जायला लागल्यावर ते लोकांनाहि लगेच तसे करण्याचा आग्रह करू लागतात. अवास्तव प्रचार करतात त्याचे एक उदाहरण मी पूर्वी दिले आहे. थेट ईश्वरावर श्रद्धा ठेवून त्याचीच सेवा केली तर धोके कमी आहेत. पण त्या बाबतीत मानस सेवा मानस पूजा अपेक्षित आहे आणि ती कठीण आहे. मानस सेवा शिकवतांना फसविले जाण्याची दाट शक्यता असते. म्हणून एकूणच हा भक्ती प्रकार बहुतेक वेळा सत्गुरू नावानी मिरवणाऱ्या लोकांच्या शिष्य रुपात जास्त आढळतो. त्यामुळे हा भक्ती प्रकार जरा धोकादायक आहे. सावधान जी काही भक्ती करायची ती थेट ईश्वरावरच करावी हेच खरे.

नवविधा भक्ती ------- ८-सक्ख्य,

हा भक्तीचा अद्भुत प्रकार आहे. सखा म्हणजे मित्र आणि सखी म्हणजे मैत्रीण. तसे इथे फेसबुक मद्ध्ये अनेक मित्र असतात त्यातले तर ८०-८५ % आपण ओळखतही नाही. किंवा शाळा, कॉलेज, ऑफिस मधले सुद्धा बरेच मित्र मैत्रिणी असू शकतात. पण ते सखा किंवा सखी नाहीत. सखा किंवा सखी असणे म्हणजे दोन देह वेगळे असतात पण दोन मने मात्र पूर्णपणे एकच असतात. मागे एकदा माहिती देतांना सिम्प्ठेतिक वाय्ब्रेषण बद्दल लिहिले होते तो हा प्रकार आहे. समविचारी माणसात एकमेकांचे विचार सहज जाणले जातात. मानवी देहात जर आपल्याला असे अनुभव आले तर अशी दोन माणसे मग ते मित्र मैत्रीण कोणाही असोत सखा किंवा सखी असतात ते ईश्वरी भावाच्या जवळ आहेत असे मानायला काही हरकत नाही. कारण विशुद्ध मानाखेरीज हे कदापि शक्क्य नाही. कोणी कुणाला समजून घ्यावे लागत नाही. एकमेकांना एकमेक सहजभावे समजतातच. दोघांच्या एकमेकानमद्ध्ये कोणतेही एकमेकांनी माहित नसलेले गुपित नसतेच मुळी. त्यामुळे कोणत्याही प्रसंगी ते एकमेकाबरोबर असतांना तिसर्या कोणत्याही माणसांनी बोलावयाचे असल्यास ह्या दोघांपैकी एकाला दूर जायची गरज नसते. अशारितीने मनाने एकरूप होणे म्हणजे सख्य भक्ती.

ह्याची श्री रामान्संबंधी एक गोष्ट सांगतो. श्री रामांनी युद्धानंतर प्रत्येकाला काहीना काहीतरी दिले आणि पाठवणी केली. हनुमंताला देणे घेणे नव्हतेच. सीतामाई म्हणाल्या आता हा कधी जाणार. त्यावर श्री राम काय उत्तर देणार? तो हनुमानाला म्हणाला बाहेर उभा राहा त्यावर मारुती म्हणाला काम सांगा. त्यावर श्री राम म्हणाले मला जांभई आली तर तू टिचकी वाजवायची. आता हा बाहेर आणि श्री राम आत. त्याने विचार केला रामांना कधी जांभई येईल कसे काय कळणार आपण आपले सतत नाव घेतोच त्या प्रत्येक नावाबरोबर एक टिचकी वाजवू झाले. पण भक्ताच्या ह्या अतर्क्य वागण्याने आणि त्याचे प्रेम राखण्यासाठी रामानंचा जो आ झाला तो बंदच होईना.

तशीच श्री कृष्णाची गोष्ट आहे नारद म्हणाले अरे भक्त सखा सर्व मी समजू शकतो पण तू त्या अर्जुनाच्या घोड्यांचा खरारा हि करतोस हे कसे काय???? (तसे तर नारादाही भगवंताचे उत्तमच भक्त होते.) त्यावर भगवान म्हणजे श्री कृष्ण नारदाला म्हणाले कि तो आत्ता झोपलाय त्याच्या केसांना कान लाव. नारदाने तसे केले त्यातून श्री कृष्ण श्री कृष्ण नाम ऐकू आले. नारद म्हणाले धन्य तो भक्त. आणि धन्य त्याची भक्ती. भगवंताचे मानवी रूप अवतरी रूप धारण केलेल्या स्थितीत ह्या प्रकारची बरीच उदाहरणे आहेत विशेषतः श्री कृष्णाच्या आयुष्यात राधा, द्रौपदी, ह्या सख्या आणि उद्धव, सात्यकी, अर्जुन हे सखे म्हणजे मननी एकरूप व्यक्तिमत्व होती. माणसांच्या आयुष्यात हे अशक्य नाही. देवत्व नसले तरी उत्तम मानावत्वाचे ते लक्षण आहे असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही.

नवविधा भक्ती ------- ९-आत्मनिवेदन

कबुली ------- शेवटचा भक्तीचा प्रकार --- माणूस म्हटले कि चूक होणार. कोणताही माणूस अहंभावामुळे आपली चूक कधीच चटकन कबूल करत नाही. आणि चूक कबूल केल्या शिवाय सुधारणे शक्क्य नाही. कारण माझे चुकलेले काहीच नाही तर मग सुधारायचे काय? हा सहज प्रश्न आहे. आत्मनिवेदन म्हणजे भाग्वान्तासमोर आपली चूक कबूल करणे. आणि पुन्हा न करण्याची हमी देऊन मुक्त होणे. ह्यालाच आत्मनिवेदन म्हणतात इथे आडपडदा न ठेवता सर्व कबुली द्यायची आहे. वास्तविक भाग्वान्तासमोर गुप्त असे काही राहतच

नाही. पण आपला प्रांजळपणा सिद्ध करणे ह्या भक्ती मद्ध्ये अभिप्रेत आहे. पुन्हा हि कबुली एकांतात द्यायची आहे. लोकां समोर द्यायला कमीपणा वाटतो तो हि इथे प्रश्न नाही. त्यामुळे भक्तीचा हा प्रकार म्हटल तर अचारायला सोपा आहे. पण तितकाच कठीण आहे कारण चुका करायची माणसाची सवय जायला वेळ लागतो. त्यामुळे कबुली एकांतात द्यायची असली तरीही भगवंत समोर द्यायची असल्याने माणूस झटकन तशीही कबुली द्यायलाही तयार होत नाही हे वास्तव आहे. कारण पुन्हा चूक न करण्याची हमी द्यायची असल्याने, जबाबदारीचे प्रचंड दडपण माणसाच्या मनावर येते. कारण जगाला शहाणपणा शिकवणे सोपे आहे पण स्वतःच्या मनाला आवरणे अतोनात कठीण आहे ह्याची सुप्त आणि परिपूर्ण जाणीव प्रत्येक माणसाला असते आणि ती त्याला झटकन कबुली देवू देत नाही. हे वास्तव आहे.

क्रिश्चन समाजात हा प्रकार प्राधान्याने स्वीकारलेला आढळतो. आणि त्याच बरोबर प्रार्थना प्रकाराला सुद्धा क्रिशन समाजात विशेष स्थान आहे. कारण कबुली आणि प्रार्थना हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. आपल्याकडे नामाला जितके महत्व आहे इतकेच ह्या समाजात आत्मनिवेदन व प्रार्थना ह्यांना आहे. चर्च मद्ध्ये दरवाज्यातच मद्ध्येच एक लाकडी जाली असते व तिच्या दोहोबाजूला बसायची सोय असते. त्याच्या एका बाजूला धर्मगुरू बसतो व दुसऱ्या बाजूला अत्मानिवेदक बसतो. इथे मात्र तो देवासमोर नाही धर्मगुरू समोर आपल्या सर्व कर्माची कबुली देतो. आणि मुक्त - मोकळा होतो. प्रार्थना हा सुद्धा फार प्रभावशाली भक्ती प्रकार आहे. वास्तविक सर्वच धर्मांच्या मद्ध्ये विविध प्रकारच्या प्रार्थना लिहून तयार असतात. बऱ्याच वेळा त्या पाठ करून म्हणायचा प्रघात असतो. ह्यालाच आपल्याकडे संस्कार असे हि म्हणतात. (वास्तविक संस्कार हा फार मोठ्ठा आणि सखोल विषय आहे तो पुढे कधीतरी येईलच) पण आपण मुलांवर संस्कार करतो आहोत अशा कल्पनेने ज्या प्रार्थना म्हटल्या जातात त्या शरीराला सवय लावण्या पुरत्याच मर्यादित असतात. त्या सहसा मनात खोल जातच नाहीत. त्यामुळे त्याचा परिणाम फारसा अनुभवायला येत नाही. पण कठीण प्रसंगी माणूस ज्या वेळी ईश्वरापुढे दीन होतो (लीन नाही) तेव्हा त्याच्या तोंडून पोटतिडीकीने जे काही सहजोद्गार येतात ---- तीच खरी त्याची प्रार्थना असते. ती प्रार्थना कार्य करते. भक्तीचा हा अतिशय सखोल भाव आहे मानाच्या आत आत खोल दडलेले ईश्वरासमोर व्यक्त करून अनन्य शरणागत होणे. आपल्याकडे पूजेच्या शेवटी हे देवा अनन्या असा मी तुला सर्व कुटुंबासहित शरण आलो आहे हि प्रार्थना हा अत्मानिवेदानाचाच प्रकार आहे. आपणही सर्वजण ईश्वराला अनन्य भावाने शरण जाऊन मुक्त आणि आनंदमय होऊन जावूया. भगवंताच्या भक्तिरसात न्हाऊन जावूया शुभं भवतु.

नवविधा भक्ती ------- १-श्रवण, २-कीर्तन, ३-नामस्मरण, ४-पादसेवन, ५-अर्चन, ६-वंदन, ७-दास्य, ८-सक्ख्य, ९-आत्मनिवेदन

आत्ता पर्यंतच्या विवेचनावरून आपल्याला एक गोष्ट लक्षात आली असेल कि कोणत्याही माणसाला भक्तीच्या मार्गाने भगवंताशी एकरूप होऊन राहणे शक्क्य आहे. त्या भक्तीतही नऊ प्रकार आहेत. माणसांच्या मानाच्या विविध प्रवृत्तीनुसार ते विचारात घेतले गेलेले दिसतात. जे मन उन्मन (उन्माद नव्हे) करून भगवंताशी जोडायचे आहे, तादात्म्य पाववायचे आहे, त्या मनाची आपली आपल्याच बारकाव्याने माहिती हवी. प्रेमाने माणसाच्या जीवनाला स्निग्धता येते मार्दव-मृदुता येते. म्हणूनच इतर सर्व प्रकारच्या योग प्रकारां पेक्षा प्रेम व भक्ती माणसाला भगवंताच्या स्वयंपाक घरापर्यंत घेऊन जाते. इथे स्वार्थ नसेल तर आपल्या चुकांना ---माफक प्रमाणात--- क्षमाही आहे. लोकांकडून हा प्रकार सहज स्वीकारला जाण्यामागचे हे हि एक कारण असू शकते. स्थळ, काळ, वेळ, जात, धर्म, लिंग, देश, कोणतेही बंधन नसलेली सहज आचरणात आणता येईल असा भक्ती हा साधन प्रकार आहे. बुद्धी, मन, आणि शरीराला ज्यास्त ताण/त्रास न देता अवलंबता येणारा साधन प्रकार. अनुसंधान हा भक्तीचा गाभा आहे अनुसंधान म्हणजे ईश्वराशी जोडले जाण्याच्या साधनेतील सातत्य, अखंडत्व. वास्तविक सर्व विश्व त्याच्याशी अखंडपणे जोडलेलेच आहे. किंबहुना तोच हे विश्व आहे. पण आपल्याला त्याची जाणीव नसते. असली तरी वारंवार त्या गोष्टीचा आपल्याला विसर पडतो. त्यामुळे आपणच आपल्याला त्या गोष्टीची जाणीव व आठवण करत राहावी लागते. त्या साठी आपल्याला साधन करावे लागते. करता-करविता मी नाही तो आहे. हि सुद्धा

जाणीव आपली आपल्याला सतत करून घ्यावी लागते. त्यासाठी प्रयत्नशील असणे म्हणजेच अहंकाराचा त्याग करून त्याच्याशी तादात्म्य पावण्याची साधना. क्षमा मागणे आणि क्षमा करणे हे दोन्हीही भक्तीत अभिप्रेत आहे. जमेल तेव्हढा जास्तीत ज्यास्त प्रयत्न करून भक्तीचा आनंद अनुभवूया. भक्तीच्या आनंद डोही न्हावून जावूया. नेहमी प्रमाणे काही दिवसांतच पुढचा योग प्रकार सुरु करूया तो पर्यंत रोग आणि त्याची करणे हे चालू राहीलच.

**सुरांचा मानकरी** **मिलिंद कल्याणकर**

१९५० ते १९६० हे दशक हिंदी चित्रपट संगीतातील सुवर्णकाळ म्हणून सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवावे असे अजरामर संगीत याच काळाने आपल्याला दिले. या काळातील सुरांच्या जादूगारांनी तसेच मानकर्यांनी केलेली सुरांची उधळण श्रावण करून आपण खरोखर स्तिमित होतो. या संगीत रत्नांनी आपल्या जादुई पोतडीतून एका पेक्षा एक वर्चाद चाजा देवून संगीतातील एक प्रचंड भांडार आपल्या स्वाधीन केले आहे. या खजिन्यातील सूर हे पुढील कित्येक पिढ्यांना दीपस्तंभासारखे सुरांच्या वाटचालीला मार्गदर्हक ठरतील. या सर्व रत्नात काही रत्ने फार प्रकर्षाने जनावितात व त्यापैकी एक नाव आहे स्वर्गीय मदन ओहान कोहली उर्फ मदन मोहन.

त्या काळातील सीएम व्यवसायातील एक वजनदार व्यक्त रायबहादूर चुनीलाल कोहळ व भागावान्तिदेवी यांचा मदन मोहन हा मुलगा. पण दिनंक २५ जून १९२४ रोजी बगदाद येथे जन्म घेतलेल्या मदन मोहन ह्यांची खरी ओळख म्हणजे रागदारीवर आधारित मधाळ व नशिल्या गझला. तसेच आर्द्र/ हळवी दर्दभरी गीते देणारा एक असाल प्रतिभावान संगीतकार. मुअल्तः " कर्क " रास असलेल्या व्यक्ती मनाने हळव्या तसेच संवेदनशील असतात. मदन मोहन यांची रास " कर्क " होती. त्यामुळे त्यांनी संगीत दिलेल्या गीतांमधून ह्या दोन्ही भावना जाणवतात. सुरेल चाल व तेव्हढ्याच तोलामोलाचे संगीत हि दोन अस्त्रे घेवून काही काळ त्यांनी कानसेनांवर राज्य केले. संगीतातील गझल हा गानप्रकार तसा थोडासा कठीणच, पण मदन मोहन यांनी त्यास खास " मदन मोहन टच " देवून या गान प्रकारचे सोने केले. त्या काळातील जवळ जवळ सर्वच संगीतकारांनी सूर- साम्रादनी लता नामक स्वर्गीय सुरांच्या साथीने आपला सांगीतिक प्रवास केला आहे. सुर समराद्नी लता तसेच मखमली आवाजाचा तलत ह्या दोघांचा पुरेपूर उपयोग करून घेत गझल या प्रांतात अधिराज्य गाजविले. या दोन दिग्गजांनी त्यांच्या सुरेल व सुमधुर चालींचे सोने केले.

तसे पहावायास गेले रा मदन मोहन ह्यांचे शिक्षण मुंबईच्या कॉन्व्हेंत शाळेत झालेले त्यामुळे सहाजिकच बोलणे सगळे इंग्रजीमाद्ध्ये असे. त्यानंतर ते थेट फौजेत दाखल व त्यानंतर लखनौ आकाशवाणीवर सूत्रधार म्हणून व तिथून ते सिनेमा जगतात आले ते संगीतकार म्हणून. शास्त्रोक्त संगीताचे शक्षण न घेता उत्तमोत्तम गझला कानसेनांना देऊन तृप्त करू लागले. मनाची पकड घेणाऱ्या गझला गुंफित राहिले. त्यांच्या जीवनातील कुठच्याही गोष्टीचा परस्परांशी संबंध नसताना लता व तालात ह्या दोन अलौकिक सुरांच्या साथीने अनमोल व अजरामर गझला सांगितला बहाल करून गझल साम्राज्यावर काही काळ आधीराज्य केले. त्यांच्या सुरवटिनवरून एक गोष्ट लक्षात येते कि त्यांचा हिंदी / उर्दू भाषांचा उत्तम अभ्यास होता. हिंदी/उर्दू कवींचे अर्थाने परिपूर्ण तसेच भावनेने ओथंबलेले शब्द तेव्हढ्याच ताकदीच्या सुरावटीत गुंफून कान्सेनापर्यंत पोहोचवणे हे तसे कठीण पण त्याच्यातही त्यांच्या संगीतातील कर्तबगारीने विजय मिळवला भावनांनी ओतप्रोत भरलेले शब्द काळजापर्यंत पोहोचविण्यासाठी तेवढीच दमदार सुरावट लागते याचे भान त्यांनी ठेवले व त्यामुळेच त्यांच्या गझला कल्पनातीत अजरामर झाल्या.

मदन मोहन यांनी दिलेल्या उत्तमोत्तम गझला व तेवढ्याच ताकदीची इतर गाणी आपण विसरू म्हटले तरी विसरू शकत नाही. त्यांच्या अनेक उत्तमोत्तम गाझालांपैकी काही अप्रतिम व अवीट सुरांच्या गझलांचा समावेश आहे या गझला अशा आहेत कि ऐकतांना वाटते कि शब्द सूर व ताल यांचा त्रिवेणी संगम झाला आहे व एक जरी सूर कमी पडला तर गझलेची लयच बिघडून जाईल.१९६२ साली आलेला " अनपढ " या चित्रपटातील गझला हे याचे एक नित्त उदाहरण आहे. " आपकी नजरो समजा", " है इसिमे प्यार कि आरजू" या दोन गझला लाटणे फार अप्रतिम गायल्या आहेत, पण त्याच बरोबर मदन मोहन यांची चाल व संगीत तेवढ्याच तोलामोलाचे आहे.त्याच

प्रमाणे आपकी परछाइया (१९६४) मधील "अगर मुझसे मुहोब्बत है मुझे सब अपने गम दे दो " या गाझालेमुळे भारतीय संगीताचा अस्सल नमुना कानात अवतरला. खरोखर लाटणे त्यांच्या सुरेल रचनांचे सोने केले. उदाहरणेच द्यायची म्हटली तर खूप देत येतील. " बैरन निंद न आये " (चाचा जिंदाबाद), "लग जा गले " (वाह कौन थी), "हम प्यारमे जलने वालोंको" (जेलर), "अब गम को बना लेंगे हम " (निर्मोही), "जा रे बदरा बैरी जा " (बहाना), "बैया न धरो " (दस्तक ) "नैनो मे बदरा छाये " (मेरा साया), "यु हसरातोंके डाग" (अदालत), यमन रागातील "जिया ले गयो जी मोर सावरिया" (अनपढ), "चंदा जा चंदा जा रे जा" (मनमौजी), इत्यादी कितीतरी गाणी देता येतील कि ज्याला टिपिकल मदन मोहन टच आहे. मदन मोहन ह्यांनी संगीत दिलेले चित्रपट फारसे चालले नाहीत पण त्या चित्रपटांना त्यांच्या संगीताने तारले. काही वानगीदाखल गाणी देता येतील, "नयनोमे प्यार डोले " (शेरू १९५७) "मेरे विना तुम बिन रोये" (देख कबीरा रोया १९५७), "कदर जाने ना" (भाई भाई १९५६), वो जो मिलते थे कभी" (अकेली मत जैयो १९६३), "मै तो तुम संग" (मनमौजी १९६२) हि व अशीच कितीतरी तालासुरांनी भरलेली सुश्राव्य गाणी त्यांनी आपल्याला दिली व आपले कान तृप्त केले. या वरून एक गोष्ट प्रकर्षाने कि मदन मोहन या गुणी अशी ठाम धारणा होती कि आपल्या चालीचे सोने लताच फार समर्थपणे करू शकते व त्याची प्रचीती लाटणे गायलेल्या त्यांच्या बहुसंख्य गाण्यातून अनुभवास येते. त्यांच्या संगीतात अशी जादू आहे कि आपण कितीही तणावग्रस्त अथवा थकलेले असलो आणि त्यांची गाणी गुणगुणली कि मन प्रसन्न होते. काही वर्षांपूर्वी या स्वरासाम्राज्ञीने स्वतःची दहा सर्वोत्कृष्ट गाणी निवडली होती व त्या मद्ध्ये मदनमोहन ह्यांच्या दोन गाण्याचा समावेश होता. हि गोष्टच संगीतकाराच्या अभिरुची संपन्न संगीताची ओळख पटण्यास पुरेशी आहे.

लता हा स्वर्गीय आवाज सोडला तरी अशी कितीतरी सुरेल गझला व दर्दभरी गाणी आहेत कि ती इतर गायक/गायिकांकडून म्हटली गेली आहेत व ती तेवढीच अप्रतीमहि आहेत. तलतने आपल्या मखमली आवाजात गायलेली "फिर व्ही शं", मै तेरी नजर का सुरून हुं" "तेरी आंख के असू पी जाऊ" (तिन्ही जहा आरा १९६४) "मै पागल मेरा मानवा पागल" (आशियाना १९६१), तेरी निगहोमे" (बहाना १९६०), "हमसे आय न गया" (देख कबीरा रोया १९५७) इत्यादी अशी कितीतरी गाणी सांगता येतील कि त्या मदनमोहन च्या संगीताची धुंधी व तलतच्या आवाजाची मुलायम व मधाळ सुरांची मेजवानी यांचा सुरेल संगम झाला आहे.

काही जनंचा असा मतप्रवाह आहे कि त्यांच्या संगीतातून लताला दूर केले तर तळाशी थोडासा तलत रहातो. तसे पाहायला गेले तर हा विचारच थोडा विचित्र वाटतो. खरोखरच लतांनी व तलतनी त्यांच्या प्रत्येक चालीचे चीज केले. या तिघांनी मुलून गझल या प्रकाराला उच्चासनावर नेवून बसविले.

लता तलत प्रमाणेच इतरांकडून मदनमोहन यांनी तोल्मोलाची गाणी गावून घेतली आहेत. "मेरी अतारीयामे कागा डोले" (आंखे - मिनाकापूर), " सबसे ये खे दो" (बेक मेनेजर - अशा), झुमका गिरा रे" (मेरा साय - आशा), "रंग और नूर कि बारात" (गझल - रफी), "प्रीत लगाके मैने ये फल पाया" (आंखे - मुकेश), "ऐ दिल मुझे बतादे" (भाई भाई - गीता दत्त) इत्यादी एवढे मात्र खरे कि मदन मोहन यांनी जास्तीत जास्त गाणी लता व तालात ह्यांच्या कडून गाऊन घेतली आहेत व या दोघांनी त्यांच्या चालीचे सोने केले. अशा या कलंदर संगीतकाराला तसेच रागदारीवर बेतलेली सुमधुर गीते व मधाळ गझला देणाऱ्या कलाकारास शतशः प्रमाणाम. असा ह संगीतकार दिनांक १४-०७-१९७५ रोजी मैफिल अर्धी टाकून उठून गेला.

**आर्थिक दुबलता** — **सुरेश पाठे पाटिल**

"जगण झालंय अवघड त्याचा भार डोईजड"

जगण्यासाठी महत्वाचं काय फक्त अन्न वस्त्र आणि निवारा ? या व्यतिरिक्त अजून काय ? "जगणं झालंय अवघड" त्याचा भार डोईजड" अस थोडक्यात म्हणावयास हरकत नाही. सगळ्यांकडेच आर्थिक परिस्थिती सारखी नसते हे तर आपल्याला ज्ञात आहेच पण आर्थिक परिस्थिती सध्या ज्यांची चांगली आहे त्यांची अजून प्रगती होत आहे आणि समाजातील माध्यम वर्गीय व गोरगरीब जनता अजून गरीब होत आहे, अशी विषमता अगदी पहिल्यापासूनच आहे परंतु यावर काही उपाय योजना करता येऊ शकणार नाहीत का ?

आजच्या जीवनात आपल्या अन्न, वस्त्र व निवारा या व्यतिरिक्त आपण आपल्या गरजा अधिक वाढवल्या आहेत, तसेच शिक्षण ही देखील आज एक आवश्यक गरज होऊन बसली आहे. त्यातच इंग्रजी माध्यम हवं की मराठी माध्यम हवं यापैकी कुणीही इंग्रजी माध्यमाचाच प्रामुख्यानं विचार करतं, लक्षात घेण्यासारखी गोष्ट हीच आहे की प्रतिष्ठेसाठी काही पण, अस समजायला हरकत नाही. खर्च वाढणारे असतात पुढे आपला पाल्य चांगल्या गुणांनी पास झाल्यावर महाविद्यालयीन कुठल्या शाखेत प्रवेश घ्यावा, की डिप्लोमा करावा, त्याचे क्लासेस कुठे लावावेत, ग्रज्युएट होईपर्यंत पाल्यावर किती खर्च होईल, याची पुसटशी कल्पना नसतांना देखील त्याला आपण प्रवेश घेण्यास भाग पाडतो आणि आपले खर्च वाढवतो, त्यामुळे शिकवूच नये, अस मी म्हणत नाही, परंतु कोणताही निर्णय विचारपूर्वक घेतला गेला तर त्याचा नक्कीच काहीतरी फायदा होतो. शैक्षणिक प्रक्रीयेंसाठी लागणारा अफाट पैसा गोळा करता करता कित्येक पालकांचे नाकी नऊ येतांना आपण बघतो. त्यात रोजचा खर्च कसा भागवावा या चिंतेत असलेला सामान्य माणूस आपल्यावर ओढवलेल्या संकटांवर कर्ज घेऊन मात करतांना दिसतोय. बचत करायची गोष्ट वेगळीच पण पुन्हा कर्ज फेडण्यासाठी बँकांचे तगादे, घरची जबाबदारी, उधार उसनवार घेतलेल्या रकमांवर वाढणारे सावकारांचे व्याज तसेच क्रेडीट कार्ड, प्रायव्हेट फायनान्स, गृहकर्ज, मोटार वाहन कर्ज, पर्सनल लोन, असे असंख्य घेणेकरी आपल्या दारात उभे राहतांना दिसतात, त्यामुळे मनस्ताप होऊन असंख्य अडचणींना समोर जाव लागत. एक मन म्हणत की नसती केली अशी उठाठेव तर बर झालं असतं, संसाररूपी गाडा ओढणे नक्कीच जिकीरीचे झाले आहे हे तर आपणा सर्वांनाच मान्य करावं लागेल. आपल्याला कुणीच म्हणतांना आढळणार नाही की माझं खूप मस्त चाललंय. आणि मी खूप सुखी आहे, यामध्ये चंगळ फक्त समाजातील ठराविक वर्गाचीच आहे, त्यात त्यांचा दोष नाही कारण त्यांनी पोटतिडकीने जमविलेल्या पुंजीची आताच्या काळात चांगली किंमत येतेय, कुठेतरी वाटत आपल्याला आपण खूपच मागे राहिलोय आणि जग पुढे चाललंय, तेव्हा या विचार चक्रातून बाहेर पडून आपण आपल्या जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोन हा सकारात्मकच ठेवावा, नकारात्मक विचारांमधून केवळ आपली स्वतःची हानीच होत असते. आता महिला देखील आपापल्या क्षेत्रात आघाडीवर दिसतात नवयुवतींनी देखील हा आदर्श डोळ्यांसमोर ठेऊन आपली वाटचाल पुढे ठेवावी, जेणेकरून तुमच्या आयुष्याचे शिल्पकार तुम्ही बनू शकता आणि इतरांसमोर एक आदर्श उभा करू शकता.

आज आपण आपलं युग म्हणजे "विज्ञानयुग" म्हणतोय, आपण जिथे सुमारे ८ ते १६ तासांपर्यंत भारनियमनाचा सामना करावा लागतोय परिणामी शेतकऱ्याच्या तोंडचा घास हिसकावला जातोय, काही ठिकाणी पाणी असून वीज नसल्यामुळे शेतकरी त्याच्या पिकाला पाणीपुरवठा करू शकत नाही. त्याचे उत्पादन कमी उत्पन्न निघाल्यामुळे साहजिकच त्याच्या उत्पादनास मिळणारा भाव आणि त्यातून त्याचा निघणारा खर्च, औषधे कीटकनाशके, रासायनिक खते याचं बिल, यातच तो भरडला जातोय, पण दुसरीकडे बाजारात मिळणारा भाजीपाला, साखर, तेल, यात दिवसेंदिवस भरमसाठ वाढ होतांना दिसतेय, त्या पटीत सामान्य माणसाच उत्पन्न वाढण्याच मार्ग दिसत नाही, गरजा जास्त परिणामी कामही जास्त करावं लागत. मी एकदा आमच्या सरांच व्याख्यान ऐकतांना त्यांनी एक गोष्ट सांगितली ती म्हणजे "आपले खर्च वाढत असतील तर आपण ते कमी करू शकत नाहीत परिणामी आपल्या उत्पन्नांचे स्रोत वाढवा," ही गोष्ट प्रामुख्याने आज लक्षात आली. आपण बोलता बोलता सहज बोलून जातो, 'मी हे करणार आहे ते करणार आहे' पण शक्य तितक् पाठबळ नसल्याकारणामुळे काहीच करू शकत नाही, अशी भरपूर कारणे सापडतील आपल्याला यातुन मार्ग काढून आपली आर्थिक परिस्थिती कशी सुधारता येऊ शकते,या गोष्टीकडेच सर्वांचा कल दिसून येतो, आज कोणत्याही क्षेत्रात आपले पाऊल रोवणे शक्य तितक्या लवकर सहज सोप मुळातच नाही. ज्या क्षेत्रात काम करायचं त्या क्षेत्रातील इत्यंभूत माहिती आपणाकडे असणे आवश्यक असते. महागाईमुळे झालेले चढउतार, रुपयाचे अवमूल्यन, इत्यादी गोष्टी लक्षात घ्यायला हव्या, बिल गेट्स यांनी म्हटले आहे ' तुम्ही गरीब म्हणून जन्मलात हा दोष तुमचा नाही परंतु तुम्ही गरिबीतच मेलात हा सर्वस्वी तुमचा दोष आहे ' हे वाक्य नक्कीच विचार करायला लावणारे

आहे. कुणालाही आपल्यातील उणीवा शोधून त्यावर बोट ठेवायला आपण संधी देऊ नये हे माझं मत आहे. अजूनही माझं लहानपण मला आठवत दहावीच्या परीक्षेसाठी नवनीत अपेक्षित प्रश्नसंच घेण्यासाठी पैसे नव्हते, दहा रुपये रोजचे मिळविण्यासाठी तेव्हा पाव-वड्याच्या गाड्यावर फक्त सुटीच्या दिवशी कामाला जाव लागायचं, कारण घरची परिस्थिती बेताची होती. आज बघा दहा रूपयांच काही मोल शिल्लक राहील नाही . अशा असंख्य गोष्टी आहेत ज्यातून आपण मार्ग काढू शकतो, पण आपण त्यातून मार्गक्रमण करण्यास तयार आहोत काय, हा प्रश्न एकदा स्वतःला विचारून बघावा.

मित्रांनो आपलं एक वेगळ अस्तित्व निर्माण करण्याच प्रत्येकाचं एक स्वप्न असतं, यात निश्चितच त्याला पूरक अशा गोष्टी मिळत गेल्यानंतर तो त्याचं स्वप्न पूर्ण करतो, मनुष्य चंद्रावर जाऊन आला आणि मंगळावर देखील मनुष्य भरारी मारण्याचा प्रयत्न करतोय, त्या पटीत आपल्या देखील अपेक्षा स्वताहून आपण उंचावयास स्वतःला भाग पाडणे अपेक्षित आहे. माझ्या कवितेच्या काही ओळी इथे नमूद करू इच्छितो,

“अपेक्षेंच्या ओझ्यापोटी स्वतःला हरवायचं

त्यातूनच तर खंर आयुष्य घडवायचं,

खडतर मार्गांना बिनधास्त भिडायचं

लक्ष्य त्या स्वप्नांतूनच ठरवायचं,”

मित्रांनो आपली स्वप्न तितकी भक्कम असली तर जिथे आपले लक्ष्य देखील आपण नक्कीच गाठू शकतो, आज आपल्या तरुण वर्गाकडे भरपूर संधी उपलब्ध आहेत, पूर्वी नव्हत्या, शैक्षणिक क्षेत्र, “आय टी हब” बँक, विमा व्यवसाय, औद्योगिक क्षेत्रातील संधी, औषधनिर्माणशास्त्र वैमानिक, तंत्रनिकेतन, अशा भरपूर गोष्टीपासून आपल्याला संधी मिळू शकतात, प्रामुख्याने या गोष्टी सांगण्याच कारण हेच की आपल्यातील आर्थिक दुर्बलता आपणच घालवू शकतो आणि आपलं जग आपणच घडवू शकतो, कारण आजच्या स्पर्धात्मक युगात पाल्याने आपल्या शालेय किवा महाविद्यालयीन अभ्यासाकडे निश्चितच लक्ष द्यायला हवे, व्यसनाधीन होणाऱ्या पाल्याकडे वेळीच पालकाने लक्ष दिले तर नक्कीच एक चांगला विद्यार्थी घडू शकतो यासाठी अभ्यासापासून दुरावा नको. विद्यार्थीदशेत असणारे युवक यातून नक्कीच चांगला बोध घेऊ शकतील अशी आशा बाळगतो.

लेख लिहिण्याचा प्रसंग पहिल्यांदाच आला आहे, त्यामुळे चूकभूल क्षमस्व

**पहिला स्पर्श** **मनोज चव्हाण**

सर्रकन अंगावर काटा उभा राहिला होता... एक वेगळीच सळसळ सर्वांगातून उठली होती , कधीच न अनुभवलेली. धडधड तर प्रचंड वाढली होती...जेव्हा... जेव्हा तिने पहिल्यांदा स्पर्श केला होता. हलकेच गालावर तिने ओठ टेकले होते. पण आई शप्पथ , हादरायला झालं होतं. असं वाटलं शॉक लागून आता खाली पडतो की काय! काय वाटलं होतं नेमकं त्यावेळी ?.. बरंच काही... ते सगळंच नवंनवं पण खूप छान वाटलं होतं एवढं नक्की.

आज त्या घटनेला काही वर्षं झाली. पण तो पहिला स्पर्श अजूनही पारिजातकासारखा मनाच्या अंगणात ठाण मांडून बसलाय.

खूप भीती वाटली होती तेव्हा. हे काय चाललंय , हे चुकीचं आहे , गैर आहे , अनैतिक वगैरे. पण हे सगळं काही क्षणांपुरतंच होतं. थोड्याच वेळात त्या स्पर्शाच्या अधीन व्हायला झालं. घरी आल्यानंतर वपुंचं वाक्य आठवलं , ' पर्याय नसलेली एकच ताकद , ती म्हणजे स्पर्श. '

प्रेमात पडण्याचं वय कोणतंही असलं तरी शारीरिक संबंधांना मुलीकडून सुरुवातीला विरोध होतोच. संस्कारांची चौकट , ' काहीतरी होण्याची भीती ' ( स्पर्श निव्वळ ओठांपुरताच मर्यादित असेल , तरीही) आणि अर्थातच स्वत:ची इमेज सांभाळण्याची धडपड असते. हा प्रयत्नही फार काळ टिकत नाही म्हणा! अफेअरमध्ये स्पर्शाला कितपत महत्त्व असावं , हा एक स्वतंत्र मुद्दा असू शकतो. पण पटो न पटो , स्पर्शाला निव्वळ प्रेमातच नाही अवघ्या आयुष्यात एक वेगळंच स्थान आहे.

पहिल्या स्पर्शाची आठवण आली की उगीच गाल लाल होतात. मध्येच कधीतरी ऑफिसमध्ये ,ट्रेनमध्ये हसू येतं आणि आसपासच्या प्रत्येकाला कळतं , कुछ तो है! या ' कुछ ' ची मर्यादा हळूहळू वाढत जाते. आता थोडीफार मॅच्युरिटी आली असली तरी त्यावेळचा बालिशपणा कधीही न विसरण्यासारखा आहे.

कॉलेजच्या ग्रुपमध्ये उभं असताना किमान निसटता स्पर्श व्हावा यासाठी धडपड चालू असायची. प्रत्येक वेळी एकांत शोधण्याचा एक निरर्थक प्रयत्न. कोणीतरी बघेल म्हणून जिवाची घालमेल व्हायची. तो स्पर्श हवाहवासा वाटू लागला. एक अनामिक ओढ लागून रहायची. तशी ती आजही आहे म्हणा! पण त्यातलं नाविन्य हरपलंय.

अगदी जवळच्या मित्राला  त्यावेळी हे सगळं सांगायचं असतं. तिने असं केलं , तिने तसं केलं... पण हिंमत होत नाही. मग नकळत हे लपवण्याचा प्रयत्न सुरू होतो. पण ' इश्क और मुश्क(म्हणजे मिशी!) छुपाने से नहीं छुपते ' असं म्हणतात. अशा गोष्टी खरंच लपून राहत नाहीत. कधी तरी या गोष्टी मित्रांना कळतात. आणि मग सुरू होते गोड हवीहवीशी वाटणारी मस्करी. आतापर्यंत यातल्या अनेक मित्रांनी  शरीरसंबंधांबद्दलच्या सर्व पायऱ्या ओलांडल्याही असतील कदाचित!

सगळ्या पायऱ्या ? म्हणजे काय हे नेमकं माहीतही नव्हतं तेव्हा. म्हणूनच पहिल्यांदा ओठांवर ओठांचा स्पर्श अनुभवल्यानंतर घरी गेल्यावर थोडं टेन्शन आलं. आता कॉलेजातल्या टीनेजर्सना पाहिलं की हसू येतं. चोरून प्रेम करण्याची या वयाची खासियत असते. आपल्याला असं वाटतं ,कोणी आपल्याला पाहिलंच नाही. पण आपण डोळे मिटले म्हणजे जग पाहत नाही , असं नसतं ,हे आता कळतंय. म्हणूनच आता त्या वयातील स्पर्शाची ओढ आता चाळे वाटतात.

घाबरत का होईना , स्पर्शाच्या प्रत्येक पायरीवर पुढे सरकताना आपणही त्याला साथ दिलेली असतेच. पण मनात काही खूणगाठी पक्क्या बांधलेल्या असतात. एका ठराविक मर्यादेपुढे जायचं नाही हे नेहमी स्वत:ला आणि तिला पटवून देण्याची धडपड सुरू असते. त्याचवेळी ' यात काय

वाईट आहे. काहीही होणार नाही , माझ्यावर विश्वास नाही का ?' हे त्याचं पालुपद सुरू असतं. हेच पहिल्यांदा किस करतानाही तो म्हणालेला असतो.

प्रेमात पडलेल्या प्रत्येकाच्या आणि प्रत्येकीच्या मनात हे सगळे विचार येत असणार. त्यानं-तिने पहिल्यांदा गालावर दिलेला किस. ती तारीख. जागा. त्यानंतर टप्प्याटप्प्याने पुढे सरकलेल्या नात्याची प्रत्येक आठवण मनात ताजी असते. पण दु:ख एकच असतं , हे नाही सांगता येत.

जुन्या गोष्टींचं अप्रूप नाही , फक्त येणाऱ्या क्षणाची ओढ आहे

## मराठी लेखन सोप्या आणि सहज पद्धतीने

किशोर कदम

आपल्याला मराठी लेखनाची खूप आवड असते पण आपल्याला मराठी लेखन कसे करायचे हेच माहिती नसते. काही जणांना हे माहिती असते मराठी फोन्ट इंस्टॉल करावा लागतो पण फोन्ट इंस्टॉल केल्यानंतर मराठी कसे लिहायचे? अक्षरांना काना ,मात्रा वेलांटी अनुस्वार कसे द्यायचे असे प्रश्न पडतात मला हि मराठीची आवड असल्यामुळे वरील सर्व प्रश्न पडले व त्यांची उत्तरे मी गुगल काकांच्या मदतीने शोधली व आपल्यासमोर या लेखात मांडत आहे. त्यासाठी आपल्याला दोन छोटी सॉफ्टवेअर इंस्टॉल करावी लागतील ती कशी करायची ते खालील प्रमाणे

१.आयकॉम्प्लेक्स सॉफ्टवेअर




२.गुगलचे आय एम् ई सॉफ्टवेअर




दोन्ही सॉफ्टवेअर एकत्र डाउनलोड करण्यासाठी येथे क्लिक करा.

३.इंटरनेट

दोन्ही सॉफ्टवेअर डाऊनलोड झाल्यावर प्रथम आयकॉम्प्लेक्स सॉफ्टवेअर इंस्टॉल कसे करायचे ते पाहू

.आयकॉन वर डबलक्लिक केल्यावर खाली दर्शवल्या प्रमाणे विंडोज ऑपन होईल इंस्टॉल कॉम्प्लेक्स स्क्रिप्ट वर क्लिक करा

.यानंतर आपल्याला रीस्टार्ट करण्यासाठी विचारेल तेव्हा रीस्टार्ट करा




झाले आयकॉम्प्लेक्स सॉफ्टवेअर इंस्टॉल आपले


(सुचना:विंडोज७ मध्ये आयकॉम्प्लेक्स सॉफ्टवेअर इंस्टॉल करण्याची गरज नाही.)

गुगलचे आय एम् ई सॉफ्टवेअर कसे इंस्टॉल करायचे ते पाहू...


सॉफ्टवेअरच्या आयकॉन वर डबलक्लिक केल्यावर खाली दर्शवल्या प्रमाणे विंडोज ऑपन होईल

(यावेळेस इंटरनेट चालू असणे गरजेचे)


नेटवरून गुगलचे मराठी इनपुट डाउनलोड होतअसतानाची विंडो खाली दर्शवल्या प्रमाणे.




डाउनलोड होत असताना खाली दर्शवल्या प्रमाणे  विंडो ओपण होईल त्यानंतर डिटेल्सवर क्लीक करा.




नंतर एडवांस् वर क्लिक करा व खाली दाखवल्या प्रमाणे चेकमार्क करा.




खाली दर्शवल्या प्रमाणे विंडो ओपन झालिकी समजा मराठी इनपुट सॉफ्टवेअर इंस्टॉल.





.क्लोज वर क्लिक करून आता कॉम्पुटर रिस्टार्ट करा

.रिस्टार्ट झाल्यानंतर खालील स्टेप्स प्रमाणे जा

.स्टार्ट \ कंट्रोल पेनल \ रिजनल एन्ड लेग्वेज \ लेग्वेज \ डिटेल्स \ एडव्हान्स व पहा खाली दर्शवल्याप्रमाणे चेक मार्क आहेत का

नसतील तर करा.




.तुमच्या टास्कबारवर “EN” आयकॉन दिसेल त्यावर क्लिक करा




(“EN” आयकॉन दिसत नसेल तर टास्कबार्स वर राईट क्लिक करून टूलबारस लेग्वेज बारवर चेक करा.)

नंतर वर्ड,एक्सेल किवा नेट ब्रावजर ओपन करा.

त्या नंतर टास्कबार वरील “EN” क्लीक करा खाली दाखवल्या प्रमाणे दोन पर्याय दिसतील “MA” वर क्लिक करा.







डेस्कटॉपवर खालील प्रमाणे आयकॉन दिसेल.








“F12” हे शॉर्टकट बटण आहे एकाच वेळेला इंग्लिश मराठी भाष्या निवडण्यासाठी

मराठी लिखाणासाठी “ने” वर ठेवा इंग्लीश साठी “A” वर ठेवा


वर्ड मध्ये लिहिताना खाली दाखवल्या प्रमाणे दिसेल




लिहीत असताना नावाच्या पर्यायी शब्द दिसतील त्यातून ही माउस ने क्लिक करून निवडू शकता पाचच्या पुढचे पर्यायी शब्द पाहण्यासाठी आकाशी रंगाच्या डाव्याबाजूच्या एरो वर क्लिक करा व पहिले शब्द पुन्हा पाहण्यासाठी उजव्या एरो वर .

अजून आपल्या मदतीसाठी किबोर्ड पण आहे कोणती अक्षर त्यासाठी “ने” च्या बाजूला असणाऱ्या किबोर्ड आयकोन वर क्लिक करा.

बंद करायचा असेल तर परत त्याच आयकोन वर क्लिक करा.




(सुचना:विंडोज७ मध्ये वर दाखवल्या प्रमाणे वापरता येईल.)

**बघा आपली फसवनूक होतेय का ?** — **किशोर कदम**

आपण महिना अखेर झाला कि आपल्या घरातील रद्दी म्हणजे महिन्याभराचे वर्तमानपत्र रद्दीवाल्याकडे विकण्यासाठी घेऊन जातो. आपण त्याला बोलतो निट वजन कर . मग तो बोलतो माझे वजन बरोबर आहे कुठेपण जाऊन वजन करा माझे वजन बरोबरच आहे मग आपण हि विस्वास ठेऊन बोलतो ठीक आहे आणि आपल्याकडे पण वेळ हि नसतो दुसरीकडे जाऊन पाहायला.... काय बरोबर ना ? पण तिथेच आपली फसवणूक होण्याची शक्यता असते किवा होते याचा अनुभव प्रत्येक्षात आम्हांला आला. म्हणजे माझ्या आईला आला कारण दर वेळेला रद्दी सारखीच भरायची कमीच पण जास्त नाहीं हातात उचलले तर जड लागायचे पण वजन काही जास्त भरत नव्हते आता शोध माझ्या आईने लावायचा ठरवले आणि तिने त्याचा छडा लावला ते कशी हाथ चतुराई करतात ते तिझ्या लक्षात आले आणि तीने ते मला सांगितले व त्याचे संपूर्ण निरिक्षण परिक्षन केले व ते मी या दिवाळी अंकात आपल्या समोर छायाचित्रा सोबत देत आहे जेणे करून आपल्याला समजायला सोपे जाईल व लक्षात हि येईल

आपण जर सर्व रद्दीच्या दुकानाची मांडणी पहिली तर तुमच्या लक्षात येईल त्यात सारखेपना असतो समोरच्या बाजूस वजन काट्याच्या बरोबरीने जुनी पुस्तके लावलेली असतात.




आपल्याला वाटते कि जुनी पुस्तके विकण्यासाठी असतात. पण तसे नसते त्याचा जास्त उपयोग दुसऱ्या कारणासाठी होतो आता आपण जरा दुकाना जवळ जाऊ मग त्याचा उपयोग कसा काय करून घेतात ते समजेल

आता जवळ गेल्यावर वजन काटा तुम्हाला मस्त फुलांनी सजवलेला किवा आणखी काही वस्तूंनी गुंडाळलेला दिसेल जो तुम्हाला पुस्तकांच्या आडून दिसणार नाही पण यातच आपली दिशा भूल केली जाते.



वरील छायाचित्रात डाव्या बाजूस ss हा आकाराचा फासा आडवा झालेला दिसेल (लालरंगाच्या बाणाने दाखवले आहे) तर उजव्या बाजूचा s हा आकाराचा फासा सरळ नव्वद अंष्यात आहे डाव्याबाजूच्या ss आकाराचा फासा वर आडवे अडकण्यासाठी खाचे मारलेले असतात (सफेद रंगाच्या बाणाने दाखवले आहे) जेव्हा दुकानदार रद्दी किवा वजन ठेवत असतो तेव्हा त्याला आपण बोलतो वजन बरोबर आहे का ते दाखव तेव्हा तो वजन बाजूला काढून दोन्ही बाजू समान आहेत ते दाखवतो व रद्दी ठेवल्यानंतर त्याचा हात डाव्या बाजूच्या s फाश्यावर जाणारच जिथे वजन असते व तो हाथ चलाखी करणारच त्या बाजूस... थोडक्यात सांगायचे झाले तर जेवढा s फासा आडवा होणार तेवढे वजनकमी भरणार ह्याच दुकान दाराने आणखी एक युक्ती केली आहे ती अशी कि उजव्या बाजूस अधिक वायर लावली आहे (तांबड्या रंगाच्या बाणाने दाखवले आहे) त्यामुळेहि वजन कमी भरते व अश्या प्रकारे आपली डोळयादेखत फसवणूक केली जाते.

असे अजून बरेच फसवणुकीचे प्रकार आहेत

त्यातला एक म्हणजे वजनाच्या बाजूस साखळी लावणे, देवाची चुनरी लावणे, (लालरंगाच्या बाणाने दाखवले आहे) त्यामुळे वजन कमी भरते.किवा जेणे करून आपल्या पटकन लक्षात येणार नाहीं अजून कित्येक अश्या युक्त्या असतील ज्या आपल्याला माहितही नसतील



वजन काट्याच्या खाली एकाबाजूस जमिनीला टेकू नये म्हणून पेपरचा गठ्ठा ठेवणे (लालरंगाच्या बाणाने दाखवले आहे)



असे जरुरी नाहीं कि सर्वच दुकानदार आपली फसवणूक करतात काही चांगलेही असतात जिथे आपल्याला काही गडबड दिसून येत नाही.




आता आपण बोलाल...... काय या छोट्या गोष्टीकडे लक्ष द्यायचे

पण लक्षात ठेवा थेंबे थेंबे तळे साचते

ॐ

## अगरबत्ती फटाके मिठाई रोशनाई

किशोर कदम

शिर्षक वाचून जरा गोंधळात पडलाना ? हो जरा वेगळाच पण महत्वाचा विषय आहे.

सणासुदीचे दिवस असो किवा एरवी देवाची पूजा करण्यासाठी आपण बाजारातून नेहमीच अगरबत्ती किवा धूप आणत असतो ... आता आपण बोलाल मग त्यात काय नवीन? आणतो... पुढे काय ? तर सांगतो आपण अगरबत्ती देवासाठी आणतो त्यावर बऱ्याच बॉक्सवर देवाची छायाचित्रे असतात आणि त्यात आजकाल स्पर्धा एवढ्या वाढल्याने अगदी पाच रुपयांच्या अगरबत्तीच्या पाकिटांवर देवाचा छायाचित्र असते आपण पाकिट बाजारातून विकत घेतो व आपण अगदी देवाची मनोभावे पूजा करतो देवाला बोलतो देवा माझे भले कर ... देवा माझ्याकडून काही चूक भूल झाली असेल तर माफ कर...आणखी बरेच काही असो देवाला प्रसंन कारायचा उपाय हा! आता मुद्याचे सांगतो आपण अगरबत्तीच्या काड्या संपल्यावर त्याचे बॉक्स तसेच पटकन खिडकीतून बाहेर टाकून देतो ते पाकीट जाण्यायेण्याच्या रस्त्यावर पडते आणि मग तेच देवाचे फोटो आपल्या पायाखाली येतात आणि आजकाल जीवन एवढे जलद आहे कि कोणाला ते बॉक्स उचलायला वेळ नसतो बस पाय जरा उचलता घेऊन बाजूला पाउल टाकून पुढे आपल्या मार्गाने... तर कोनाला जास्तच कीव आलीतर रस्त्यावरील झाडाच्या लोखंडी कुंपणाच्या तारेत अटकवतो किवा वडाच्या झाडाच्या पायथ्याशी ठेवतो मग तो जरा वाऱ्याची झुळूक आली कि परत रसत्यावर पडतो आणि उडत उडत जाऊन तो घाणीत पडतो काय बरोबर ना ?

भारत हा सांस्कृतीक देश आहे याचा आपल्याला अभिमान आहे पण प्रत्येक सण आलाकी त्या सणांसाठी सनानुसार नवीन नवीन आपल्याला आकर्षित असे देवांची चित्रे असलेल्या बॉक्सेस छापले जातात. आता नुकताच गणपती उत्सव गेला त्या वेळी पाहिलेच असेल मोदकाचे बॉक्स प्रत्येक बॉक्सवर गणपतीचा फोटो काहींना मोदक खायची ईतकी घाई लागलेली असते कि आजुबाजूला लावलेल्या चिकटपट्ट्या काढायच्या सोडून सरळ बॉक्स फाडतात मग आपल्या प्रिय बाप्पाचेही छायाचित्र फाटले जाते बर त्यातून काय आपण बोलायला गेलो कि "पूजेचा फोटो आहे का? असा उलटा सवाल आपल्यालाच करतात? तसेच बापांच्या मिरवणुकीतील डोक्यावर लावायच्या नारंगी रंगाच्या पट्या नाचता नाचता कधी खाली पडता व कधी पायाखाली येतात ते काही आपल्याला कळतच नाहीं.असेच आपल्याला देव स्थळांवर भेटणाऱ्या प्रसादाच्या पिशव्यांवर पाहायला मिळेल तिकडे प्रसादाच्या पिशव्यांवर देवाचे फोटो असतात ती आपण घेतो पण घेतल्या नंतर सरळ आपल्या बॅगेत टाकतो मग त्या पिशवीला घरी येईपरयंत अनेक घड्या पडलेल्या असतात बरोबर बोलतोय ना ? काही जन तर अगदी त्या पिशविला गाठ मारून ठेवतात त्यामुळे देवाच्या फोटोही खराब होतो मग तीही पिशवी ईकडे तिकडे भटकू लागते...

तसेच आता दिवाळीत येणारा लक्ष्मि बॉम आता आपण एकेठिकाणी लक्ष्मिची पूजा करत असतो तर दुसरया ठिकाणी लक्ष्मि बॉम् फोडून तिच्या चिंधड्या उडवत असतो कशी प्रसन्न होणार ती आपल्यावर सांगा पाहू? शिवाय दिवाळीत आपण खूप फटके फोडतो त्यामुळे ध्वनी प्रदूषण होतेच पण वायू प्रदूषण मोठ्याप्रमाणात होते दिवाळीच्या दिवसात जर आपण ईमारतीच्या टेरेसवर जाऊन आकाशात पहिले तर फक्त धूर आणि धुरच दिसतो दिवाळीच्या दिवसात एवढ्या मोठयाप्रमाणात प्रदूषण होते कि त्यामुळे आपल्याला कधी कधी स्वास घ्यायला त्रासही होतो.मोठ्या आवाजाचे फटके जसे रस्सी बॉम हा प्रकार आधी घेऊच नये आणि घेतला तर मोकळया जागेत किवा मैदानात जाऊन फोडावा जर ईमारती मध्ये फोडल्यास त्याचा धोका ईमारतीला व आपल्याला सुद्धा असतो कारण ईमारत बंदिस्त असल्यामुळे कंपन मोठ्या प्रमाणात होते त्यामुळे ईमारतीला भेगा पडू शकतात काही वेळा स्वयंपाक घरातील भांडी वरून खाली पडतात त्यामुळे अपघात होऊ शकतो.तसेच दिवाळीतील रॉकेट हा फटक्याचा प्रकार सुधा कित्येक वेळा अपघात घडवून आणतो त्याची दिश्या बदलली कि आपल्या घरात घुसून आग लागू शकते त्यामुळे तेही खुल्या मैदानात जाऊन लावावे.वरील दोन फटाक्यांचे प्रकार लहान मुलांच्या हाती पडता कामा नयेत

सणांच्या वेळेस जसे गणपती, नवरात्र, दिवाळीत आपण अगदी रात्र भर आपल्या घराच्या किवा दुकानाच्या सजावटीची, कंदिलाची लाईट चालू ठेवतो व या काळात कित्येक मेगावॅट विज वाया घालवतो. आपल्या देश्यातर आहेतच पण राज्यात खूप अशी गावे, आदिवासी पाडे आहेत की तिकडे

वीज अजून पोहचली नाही कारण आपल्या शहरालाच वीज पुरत नाहीं तर तिकडे कुठून द्यायची. म्हणून भार नियमन हि चालू असते कित्येक ठिकाणी.पण आपल्याला हे समजत नाही कि आपण किती वीजेचा अपव्यय वापर करत आहोत. लक्षात ठेवा रात्र भर लाईट चालू ठेऊन कधीच देव प्रसन्न होत नाही.

तेव्हा यावर्षी दिवाळी पासून खालील गोष्टींचा संकल्प करायला काही हरकत नाहीं, देवांचे फोटो असलेल्या बॉक्सेस व पिशव्या घेण्याचे अथवा खरेदी करण्याचे टाळा. कमीत कमी फटाके वाजऊन वायू व ध्वनी प्रदुर्षण कमी करा.दिवाळीची विद्युत रोशनाई रात्री आपल्या नऊ-दहा नंतर बंद करा व वीज वाचवा.

वरील सर्व गोष्टी मला निदर्शनास आल्या व त्या आपल्या समोर मांडल्या वाचकहो आता आपनास किती गोष्टी पटल्या लेख्वाचून आपण किती गोष्टी आमलात आणल्या व हा लेख कसा वाटला ते जरूर कळवा जेणे करून पुढील वर्षासाठी काहीतरी नवीन विषयावर लिहिण्यास मला आनंद होईल व उत्साह वाढेल.

**अतिथि लुटो भव**

**प्रथमेश सुरेश शिरसाट**

अतिथि लुटो भव शीर्षक अतिथी देवो भव चा अपभ्रंश करुन केले आहे कारणही काहीसे तसेच आहे. पुर्वी अतिथी म्हणजे पाहुणे ही एकंच संकल्पना होती ! पण काळाच्या ओघात आणि प्रगतीपथाकडे देश जात असताना अतिथी हा शब्द पर्यटकांसाठिही वापरला जाऊ लागला. अतिथी देवो भव म्हणजे आलेल्या पाहुण्याचा तो पाहुणचार करणे. यात नवीन काहीच नाही ! परंतु पर्यटना साठी भारतात येणारे लोकं किंवा भारताबाहेर जाणारी मंडळी यांचा योग्य तो पाहुणचार केला जातो (येथे मी योग्य तो असे उपहासात्मक म्हणत आहे).

गेल्या वर्षभरात विविध कारणांस्तव वेगवेगळी ऐतिहासिक ठिकाणे पहाण्याचा योग आला त्यात पुण्याच्या शनिवारवाड्यापासून ते थेट आग्र्याच्या ताजमहालपर्यंतचा समावेश आहे. पर्यटन उत्पन्न देशाच्या आर्थिक उत्पन्नात नेहमीच भर घालत आलेली आहे. पर्यटनाच्या नावाखाली पर्यटकांची फसवणूक आणि दिशाभुल होताना सर्वत्र दिसते आहे. जे ठिकाण रेल्वे स्टेशनपासून किंवा विमानतळापासून १५ मिनिटांच्या पायी अंतरावर आहे त्याच ठिकाणी जाण्यासाठी भारतीय पर्यटकांकडुनंच अवाच्या सवा पैसे आकारले जातात आणि रिक्षा किंवा टॅक्सी दुसऱ्या रस्त्याने फिरवून तेच अंतर किती लांब आहे असे भासवले जाते, तर त्या परदेशी पर्यटकाचे काय हाल होत असतील याची तर कल्पनाही करवंत नाही. ही तर झाली पर्यटन स्थळापर्यंतची फसवणुक !

परदेशी पर्यटक (काही हौशी) जवळ जवळ चौपट ते पाचपट रक्कम मोजुन भारतातील ऐतिहासिक ठिकाणांचा इतिहास जाणुन घ्यायला येत असतात परंतु इथे ना त्यांना त्या ऐतिहासिक स्थळांविषयीची इत्तंभुत माहिती दिली जाते ना त्यांना त्या ऐतिहासिक स्थळाचा इतिहास सांगितला जातो. उदाहरणदाखल द्यायचे झाले तर पुष्कर आणि अजमेर या ठिकाणी पुष्कर हे ब्रम्हाचे एकमात्र देऊळ कसे झाले किंवा अजमेरचा दर्गा नक्कि कोणि आणि का बांधला ? ही माहिती ठिकठिकाणी बदलत रहाते. जी माहिती पुष्कर किंवा अजमेर च्या पायथ्याशी दिली जाते तीच माहिती जेव्हा आपण मुळ ठिकाणी पोहोचतो तेव्हा वेगळी असते ! यातली नक्की खरी कोणती यांसाठी बिचाऱ्या पर्यटकांना इतिहास वाचावा लागेल. म्हणजे पुरेसे पैसे मोजूनदेखील पर्यटकांना काहीच मदत मिळत नाही.

पर्यटकांच्या सोयीसाठी १५०/- ते २००/- रुपये आकारुन दुभाषी दिले जातात, जे पर्यटकांना त्यांच्या (पर्यटकांच्या) भाषेत ऐतिहासिक स्थळाविषयी माहिती देतात (हे केवळ म्हणण्यापुरतीच) . प्रत्येक दुभाषी वेगवेगळी माहिती देत असतो. म्हणजे ज्यांना भारताचा इतिहास जाणायचा असेल किंवा पुढील पिढी पर्यंत पोहोचवायचा असेल त्यांनी आपण ऐकलेल्या गोष्टींचा पाठपुरावा करावा असेच झाले ना ? खाण्याचे पदार्थ, पिण्याचे पाणी, तसेच रहाण्यासाठीच्या ठिकाणी देखील पर्यटकांची आर्थिक फसवणुक होते. पर्यटकांना विविध सेवांच्या नावाखाली योग्यरित्या गंडवले जाते. "अतुल्य भारत" म्हणजेच Incredible India पाहण्यासाठी आपला खिसा रिकामा करावा लागतो. असे पर्यटन करण्यापेक्षा घरबसल्या विकिपिडीया किंवा गुगलवर ऐतिहासिक माहिती काढणेच काहींना जास्त बरे वाटते ते उगाचच का ?

त्यातल्या त्यात धार्मिक आणि अध्यात्मिक ठिकाणी येणाऱ्या भावि पर्यटकांनाही गंडेदोरे, होमहवन, इत्यादी माध्यमांतून फसवले जाते. पर्यटन क्षेत्राचा विकास करण्यासाठी सरकारने राबवलेली यंत्रणा आजपर्यंत कोणालाच समजली नाहीये. नक्की सरकार पर्यटकांसाठी काय उपयायोजना राबवते ? त्या उपाय योजनांचा लाभ फक्त पर्यटकांनाच दिला जातो का ? पर्यटकांसाठी राज्य सरकार आणि भारत सरकारची काय धोरणे आहेत ? या साऱ्या प्रश्नांची उत्तरे एक पर्यटक म्हणुन शोधण्याचा प्रयत्न आपल्यापैकी बऱ्याच जणांनी केला असेल पण उत्तरे आजवर मिळालीच नाहीत.

आजवरचा माझा अनुभव अस आहे की पर्यटकांना देशांचे उतपन्न म्हणुन नाही तर आपले वैयक्तिक उत्पन्न म्हणुन पाहणाऱ्यांची संख्या बोकाळली आहे. नक्की या समस्येबद्दल दोष कुणाला द्यायचा ? भ्रष्ट अर्थव्यवस्थेला ? की रिक्षा आणि टेक्सीचे भाव पेट्रोल आणि इझेल दरवाढीच्या नावाखाली अवच्या सवा लावणाऱ्यांना की पर्यटकांना गाईड उपलब्ध करुन त्यांच्याकडून पैसे उकळणाऱ्यांना ?

पर्यटनांतून आपला देश, आपली संस्कृती-परंपरा यांचे दर्शन आपण इतरांना करुन देत असतो पण आपणंच जर त्यात गैरव्यवहार केला तर विचार करा पुढील येणारी पिढी किंवा पर्यटकांसाठी आपण नक्की काय आदर्श ठेऊ ? ऐतिहासिक स्थळांची निगा राखणे हे कोणाच्या हातात आहे हेच ठरत नाही अजून ! ताजमहाल, शनिवारवाडा, चार मिनार, कुतुब मिनार, हवामहल या ठिकाणी भिंतींवर पानांच्या पिचकाऱ्या, प्रेमसंदेश इत्यादी आढळते. नैसर्गिक हानींपेक्षा ऐतिहासिक आणि पर्यटक स्थळांची होणाऱ्या या हानीला त्या ऐतिहासिक वास्तूंची देखभाल करणारे बेशिस्त प्रशासन, बेशिस्त पर्यटक/रहिवाशी आणि बेशिस्त कारभार जबाबदार आहेत.

देशच्या संपत्तीचे जतन करा हे केवळ इतरांना सांगितले जाते परंतु आपण काय करत आहोत हे कोणीच पहात नाही. ऐतिहासिक ठिकाणी दारु पिऊन दंगा करणारे , देशी आणि विदेशी महिला पर्यटकांना त्रास देणारे उजळ माथ्याने कसे काय बाहेर फिरु शकतात हे नवल !

ऐतिहासिक ठिकाणं तसेच पर्यटनासाअठी खुली असलेली ठिकाणं यांची विशेष काळजी राहण्याचे काम आपल्यापसुनंच सुरु केले तर मला वाटतं कोणत्याही पर्यकाला मानसिक त्रास सोसाव लागणार नाही !

बघा पटतंय का ?

## दिवाळी

संकेत भंडारी

दिवाळी , किती आनंदाचा सण आहे ना? सगळी कडे दिव्यांची आरास, विद्युत रोषणाईचा लखलखाट , किती छान वातावरण असते. आज ह्या दिवाळी सणाविषयीच बोलूयात.

दिवाळी म्हणजेच दीपावली. दीपावली शब्दाचा अर्थ दिव्यांची रांग किंवा ओळ हा होतो. आपल्याला जिकडे तिकडे ओळीने रचलेले दिवे ह्या सणाला दिसतात. आपल्याकडील प्रत्येक सण किंवा उत्सव, कुठल्यातरी देवतेला उद्देशून आणि निसर्ग-चक्राशी सांगड घालून रचला गेला आहे.आपल्या पूर्वजांनी जसे ऐहिक गोष्टींना मान्यता दिली आहे, तसेच पारलौकिक गोष्टींना प्राधान्य सुद्धा दिले आहे,

लोकांना वाटतं दिवाळी हा सण लक्ष्मी मातेला उद्देशून साजरा केला जातो पण ह्या सणाची मुख्य देवता मृत्यूवर सत्ता असलेला "यम" आहे, जो कुठेच पुजला जात नाही, ज्याचं कुठेच मंदिर नाही. दिव्याची जोत ही आपल्या प्राण-ज्योतीचे प्रतिक मानले गेले आहे, म्हणून दिवाळीचे ५ दिवस यम-धर्मा साठी दिवे लावले जातात. इतर सण आपली ऐश्वर्य आणि आनंदाप्रीत्यर्थ असतात आपले आयुष्य सुख-कर जावे आनंदी राहावे ह्यासाठी असतात पण दिवाळी ह्या सणाचा मुख्य उद्देश आपला मृत्यू क्लेश-दायक होऊ नये, यम-यातना आपल्या नशिबी येऊ नयेत ह्यासाठी आहे.

दिवाळीची सुरवात वसू बारसे ने होते, वसू म्हणजे गाय ह्या दिवशी गोधन पूजण्याची पद्धत आहे. गोठयामध्ये संध्याकाळी दिवे लावून. दिवाळीला सुरवात होते. त्यानंतर दुसरा दिवस म्हणजे धन-त्रास म्हणजे,

धन-त्रयोदशी.

समुद्र मंथन चालू असताना, त्या मधून १४ रत्ने निघाली ती ह्याच दिवाळीच्या पर्व काळात. धन-त्रयोदशीच्या दिवशी देवांचा धन्वंतरी समुद्र मंथनातून उत्पन्न झाला. धन्वंतरी म्हणजे देवांचा वैद्य, महाविष्णूचा अवतार. ह्यानेच आयुर्वेदाची रचना केली असे मानले जाते. ह्या धन-त्रयोदशीच्या दिवशी वैद्यकीय क्षेत्रातील लोक धन्वंतरीची पूजा करतात, एवढी साधारण माहिति सगळयांनाच असणार पण धन-त्रयोदशी हा दिवस लक्ष्मी-कुबेर पूजनाचा दिवस आहे. ह्या दिवशी श्रीयंत्र पूजण्याला विशेष महत्व आहे कारण श्रीयंत्राची निर्मिती ह्याच दिवशी पूर्ण झाली आहे. श्रीयंत्र हे अगस्त्य-मुनींची पत्नी लोपामुद्रा हिने, तिच्याच द्वारा निर्मित श्री-सुक्ताची उपासना करून रेखले किंवा निर्माण केले आहे.

नहुष राजाने ह्या दिवशी विषय-उपभोगांना प्राधान्य देवून श्रीयंत्र पूजनच काय तर दर्शन पण टाळले होते आणि त्यामुळे त्याच्या आयुष्यात अडचणींना सामोरे जावे लागले. नहुष राजाला स्वतःच्या वैभवाचा नक्कीच अहंकार झालेला. ज्या आईमुळे आपल्याला हे वैभव प्राप्त झाले तिचे दर्शन घेणं, तिच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करणं हे जेव्हा जेव्हा माणसाला जड होते तेव्हा माणसाची दुर्गती निश्चित आहे. ह्या दिवशी न चुकता श्रीयंत्राचे दर्शन घ्यावे. धन-तेरसच्या दिवशी चांदीची भांडी, नवीन माल भरणे आणि चोपडा आणणे इत्यादी कर्मे व्यापारी वर्गात अत्यंत श्रद्धेने केली जातात.

त्या नंतर येते ती नरक-चतुर्दशी. काय असेल बरं हि संकल्पना? तर द्वापार युगात नरकासुर नावाच्या दुष्ट राजाने १६००० स्त्रियांना बंदी बनवून त्यांचे आयुष्य उध्वस्त केले. जिवंतपणीच त्या १६००० स्त्रिया नरक यातना भोगत होत्या. श्री-कृष्णाने सत्य-भामेच्या सहायाने ह्या नरकासुराचा वध केला. ह्या स्त्रियांना बंदिवासातून मुक्त केले पण प्रश्न होता कि ह्या भ्रष्ट झालेल्या स्त्रियांचा स्वीकार घरातले देखील करणार नाहीत. मुक्त होऊन पण ह्या स्त्रियांना मानाचे स्थान मिळणार नव्हते. पुन्हा ह्या स्त्रियांच्या वाटेला त्या नरक यातना येऊ नयेत म्हणून ह्या स्त्रियांशी कृष्णाने विवाह केला आणि समाजात मानाचे स्थान दिले. त्यांच्या नरक-यातना नाहीश्या केल्या. ती आठवण म्हणून आपण अभ्यंग स्नान करून कारीट्याचं फळ चिरडून नरक यातना येऊ नयेत अशी प्रार्थना करतो. आपण दिवे लागणीला "शुभंकरोती " म्हणतो त्यात आरोग्यम धन संपदा असा स्पष्ट उल्लेख आलाय. दिवाळीच्या दिवसात वातावरण रुक्ष असते म्हणून तिळाच्या तेलाने अभ्यंग करून अंगाला औषधी उटणे रगडून स्नान करायचे. रुक्ष वातावरणामुळे वात दोष वाढतो. त्याचे शमन म्हणून आयुर्वेदात अभ्यंग सांगितले आहे. असे अभ्यंग शक्यतो ह्या ऋतू मध्ये नियमितपणे घ्यावे. अभ्यंगामुळे आपली त्वचा मुलायम होते. ह्या दिवसात वातावरण थंड असल्यामुळे शरीराला अतिरिक्त स्निग्धता देवून शरीरातील रुक्षपणाचा

समतोल राखला जावा म्हणून दिवाळीत तळणीचा फराळ असतो.

आता संध्याकाळ झाली आहे. दारात सुबक रांगोळयांमध्ये दिवे तेवत आहेत. सगळीकडे दिव्यांचा झगमगाट आहे. वर्षातली सर्वात अंधारी तिथी म्हणजे अश्विन अमावस्या. समुद्रमंथन चालू असताना ह्याच दिवशी लक्ष्मी माता समुद्र मंथनातून सूर्यास्तानंतर प्रगटली, म्हणून ह्या दिवशी लक्ष्मीपूजन केले जाते. दिवाळीला लोकांनी आपल्या सोयीप्रमाणे वेग-वेगळया संपत्तीचे पूजन सुरु केले. त्यांनी गोधन, आर्थिक संपत्ती, सोने, धान्य इत्यादी संपत्तीलाच लक्ष्मी मानले. पण हि संपती तर नाशवंत आहे मग हिला लक्ष्मी अर्थात देवी म्हणून पूजणे कितपत योग्य आहे? कारण देवता म्हटले तर ती अक्षय, अविनाशी आणि स्थिर असायला हवी. तर अशी संपत्तीलक्ष्मी मात्र चंचल आहे. महाभारतामध्ये लक्ष्मीची स्थाने सांगितली गेली आहेत की लक्ष्मी सदाचारी लोकांच्या घरात स्त्रियांचा मान राखला जातो त्या घरात परमात्म्याचे संकीर्तन ज्या ठिकाणी होते, सदसद विवेक-बुद्धीने पुरुषार्थ करणाऱ्या / पराक्रम गाजवणाऱ्या पुरुषांच्या घरात राहते. मग ही लक्ष्मी नक्की कोण आहे, हिच्या हातात बघायला गेला तर कुठलंच शस्त्र नाही. बघायला गेलं तर शस्त्र आहे म्हणजे हिने कमळ धारण केलंय पण हे शस्त्र नाहीये. हिची कुठेच पुराण काळात स्वतंत्र मंदिरे नाहीयेत तरीही जुन्या लोकांच्या प्रत्येक पिढीत "लक्ष्मी" हे नाव कुण्यातरी आजी-पणजीचं असतंच. ही पत्नी कुणाची आहे तर "महाविष्णू"ची आणि त्याचे चरण हिने धरले आहेत म्हणजे हिने त्या महाविष्णूचे दास्यत्व घेतले आहे. हा महाविष्णू कसा आहे, तर "भक्त-वत्सल" आहे, सत्व-गुणी आहे, भक्तांसाठी धावून येणारा आहे आणि त्याचे चरण लक्ष्मीच्या हाती आहेत, "त्या" च्या चरणी हि राहते, महाविष्णूची भक्ती हीच लक्ष्मी आहे. आपल्याला महाविष्णूचे चरण दाखवायचं काम हि लक्ष्मी करते म्हणून योगीजन म्हणतात "मोक्ष-लक्ष्मी" हेच खरे मानवाचे धन आहे.

जो कुणी ह्या महाविष्णू (परमात्मा) ची भक्ती करतो त्याला मार्गदर्शन किंवा वाट दाखवायचा काम हि करते, म्हणून हि आली "अश्विन अमावास्येच्या" दिवशी. हा दिवस वर्षातील सर्वात जास्त अंधार आणि तमोगुण असलेला मानला जातो. संपत्ती आणि लक्ष्मी ह्या दोन्ही खूप वेगळया गोष्टी आहेत. लक्ष्मी पूजनाच्या दिवशी नुसती संपत्तीची किंवा लक्ष्मीची पूजा न करता तिचा स्वामी असलेला महाविष्णू ह्याची पूजा करायला हवी. साधं गणित आहे. जिथे नवरा आहे तिथेच त्याची बायको आनंदाने राहते. आपण विसरतो ह्या महाविष्णूला जो मन:शांती आणि समाधान देणारा आहे. आता आपणंच ठरवायचं कि आपल्याला नुसता पैसा हवाय कि मन:शांती आणि समृद्धी हवी .

लक्ष्मी पूजन आटोपल्यावर पाडवा म्हणजे कार्तिक शुद्ध प्रतिपदा हा दिवस बळी प्रतिपदा म्हणून ओळखला जातो. ह्या दिवशी महाविष्णूने वामन अवतार धारण करून "बळी " नावाच्या राजाला पाताळात दडपले असा उल्लेख आहे.
शेतकऱ्यांच्या मते "बळी" हा कृषीवल संस्कृतीचा आदर्श आहे. बळीराजा हा राजा असून शेतीच्या कामांना प्राधान्य द्यायचा. त्याच्या प्रीत्यर्थ शेतकरी त्याची चित्रे रेखाटून पूजा करतात. "इडा-पिडा टळो, बळीराजाचं राज्य येवो" अशी प्रार्थना करतात. काही ठिकाणी अंगणामध्ये सूर्योदयाच्या वेळेस शेणाचे ५ गोळे रचून त्यावर दिवे ठेवून पांडव पूजन केले जाते तर काही ठिकाणी बैलांच्या शर्यती आणि मिरवणुकी काढल्या जातात.

ह्या दिवसाला कृष्णाने वेगळंच महत्वं दिलंय. एकदा कृष्ण द्वारका नगरीत सकाळच्या वेळी न्याहारीला लोणीच खायचे आहे असा हट्ट करू लागले. अक्ख्या नगरीमध्ये लोणी हुडकले गेले पण कुठेच लोणी मिळेना. श्री कृष्ण वैतागून द्वारका नगरी सोडून निघून गेले आणि गुराख्याचा वेश घेवून बासरी वाजवत लोणी शोधू लागले. त्यांना समोर एक डोक्यावरून पदर घेतलेली गवळण दिसली. गुराखी रूपातील कृष्णाने तिच्याकडे लोणी मागितले. पदराने तोंड झाकलेली ती गवळण बोलली कि माझ्या कडे लोणी आहे पण ते माझ्या घरी आहे, तुला मी ते खाऊ घालेन पण माझी एक अट आहे. माझ्या घरी येताना तू तुझे डोळे बंद ठेवायचेस. कृष्णाने डोळयांवर पट्टी बांधून घेतली. कृष्णाने विचारले कि मला दिसत नाहीये मग मी तुझ्या घरी अचूकपणे येऊ कसा? तेव्हा ती गवळण म्हणाली कि माझ्या पैंजण आणि बांगड्यांच्या आवाजाने तुला मार्ग सापडेल. तू त्या आवाजाकडे नीट लक्ष दे. भगवान कृष्ण आणि गवळण बाई तिच्या घरी येतात. ती गवळण लोणी वाढते. कृष्ण पट्टी उघडतो. गोंधळतो. हि बाज तर ओळखीची वाटतेय. हे घर पण ओळखीचं वाटतंय. लोणी खाऊन बघतो, लोण्याची चवपण ओळखीची वाटते. कृष्णाच्या लक्षात येतं कि आपण आपल्याच घरात आहोत आणि हि गवळण स्वतः रुक्मिणी माता होती. कृष्णाने विचारलं कि बाई गं लोणी कुठून आणलंस? रुक्मिणी माता म्हणली, तुम्ही घर सोडून

गेलात. माझा संसार वाचवण्यासाठी तुमच्याही दुप्पट वेगाने मी गोकुळात गेले, तिथून लोणी घेतलं आणि तुम्हाला शोधून इथे असा आणला. कृष्ण रुक्मिणीच्या प्रेमाने गहिवरतो व तिला वर देतो कि आजच्या दिवशी जे पती पत्नी भांडण न करता एकत्र जेवतील, पत्नी प्रेमाने जेवण बनवून तिच्या पतीला जेवू घालेल त्यांचा संसार मोडणार नाही. आपण ह्या गोष्टीचा भावार्थ असा घेवूया कि एक दिवस तरी आपण सगळे कलह विसरून आपल्या जोडीदारासाठी ठेवून आनंद उपभोगुया.

दिवाळीचा शेवटचा दिवस यम-द्वितीया. म्हणजे भाऊ-बीज. ह्या दिवशी यमराज त्यांच्या बहिणी यमी म्हणजे यमुनेकडे गेले होते. त्यांनी त्यांच्या बहिणीकडे भोजन केले. तिला आहेर दिला. तेव्हापासून कार्तिक शुद्ध द्वितीयेचे दिवशी भावाने आपल्या बहिणीच्या घरी जाण्याची प्रथा पडली. आपल्याकडे एकदा मुलीचे लग्न झाले कि तिच्या सासरचे पाणीसुद्धा घेतले जात नाही. हा तिरस्कार वगैरे नाहीये तर आदर आहे पण प्रेम आणि जिव्हाळयाचे संबंध दोन्हीकडून जपले जावेत हाच ह्या सणाचा उद्देश मला तरी वाटतो ह्या दिवशी कणकेचा दिवा करून तो उंबरठ्याच्या कोपऱ्यात यमदेवतेसाठी ठेवला जातो.

खरतंर देव-दिवाळी म्हणजे मार्ग-शीर्ष सुरु झाल्यावर दिवाळीचा सण आटोपतो पण हल्लीच्या धकाधकीच्या जीवनात, पाच दिवसांचे महत्व जाणून निदान ५ दिवस तरी सांगितलेल्या गोष्टी आपण नक्कीच पाळू शकतो आणि आपल्या संस्कृतीशी तुटत चालेली नाळ पुन्हा सांधू शकतो.

**वनीकरण - का ?व कसे ?** **राजीव पंडित**

अमेरिकेतील सॅण्डी हरिकेन नंतर वातावरण बदलाची चर्चा रंगात आली आहे. पृथ्वीवरील वनस्पतींचे आच्छादन कमी झाल्याने 'ग्रीन हाऊस इफेक्ट' होऊन हवामान बदल होतो आहे असे काही गटांचे म्हणणे आहे तर काही गट म्हणत आहेत की पृथ्वीवर असे वातावरणातील बदल नेहमीच घडत आले आहेत. यातील वाद आपण बाजूला ठेऊ. वनस्पतींचे महत्व काय? असा प्रश्न विचारला तर बहुतांशी लोक, "जंगलामुळे पाऊस पडतो व झाडे हवा शुद्ध करतात" असे उत्तर देतात. जंगलांचे अनन्यसाधारण महत्व आपल्या ऋषीमुनींना प्राचीन काळापासून समजले होते. ते आजच्या माहितीयुगात आपण विसरलो आहोत.

इंग्रजांनी भारतातून कच्चा माल विशेषतः लाकूड मिळवण्यासाठी भारतात वनखाते निर्माण केले व भारतीय जंगलांची, त्यातील वनसंपदेची गणना केली. वनखाते निर्माण करून त्यांनी स्थानिक लोकांचे जंगलावरचे हक्क नष्ट केले. त्यापूर्वी आदिवासी व जंगलाभोवती असणाऱ्या वस्त्यांमधील लोक जंगलातून मध, लाकूड, गवत गोळा करत व पोटासाठी प्राण्यांची शिकार करत. उपजिविका जंगलावर अवलंबून असल्याने आजच्या भाषेत त्यांची जीवनशैली 'पर्यावरणस्नेही' होती. गरजेपुरतेच जंगलातून मिळवायचे व पुढील पिढ्यांसाठी जंगल संपत्तीचे संरक्षण करायचे ही त्यांची मानसिकता होती. पण इंग्रजांनी वनखाते निर्माण करून व जंगलाची मालकी सरकारी करून लोक व जंगल हे नाते तोडले. आजच्या मानव-वन्य प्राणी संघर्षाची बीजे त्यात आहेत. त्याचबरोबर ब्रिटिशांनी स्वार्थासाठी का होईना पण केलेली वनसंपदेची गणना आज आपल्याला 'जैवविविधता' गणनेसाठी पायाभूत उपयोगाची ठरते.

१९०० साली ब्रिटीशांनी केलेल्या त्याकाळच्या एकत्र भारताच्या एकूण भूभागाच्या ३३% भूभागावर जंगले होती. ६०,००० वाघ त्या जंगलात होते. गेल्या वर्षी भारत सरकारच्या वनखात्याने केलेल्या गणनेनुसार फक्त ११% भूभागावर जंगल शिल्लक आहे. १७०० च्या आसपास वन्य अवस्थेतले वाघ टिकून आहेत. जंगले कमी झाली तर काय होईल हे वाघांची संख्या दर्शवते (वाघांची संख्या याच जंगलात जास्त असू शकते पण ती नाही याला अनेक कारणे आहेत. तो या लेखाचा विषय नाही. जंगलांचा आकार हा एकच मुद्दा आपण घेऊ.)

जंगले नष्ट झाली तर काय होईल याचा हिशोब लोकांपुढे मांडण्यापेक्षा ती टिकवल्याने आपल्या आजच्या जीवनाला काय फायदा मिळतो हे सांगणे जरूरीचे आहे. लोकांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सहभाग जंगल संवर्धनात असल्याशिवाय हे काम होणार नाही.

जंगले वाचवायची कशासाठी?

मानवाला उपयोग:

* अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजा भागवण्यासाठी आपण अजूनही बहुतांशिपणे वनस्पतींवरच अवलंबून आहोत.

* पाणी आपले जीवन आहे. पिण्यासाठी व स्वच्छतेसाठी ते गरजेचे आहेच शिवाय वीज निर्मितीसाठी hydro electric power station मधे पाणी लागते, शेतीसाठी पाण्याची गरज आहे. ज्या नद्यांच्या काठाने जंगले आहेत त्या नद्या बारमाही पाणी देतात.

* लाकूड, कापूस, अनेक प्रकारची औषधे, धान्य, फळे वनस्पतींपासून मिळतात.

* मध, लाख, तेंदूपत्ता, मोह, हिरडा, बेहडा, आवळा यासारखी वनोपज (NTFP) केवळ जंगलातूनच मिळू शकतात.

इकॉलॉजिकल उपयोगः

* प्राणवायू: - पृथ्वीची निर्मिती साधारण ४.८ अब्ज वर्षांपूर्वी झाली. ३.८ अब्ज वर्षांपूर्वी समुद्राच्या उथळ पाण्यात पहिला सजीव जन्माला आला. हा एकपेशी सुक्ष्मजीव ऑक्सिजनशिवाय जगणारा होता. नंतर काही लाख वर्षांनी अपघाताने काही जीवांत हरितद्रव्य निर्माण झाले. त्यांनी पाण्यातील कार्बनडायऑक्साईडचे ऑक्सिजनमधे रूपांतर करण्यास सुरूवात केली. वनस्पती या जीवांपासून पुढे विकसित झाल्या. जमिनीवर आल्यावर वनस्पतींनी हवेतील कार्बनडायऑक्साईडचे ऑक्सिजनमधे रूपांतर करण्यास सुरूवात केली. हळूहळू वातावरणात २१% या प्रमाणात ऑक्सिजन स्थिरावला. यामुळेच पृथ्वीवर एवढी जिविधता निर्माण झाली व टिकली.

* अन्नसाखळी: - सूर्यापासून येणाऱ्या उर्जेचे हरितद्रव्याच्या सहाय्याने अन्नात रुपांतर करण्याची क्रिया वनस्पतीत घडते. वनस्पतींशिवाय इतर कोणताही इतर जीव स्वत:चे अन्न तयार करू शकत नाही. अशा वनस्पतींवर शाकाहारी प्राणी जगतात. त्यांच्यावर मांसाहारी प्राणी जगतात. दोघेही मेल्यावर सुक्ष्मजीव त्यांचे विघटन करतात व ते घटक मातीत मिसळतात. त्यावर पुन्हा वनस्पतींचे पोषण होते. ही अन्नसाखळी केवळ वनस्पतींमुळेच निर्माण झाली आहे.

* जलधारणा: - पाऊस जमिनीवर पडताना जर तो प्रथम वनस्पती आच्छादनावर पडला तर त्याचा जमिनीवर आदळण्याचा वेग कमी होतो. यामुळे जमिनीची धूप कमी होते व पाणी मुरायला जास्त वेळ मिळतो. परिणामी भूजल पातळीत वाढ होते.

* पाऊस पडल्यावर डोंगरावरून ओढे वाहायला सुरूवात होते. या ओढ्यांच्या काठाने वनस्पती असल्या तर त्यांची मुळे जमिनीत पाणी धरून ठेवतात. पावसाळ्यानंतर ओढ्यातील पाण्याची पातळी कमी होऊ लागली की मुळांनी मातीत धरलेले पाणी ओढ्याच्या पाण्यात झिरपायला सुरूवात होते. यामुळे ओढ्यात वाहणाऱ्या पाण्याचा कालावधी वाढतो.

* मातीची धूपः - डोंगरमाथ्यावर व उतारावर वनस्पती विशेषतः गवते असली तर पावसाचे पडणारे पाणी तेथील माती नेऊ शकत नाही कारण मुळांनी माती घट्ट पकडलेली असते. उघड्या डोंगरावरील माती पावसाळ्यात वाहून जाते व तेथील खडक उघडे पडतात. सध्या आजूबाजूच्या डोंगरावर हेच दृष्य दिसते. या परिस्थितीनंतर तेथे वनस्पती लावणे व उगवणे अशक्य बनते. यासाठी डोंगर उतारावर व ओढ्यांच्या काठाने गवताळ कुरणे असणे आवश्यक आहे.

* जिविधता: - भारतातील हवामानात (मुख्यतः पर्जन्यमान, हवेतील आर्द्रता व तापमान) यात प्रचंड विविधता आहे. त्यामुळे भारतात विविध प्रकारची जंगले आहेत. या विविध प्रकारच्या जंगलात नांदणारी जिविधता त्यामुळेच भारतात पाहायला मिळते. भारताचा भूभाग जगाच्या फक्त २% आहे तर जैवविविधता मात्र जगाच्या एकूण विविधतेच्या ८% आहे. भारतात आज वनखात्याकडे जमिन व जंगल मिळून ७७.४ दशलक्ष हेक्टरवर जमीन आहे. कायद्यानुसार ही संरक्षित जंगले आहेत. येथील वनसंपदा चांगल्या अवस्थेत असणं अपेक्षित आहे पण दुर्दैवाने ३७% जंगले आज कमी प्रतीच्या (Degraded) जंगलात बदलली गेली आहेत. याला अनेक कारणे आहेत.

१) जंगलांचे रुपांतरणः - विकासाच्या नावाखाली जंगलक्षेत्र इतर कामासाठी रुपांतरित केले गेले. रेल्वे लाईन, रस्ते बांधणे, धरणाच्या पाणलोट क्षेत्रात बुडणे, खाणींना परवानगी देणे, वीज मनोरे बांधकाम इ. १९५० ते ८० या कालावधीत दरवर्षी दीड लाख हेक्टर जंगलांनी व्यापलेली जमीन विकासकामांसाठी रुपांतरीत झाली.

२) परिसंस्थांचा नाशः - नदीकाठ, ओढे, तळी, वेटलँड्स, सडे यांना वेस्ट लँड संबोधून त्यांचा विकास करण्याच्या आचरट कल्पनेतून तेथील वनसंपदेचा व पर्यायाने परिसंस्थांचा मोठा नाश शासकीय योजनांतून झाला.

३) फिरती शेती: - जंगलाचा छोटा भाग कापून तेथे शेती केली जाते. ही जमीन सुपीक नसल्याने दर तीन वर्षांनी जमिन बदलावी लागते. भारतात जवळपास १० दशलक्ष हेक्टर जंगल फिरत्या शेतीखाली दुय्यम दर्जाचे झाले आहे.

४) वनोपज गोळा करणे : - भारतातील फार मोठी जनता आजही इंधनासाठी लाकडावर अवलंबून आहे. यासाठी सतत तोड होऊन चांगल्या वृक्षांना खुरटे स्वरूप प्राप्त झाले आहे व त्यांच्यापासून मिळणारा इकॉलॉजिकल उपयोग कमी होतो आहे. तसेच मोह, मध, तेंदूपत्ता इ. वनोपजांना

बाजार मोठी किमंत मिळायला लागल्यापासून त्यांची तोड मोठ्या प्रमाणात सुरू आहे. झाडांच्या वाढीवर व पुढील पिढी वाढण्यावर याचा विपरीत परिणाम होतो आहे.

५) चराई: - भारतातील अंदाजे २७० दशलक्ष गुरे जंगलात चराईसाठी घुसवली जातात. याने जंगलातील गवतावर मोठा ताण आला आहे. त्याचा परिणाम जंगली प्राण्यांच्या खाद्य उपलब्धतेवर झाला आहे.

६) आगी लावणे: - भारतातील जंगलांना नैसर्गिक आग लागत नाही. विविध कारणांनी आग लागून ५५% जंगले आगीत होरपळतात व नवीन उगवलेली रोपेही यात जळतात.

७) लाकूडतोडः - साग, चंदन, शिसू, बांबू यासारख्या वृक्षांची कागद, बांधकाम, फर्निचर यासाठी मोठ्या प्रमाणात अवैध तोड व विक्री होते. अर्जुन, यासारखे वृक्ष औषधासाठी तोडले जातात.

८) कचरा: - जंगलात कॅरिबॅग, पाण्याच्या बाटल्या वगैरे प्लॅस्टिकचा कचरा वाढू लागला आहे. पाणी मुरणे, वनस्पतींची मुळे खोलवर जाणे आदि क्रियांवर याचा वाईट परिणाम होतो आहे.

९) परकिय जातींची वाढः - भारतात आणलेल्या परकिय वनस्पतींना येथे नैसर्गिक शत्रू नसल्याने त्यांची संख्या येते प्रचंड वाढते. उदा. निलगिरी, सुबाभूळ, ग्लिसिडीया, टणटणी, कॉसमॉस, काँग्रेस गवत, जलपर्णी इ. त्यांच्यामुळे स्थानिक वनस्पतींच्या वाढीवर बंधने येतात. स्थानिक वनस्पती कमी झाल्या की त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या इतर प्रजातींच्या संख्येत घट होते.

१०) शहरांची वाढः - जंगलांचा आकार कमी झाला आहे व त्यांची सलगता कमी झाली आहे कारण मानवी वस्ती वाढते आहे. यामुळे प्राण्यांच्या संख्येवर व त्यांच्या भटकंतीवर परिणाम झाला आहे. कॉरिडॉर नष्ट झाल्याने प्राण्यांना स्थलांतर करता येत नाही. यामुळे त्यांचे क्रॉस ब्रिडींग होत नाही. परिणामी जनुकीय प्रदुषण होऊन त्याची परिणती कमजोर नवी पिढी जन्माला येण्यात होणार आहे.

यावर उपाय म्हणून वनीकरण केले जाते. आज हे काम वनखात्याचे सामाजिक वनीकरण विभाग व सामाजिक संस्थांद्वारे प्रामुख्याने केले जाते. या वनिकरणांचा उद्देश चांगला असला तरी ते बहुतेक वेळा ते शास्त्रीय पद्धतीने, विचारपूर्वक केले जात नसल्याने त्या अपेक्षित परिणाम होताना दिसत नाही. किंबहुना बऱ्याच वेळा नुकसानच झालेले दिसते.

वनीकरणात घडणाऱ्या प्रमुख चुका पुढीलप्रमाणे:

१) बऱ्याचवेळा परकिय वृक्षांची लागवड केली जाते.

२) एकाच जातीची झाडे एका क्षेत्रात लावली जातात. निसर्गाला हे मान्य नसते. त्यामुळे अशा ठिकाणी झाडे असूनही प्राणी, पक्षी, कीटक यांचे वैविध्य आढळत नाही. सामाजिक वनीकरण खात्याने केलेल्या वनीकरण प्रकल्पात ग्लिसिडीया, सुबाभूळ किंवा सुरूचे प्लँटेशन दिसते.

३) जमिनीवर गवताचे आच्छादन न वाढवता प्रथम वृक्षांची लागवड करतात. गवत असते तर तेथील जमिनीतील आर्द्रता वाढली असती. असे घडत नाही. त्यामुळे रोपांना खूप प्रमानात पाणी घालून जगवावी लागतात.

४) 'देशी झाडे लावा' याचा प्रचार खूप झाल्याने संस्था जेथे वनीकरण करतात तेथे याबाबत जागृती झाल्याचे दिसते. पण यात 'स्थानिक जाती लावा' असे फारसे घडत नाही. त्यामुळे सरसकट सगळीकडे सीतेचा अशोक, आंबा, सुरंगी वगैरेही झाडे लावताना दिसतात. स्थानिक पर्जन्यमानात येणारी झाडेच लावली नाहीत तर त्यांना सतत पाणी द्यावे लागते.

हे सर्व टाळण्यासाठी वनीकरणाचा सार्वत्रिक विचार करून एक 'धोरण' ठरवणे गरजेचे आहे. सामाजिक संस्था, शासनाचे वनखाते, स्थानिक स्वराज्य संस्था व व्यक्ती या सर्वांचा यात समावेश व हातभार असावा. वनीकरण करताना काही वर्षानी त्याचे जंगलात रुपांतरण होताना पाहू असे वाटते पण एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी की जंगले नैसर्गिक असतात. मनुष्य जंगल तयार करू शकत नाही.

यासाठी पुढील व्याख्या पहा:

F – Flora and Fauna ( वनस्पती व सर्व प्रकारची प्राणी जीवन)

O - Organisation (वनस्पती व प्राणी यांचे एकमेकांशी संबंध)

R - Regeneration (नवीन वनस्पती उगवण्याची क्रिया)

E – Energy Flow (मातीतून उगवलेल्या वनस्पतींनी शोषलेली सौरउर्जा त्यांनी तयार केलेल्या अन्नाद्वारे जीवसाखळीतील विविध घटकांपर्यंत पोचून शेवटी पुन्हा मातीत मिळण्याची क्रिया.)

S - Stratification ( वेगवेगळया उंचीच्या झाडांचे थर)

T – Trophic Web (अन्नजाळे)

मनुष्याचा हस्तक्षेप नसेल तर तुटलेले जंगल नैसर्गिकरित्या तयार होण्यास सुमारे हजार वर्षांचा अवधी लागतो हे ध्यानात ठेऊन वनीकरण करावे लागते. शास्त्रिय पद्धत वापरल्यास नैसर्गिक जंगलाच्या जास्तीत जास्त जवळ जाणारी प्रतिकृती तयार करणे शक्य होते.

म्हणून;

१) शहरात वनीकरण करताना रस्त्याची कड, सार्वजनिक बागा, वैयक्तिक बागा, घराची गच्ची याचा स्वतंत्र विचार करावा व त्यानुसार वनस्पतींच्या जाती निवडाव्यात. शहरात रस्त्याच्या कडेने सुशोभिकरण करताना परकीय जाती लावल्या तरी फारसा फरक पडत नाही. पण नदी, तलाव, डोंगरावर मात्र स्थानिक देशी वनस्पतीच लावाव्यात.

२) कोठेही वनीकरण करताना तेथे पूर्वी काय होते याची माहिती घ्यावी. पूर्वापार एखाद्या ठिकाणी गवताळ माळरान किंवा खुरटे काटेरी वनच असू शकते. तेथील प्राणीजीवन त्याला सरावलेले असते. आपण गवताळ माळरानात वृक्ष लावतो. ही निसर्गात ढवळाढवळ ठरते.

३) वनीकरण करण्यापूर्वी त्या जागेला गुरे चराई व उपद्रवी लोकांपासून संरक्षण द्यावे. एक ते दोन वर्षे तेथे गवत वाढवावे. त्यामुळे जमिनीतील आर्द्रता व सुक्ष्मजीव वाढतात.

४) वेगवेगळया वयाची रोपे निवडा. वेगवेगळया काळात वनीकरण करा.

५) निवडलेल्या वनस्पती जातीत वृक्ष, झुडूपे, वेली यांचा समावेश करा.

६) वृक्षांत काही फळे देणारी, काही आडव्या फांद्या वाढणारी, काही शेंगावर्गीय व काही भरपूर मधुरस असणारी फुलझाडे लावावीत.

७) वनीकरण ज्या क्षेत्रात करणार आहोत तेथील मुळची झुडपे, वनस्पती व वृक्ष टिकवावेत.

८) त्या जागेतील ओढे किंवा तळी टिकवावीत.

९) तेथे पडलेले वृक्षांचे ओंडके व दगड धोंडे राखावेत.

वनीकरणातून अपेक्षित फायदे मिळवण्यासाठी यापुढील काळात आपण सर्वांनी याकडे शास्त्रिय दृष्टिकोनातून पाहण्याची व मागील काळात घडलेल्या चुकांपासून बोध घेण्याची गरज आहे.

**क्षितीज** — **सुरज उतेकर**

क्षितीज गाठण्याचे जुने स्वप्न
मी केव्हाचेच सोडले आहे....
क्षितिजापार झेपावण्याचे
मनोमन ठरवले आहे...

किती सहजतेने लिहिली हि चारोळी....! पण क्षितीज गाठण आणि क्षितिजापार झेपावण इतक सोप आहे का...?क्षितीज म्हणजे नेमक काय...? जिथे धरती आणि आकाश यांच मिलन झाल्याच दिसत तेच क्षितीज. आपल्या लाडक्या बहिणीला प्रेमाने मायेची कूस देणाऱ्या आणि तिच्या पाठीशी सदैव उभ्या राहणाऱ्या भावाच आणि बहिणीच ते मिलन असत. अगदी बरोबर....आपल क्षितीज देखील तसच असत. आपल्या स्वप्नांचं (ध्येयांच) आणि प्रयत्नांच्या पराकाष्ठेच जिथे मिलन होत तेच आपल क्षितीज. प्रयत्नांची पराकाष्ठा करून त्याला नशिबाची जोड मिळाली कि हे क्षितीज सहज गाठता येत. पटतय का तुम्हाला हे...?

दहावीच्या सहामाही परीक्षेत गणितात ७५ पैकी ७२ गुण मिळाले होते. तेव्हा सर म्हणाले,"सुरज आता क्षितिजापार झेप जायला हवी." तेव्हा त्यांच्या बोलण्याचा रोख काही कळला नाही. आणि तो जाणून घेण्याच्या भानगडीतही तेव्हा पडलो नाही. आज हि चारोळी सुचली आणि मग मन त्या क्षितिजाला न्याहाळत बसल. क्षितिजाच ते सुंदर लोभस रूप डोळेभरून पहावास वाटलं आणि त्याने माझ्या मनावर कधी अभिराज्य गाजवले काही कळले देखील नाही. खरच आपल मन किती भोळ असत ना.....! कोणीही त्यावर अधिपत्य गाजवू शकत. आज क्षितीज गाठायचेच अस मनोमन ठरवून  मी निघालो त्याच्या भेटीला. अरे हे काय अगदीच हाकेच्या अंतरावर आहे हे क्षितीज. म्हणून एक एक पाउल उचलत पुढे निघालो. पण नाही हे क्षितीज मात्र आहे त्याच अंतरावरून मला खुणावत होत. उगाच हसत होत. एखाद्या खोडकर पोरासारख उगाच जीभ दाखवून चिडवत होत. शेवटी थकलो आणि डेरेदार वडाच्या सावलीत क्षणभर विसावलो. आणि मग आठवण झाली 'आकाश'ची. ७-८ वर्षाचं कोवळ पोर ते. एकदा हट्ट करून बसल क्षितिजापर्यंत जायचं. क्षितीज म्हणजे काय ते जवळून अनुभवायचं. लागलीच त्याची कल्पना त्याने त्याच्या बालमित्रांना सांगितली. अजाण कोवळी पोर ती. एक वेगळच कुतूहल जागल आणि सारे ते क्षितीज पाहायला सज्ज झाले. रविवार सुट्टीचा दिवस पाहून सारे गेलेक्षितीज पाहायला. पण क्षितीज म्हणजे नेमक काय रे आकाश...? कोण्या एका मित्राने विचारलं. "ते तिथे दिसतंय बघ जमीन आभाळाला स्पर्श झालेय तेच क्षितीज. माझ्या आजोबांनी सांगितलय मला", आकाश म्हणाला. 'अरे, हे क्षितीज किती जवळ आहे. आपण पटकन जाऊ तेथे' अस म्हणत सगळे पळत सुटले. बराच वेळ झाला पण अंतर काही कमी होत नव्हत. सूर्य डोक्यावर आला आणि हि चिमुरडी कोवळी फुल पार कोमेजून गेली. त्यांना जवळच एक छोटीशी झोपडी दिसते. कमीत कमी तहान भागवायला पाणी तरी मिळेल या आशेने हि सगळी मुल त्या झोपडीकडे धाव घेतात. आजीबाई चिमुरडी थकलेली पोर पाहून त्यांचा चांगला पाहुणचार करते. सगळी हकीकत ऐकल्यावर ती पोट धरून हसते आणि त्या मुलांच्या कुतूहलाच कौतुक देखील करते.

आजीबाई म्हणते,"मुलांनो तुमच्या सारखी मी काही शाळेत गेले नाही. पण तुमच्यापेक्षा चार पावसाळे अधिक पाहिले आणि अनुभवले आहेत. म्हणून क्षितीजाबाबतीत मी जे काही अनुभवलं ते तुम्हाला सांगते. तुमच्या इतकी असताना मी पण गेले होते या क्षितिजाला भेटायला. पण आगाऊ मेला नाहीच आला भेटायला. मुलांनो हा क्षितीज आहे ना तो खूप लब्बाड आहे. फसवतो सगळयांना आता इथे असतो आणि आपण त्याच्या जवळ गेलो कि लांब जाऊन उभा राहतो. म्हणून तुम्ही आता त्याला भेटायला जाऊ नका. खरतर तुम्हाला असे बरेच क्षितीज केव्हाचेच भेटले आहेत." आच्छर्यचकित होऊन एकमेकांकडे पहात ती मुले म्हणाली,"ए आजी, तू  खोट बोलतेयस. आम्हाला तर एकही क्षितीज नाही मिळाल." आजीबाई म्हणाल्या,"बाळांनो हीच तर खरी गम्मत आहे. तुम्ही अजून लहान आहात ना...! मोठे झालात कि कळेल सगळ." एवढ्याने मुलांच समाधान काही झालं नाही. पण आजी म्हणतेय तर मोठ झाल्यावर कळेल म्हणून ती मुलही मुकाट्याने मागे फिरली.

मला आकाश आठवला कारण आज मी देखील त्याच्याच सारख वागत होतो. आपल्यालाही कोणी आजीबाई भेटतील आणि असच सांगतील

का...? बास झालं आता आणखी या क्षितिजाच्या शोधात नाही फिरणार मी. आजीबाईंनी काय सांगितलं होत आठवतंय तुम्हाला....."बाळांनो तुम्हाला असे बरेच क्षितीजकेव्हाचेच भेटले आहेत." हो अगदी बरोबर आहे. आता मला आजीबाईंच्या बोलण्याचा रोख कळला. आता मी जिथे उभा आहे तिथेच हा क्षितीज मला काही वेळापूर्वी दिसला होता आणि त्याच्याच भेटीला मी आलो होतो. पण इथे आलो तर तो आणखी पुढे सरकला होता. अस बरेचदा झालं होत. हो मी असे बरेच क्षितीज मिळवले आहेत.

आणि क्षितिजापार झेपावण्याची जिद्द याचमुळे मिळाली असावी. आपण आयुष्यात एक स्वप्न पाहतो ते आपल क्षितीज असत. ते गाठलं कि आपण आणखी नव स्वप्न पाहतो. ते पूर्ण झालं कि आणखी एक नवीन स्वप्न. हा क्रम असाच वाढत राहतो कायम. म्हणजेच काय तर आपल क्षितीज पुढे सरकतंय. याचा अर्थ आपण असे बरेचसे क्षितीज पाहिले आहेत. त्यापुढे झेपावलो आहोत तेव्हाच तर नवीन क्षितीज दृष्टीक्षेपात आलं ना. खरच हे क्षितीज वेड लावत. आपल क्षितीज आपण गाठलं असूनही ते आपल्याला कळत नाही. बरेचदा असच होत आणि मग आपण पुन्हा क्षितिजाच्या शोधात फिरतो. आणि शक्य झालेली गोष्टही अशक्य समजून बसतो. चला मान्य करा तुम्ही असे बरेचसे क्षितीज गाठले आहेत आणि यापुढेही गाठणार आहात.

**शहरातील पाळीव हत्तींचे वास्तव्य** — **प्रभाकर कुकडोलकर**

२००५ साली मी संजय गांधी राष्ट्रीय उद्द्यान, बोरीवली येथे असताना सकाळी दहाच्या सुमारास पोलीस कंट्रोल रूम कडून एक संदेश मिळाला की मुंबईत एका हत्तीने भर मार्केटमध्ये धुमाकूळ घातला असून वन विभागाने हत्तीला काबूत करण्यासाठी तातडिने उपाययोजना करावी.आवश्यक सामानाची जुळवाजुळव करी पर्यंत संबंधित पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्याचा तीन चार वेळा दुरध्वनी आला. त्यावेळी परिस्थिती खरंच गंभीर असल्याचे आमच्या लक्ष्यात आले.आम्ही लगेच निघालो.आमच्या जवळ स्वत:चे वाहन होते,हत्तीला बेशुध्द करण्यासाठी लागणारे सर्व साहित्य होते. राष्ट्रीय उद्द्यानाचे पशुवैदयकिय अधिकारी होते.चार पाच सहाय्यक होते पण आमची चिंता वेगळीच होती ती म्हणजे आमच्यापैकी एकालाही असा प्रसंग हाताळण्याचा अनुभव नव्हता. आणि बेशुध्द केल्या नंतर हत्तीचे काय करायचे याची कल्पना नव्हती.आमच्या दृष्टिने व्यवस्थापनातील ती सर्वात मोठी त्रुटी होती.पण समोर दुसरा कोणताही पर्याय नव्हता.जागेवर काय रणकंद माजले असेल याची कल्पना करता येत नव्हती.

पोलीस अधिकाऱ्याने इतकीच माहिती दिली होती की बाजारात हत्ती फिरत असतांना एका बेवडयाने हत्तीच्या सोंडेला विळखा घातला. हत्तीने त्याला झटकण्याचा प्रयत्न केला. पण त्याने हत्तीची सोंड सोडली नाही. तेव्हा हत्तीने त्याला कचऱ्या सारखे दुर भिरकावून दिले.ते पाहाताच बाजारात हत्ती पिसाळल्याची अफवा पसरली आणि एकच गोंधळ माजला.

आम्ही पोलीस स्टेशनला पोहोचलो तेव्हा पोलीस स्टेशन समोर हत्ती निवांत झुलताना पाहिला आणि आम्ही श्वास सोडला.मुळात हत्ती बिथरला नव्हताच. केवळ लोकच जिवाच्या भीतीने सैरभैर झाले होते.आणि पळापळ करत होते त्यामुळे हत्ती थोडा गोंधळला.पण माहुताने त्याला लगेच काबूत आणले होते. प्रशिक्षित माहूताचे महत्व त्यादिवशी प्रकर्षाने जाणवले.काही वर्षांपुर्वी पुण्यात बेवारस हत्तीला कोणी सांभाळायचे यावरून महानगरपालिका आणि वन विभाग यांच्यात बऱ्यापैकी वाद झाला होता.खर्चाची बिले देण्यासाठी पैसे नसल्याचे तत्कालीन मुख्य वनसंरक्षक यांनी स्पष्ट केले होते. आणि पुणेकरांच्या टिकेचे ते धनी झाले होते.पुण्यात नुकत्याच बेवारस हत्तीनीचा मृत्यु आणि कोल्हापुर शहरात बिथरलेल्या हत्तीने घातलेला धुमाकूळ यामुळे शहरात वास्तव्य करणाऱ्या हत्तींचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

भारतात इग्रजांनी १८६० साली शास्त्रिय तत्वावर वने आणि वन्यप्राण्यांच्या व्यवस्थापनाला सुरवात केली.तत्पुर्वी भारतात हत्तींच्या हत्तेवर कोणतीच बंदी नव्हती. पण हत्तींचे महत्व ओळखून मद्रास प्रेसेडेंसीने १८७३ साली 'मद्रास वाईल्ड एलिफंट ॲक्ट' केला.देशातील वन्यप्राण्यांच्या संवर्धनासाठी करण्यात आलेला तो देशातील पहिला कायदा होता.१८७९ साली भारत सरकारने 'एलिफंट प्रिझर्वेशन ॲक्ट केला.त्यानतंरच्या 'वन संरक्षण कायदा १९२७' आणि काही राज्य सरकारांनी केलेल्या स्थानिक कायद्यांनी हत्तींना कायद्याचे संरक्षण मिळाले.'वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२' च्या कायदयाने देशातील वन्यजीवांना सर्वात अधिक संरक्षण दिले.असे असले तरी वन्यप्राण्यांच्या शिकारीवर पुर्ण बंदी घालण्यात आली नव्हती.त्यामुळे हत्तींचा ऱ्हास सुरूच राहिला.नव्या कायदयात हत्तींचा समावेश अनुसूची २ मध्ये करण्यात आला होता.कायदयाच्या भाषेत अनुसूची २ मधिल प्राण्यांना 'मोठी शिकार' (BIG GAME) असे संबोधले जायचे.त्यामुळे हत्तींची शिकार चालूच राहिली. त्यात विरप्पन सारखे अनधिकृत शिकार करणारया लोकांची भर होतीच. हत्तींचे अस्तित्वच त्यामुळे धोक्यात आले होते.

काळाची गरज लक्ष्यात घेवून १९७७ साली हत्तीचा समावेश अनुसूची १ मध्ये करण्यात आला.त्या आधिच १९७५ साली आतंरराष्ट्रिय स्थरावर हत्तीचा समावेश CITIES ( Convention on International Trade in Endengered Species 0f Wild Fauna and Flora) च्या अनुसूची १ मध्ये करण्यात आला होता. 'वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२' च्या कायद्यात १९८६ आणि १९९१ साली सुधारणा करण्यात आली आणि परदेशी व भारतीय हस्तीदंताच्या व्यापारावर पुर्ण बंदी घालण्यात आली.फेब्रुवारी १९९२ साली 'प्रोजेक्ट एलिफंट' राबविण्यास सुरवात झाली. हत्तींच्या निवासस्थानालाही विशेष संरक्षण देण्यात आले.आणि हत्तींच्या संवर्धनाला खऱ्या अर्थाने सुरवात झाली.

वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ मध्ये जंगली हत्तींबरोबरच पाळीव हत्तींबाबतही काही तरतूदी करण्यात आल्या होत्या.त्यातली सर्वात महत्त्वाची म्हणजे.पाळीव हत्तीच्या मालकांनी त्यांचेकडिल हत्तींची माहिती सरकारला कळवून रितसर मालकी हक्क प्रमाणपत्र प्राप्त करणे ही होय.मालकी प्रमाणपत्र देताना हत्तीची ओळख पटावी यासाठी हत्तीच्या शरिरावर खूण करण्याचे वन विभागावर बंधनही घालण्यात आले.पण या

कायद्याची आवश्यक प्रसिध्दि न झाल्याने अनेक लोकांनी प्रमाणपत्रासाठी अर्जच केले नाहीत.वन विभागांकडे मनुष्यबळाची कमतरता असल्याने त्यांचेकडूनही काटेकोर तपासणी करण्यात आली नाही.त्यामुळे अवैध हत्ती पाळणाऱ्यांचे फावले.पुण्यात जख्मी अवस्थेत हत्तीचे पिलू सोडून त्याचा मालक फरार झाला हे त्याचे ताजे उदाहरण म्हणून सांगता येईल.ज्यांनी प्रमाणपत्र घेतले नाही त्यांना शासनाने २००६ साली कायदयात सुधारणा करून अजून एक संधी दिली.तरीही अजून अनेक लोकांकडे असे प्रमाणपत्र नाही. हत्तीवर ओळख पट्वण्यासाठी कोणतीही खूण नाही. त्यामूळेच अडचणीत येताच हत्तीला सोडून पळून जाणे त्यांच्या मालकाला शक्य होते. आतातर प्राण्याची ओळख पटवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध झाले आहे. या मध्ये प्राण्याच्या शरिरात तांदळाच्या दाण्याच्या आकाराइतकी चिप बसविली जाते. नुकतेच पिंपरी चिंचवड महानगर पालिकेने या तत्रंज्ञाचा वापर करण्याचे जाहिर केले आहे.देरसे आये लेकिन दुरूस्त आये असे म्हणता येईल!

मालकी प्रमाणपत्र प्राप्त न करणाऱ्यांवर व कायद्याच्या इतर तरतूदी न पाळणाऱ्यांवर कायादयाचा बडगा उभारण्याची वेळ आता आली आहे.ज्यांच्याकडे असे पमाणपत्र नाही त्यांना वन विभागाच्या पुर्वपरवानगी शिवाय हत्तींची वाहतूक करता येत नाही. ज्यांच्याकडे प्रमाणपत्र आहे त्यांनाही नव्या ठिकाणी हत्ती वाहतूक केल्या नंतर ३० दिवसांचे आत त्याबाबत स्थानिक वन अधिकाऱ्याला माहिती देणे कायदयाने बंधनकारक आहे.माहिती न देणाऱ्यां विरूध्द वन विभाग व पोलीसही कार्यवाही करताना दिसत नाहीत. साहजिकच गुन्हे करणाऱ्यांचे फावते.कायदयाची कडक अंमलबजावणी हाच या वरील महत्वाचा उपाय आहे.

पाळीव हत्तींबाबत दुसरी महत्वाची बाब आहे त्यांची देखभाल.देखभाल खर्चिक असते हे खरेच आहे. खर्चिक असली तरी आवश्यक देखभाल करणे 'प्राणी क्लेश प्रतिबंध अधिनियम १९६०' अन्वये मालकांवर बंधनकारक आहे.कायदयाचे पालन न करणाऱ्या मालकांवर पोलीस कार्यवाही करू शकतात.पण ते यात फार लक्ष घालत नाहीत असे प्राणी क्लेश प्रतिबंध संस्थेचे प्रतिनिधी सांगतात.अनेक कारणांमुळे प्राण्यांना बेवारस सोडले जाते.अश्या प्राण्यांची देखभाल करण्याचे काम काही संस्था करतात.पण हत्तीच्या देखभालीचा खर्च जास्त असल्याने संस्थाच काय महानगर पालिका आणि प्रसंगी वन विभागही त्यांची जबाबदारी घेण्याचे टाळतात हे .अश्या प्रकरणात जबाबदारी कोणी घ्यावयाची यासाठी कायद्यात तरतूद केल्या शिवाय किंवा शासनाने ठाम निर्णय/भुमिका घेतल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही.पण महानगर पालिकेच्या हद्दित ही जबाबदरी सर्वप्रथम महानगरपालिकेचीच आहे यात शंका नाही.गर्दिच्या ठिकाणी हत्तीला फिरण्यास बंदी घालण्याची कार्यवाही सुध्दा महानगरपालिकेनेच करणे अपेक्षित आहे. कारण मनपा हद्दितील लोकांचे व त्यांच्या संपत्तीचे संरक्षण करण्याची जबाबदारी मनपाची आहे.मनपाने या बाबत ठराव करावा व त्याची अंमलबजावणी पोलिसांनी करावी.याबाबतचा संदेह लवकरात लवकर दुर करणे आवश्यक आहे.

आता प्रश्न येतो तो जखमी हत्तींना हाताळण्याचा.पुण्यात हत्तीचे जखमी पिलू चार दिवस जागेवरच पडून होते.त्याला हाताळण्यासाठी आवश्यक असलेल्या साधनसामुग्राची,प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची वाणवा होती. त्याचे पर्यवसन पिल्लाचा मृत्यु होण्यात झाले.दरवर्शी अश्या पध्द्तीने अनेक प्राण्यांचा मृत्यु होतो.वार्षिक बजेट मध्ये आवश्यक आर्थिक तरतूद केल्यास, अत्याधुनीक साधनसामुग्री उपलब्ध करून दिल्यास्,कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिल्यास अशी प्रकरणे यशस्वीपणे हाताळणे सरकारी यंत्रणांना शक्य होईल. वास्तविक जिल्हाधिकारी यांच्या कार्यकक्षेतील आपत्कालीन कक्ष्याकडे या प्रकारच्या सोई उपलब्ध होणे आवश्यक आहे. पण आता यासाठी सेवाभावी संस्थांनीही पुढाकार घेण्याची नितांत गरज आहे.तरूणांसाठी वन्यजीव व्यवस्थापनातील अशा अनेक संधी आहेत. त्यांनी त्या घ्यायला हव्यात.केवळ तरूणच भविष्यातील समस्या सक्षमपणे हाताळू शकतात.त्यासाठी त्यांना योग्य मार्गदर्शन आणि प्रशिक्षण देण्याची जबाबदारी मात्र आपण वेळीच पार पाडायला हवी.

१५ ते २० हजार वर्षांपुर्वी संपुर्ण उत्तर खंडात हत्तींचे अस्तित्व होते.आता ते आफ्रिका आणि आशिया खंडांपुरते मर्यादित राहिले आहेत.आशिया खंडात त्यांची सर्वाधिक संख्या भारतात आहे.१९८० साली देशातील त्यांची संख्या १५००० होती २००१ साली त्यात वाढ होउन ती २८००० झाली आहे. पण हा चढता आलेख आता घसरत आहे.जंगली व पाळीव हत्तींच्या संवर्धनाच्या कामाला अधिक चालना देण्याची त्यात लोकसहभाग वाढविण्याची वेळ आता येउन ठेपली आहे.

**गणित** — **वृषाली**

कधी वाटते .या जीवनाचे "गणित '
आपल्याला कधी कळलेच नाही की काय ?
आवडीच्या माणसांशी आपले "सूर "जुळलेच नाहीत की काय ?
"बेरीज "करायची होती नात्यांची .
"हातचा "घेतला होता स्नेहाचा ..
पण चुकतच गेली सदा ..न .कदा ..
'गुणाकार "करायचा होता प्रेमाचा
पण साथ नाही मिळाली गुणकाची ..
...मग उत्तरच नाही आले मनासारखे ..
"भागाकार " केला दुख्खाचा ..
पण कीती भागले तरी उत्तर "शून्य " ..नाहीच
"वजाबाकीने "..मात्र सदा साथ दिली
जीवनाच्या प्रवासात कीती माणसे "वजा " होत गेली ..
पत्ताच नाही लागला ..
असे हे "गणित " सदा चुकतच गेले ...
"सुटले " वाटता ..वाटता."अवघडच 'राहिले .!!

**ø आई** — **अंजली अभिनव**

आई  ग खुप खुप येते तुझी आठवण मला
तरी देखिल तू पुन्हा येवू नकोस
असच संगावस वाटतं तुला ....

आज्जा-आजीचा सतत ओरडन
बाबांचा तुला येता जाता मारन
जेव्हा सारं  सारं आठवत
तेव्हा हुंदक्या-हुंदक्यान रडू येत......

आठवत आई ,
आजीने थापलेली भाकर
तू माला भरवायचीस, ठसका लागल्यावर
बका बका खान्याबद्दल खोटं  खोटं रागवायचीस
आज रागवायला कुणी सुद्धा नव्हतं गं मला
तरी देखिल तू पुन्हा येवू नकोस
असच संगावस वाटत तुला ....

घड्वांचीवरील ट्रंकेतलं
तुझं जुनं लुगडं हाती लागलं
तेव्हा किती दिवसांनी
तुझा कमरेला मीठी मारायचं सुख लाभलं  .....

लुगड़याला डोळे पुसताना
जेव्हा तोंडून हुंदका फुटला
दळीद्रि पोरीची दळभद्री  लक्षण म्हणत
बाबांचा पाठीत रट्टा बसला
हातून लुगडं हिसकावून घेताना
तुझा दुरावा परत अनुभवला
तरी देखिल तू पुन्हा येवू नकोस
असच संगावस वाटत तुला ....

तुझा आठवनीनीं  का गं अशी
रोज उशी भिजायची
तुझा कुशीची उब आता
आठवनीतच  अनुभवायची
घे ना गं आई माला   तुझा जवळ बोलावून

देवा घरी शहाणी वागेन तू न सांगता आपणहून
वेड्या सारखे वागल्यास   बाबा
मलाही जाळुन  मारतील का गं ?
देवाघरी जायचा मार्ग सोप्पा करून टाकतील का गं ?

तुझा जवळ यायचा पाहिलास किती सोप्पा उपाय सुचला
तू पुन्हा येवू नकोस आई
मीच येइन तुझा भेटीला .......

ꣻꣻ

**दवबिंदू** — जान्हवी सारंग

ती बोलते ते सुमार बेसुमार
समजून दाबून टाकला जातो निखारा
तिने जपलेले असंख्य उमाळे
घालून पाडून ठरवले जातात फिके .
इतरांच्या सावलीतच तिची उभारी
त्यांच्या स्वतान्त्र्यातच ती सामावलेली
तिच्या जखमा नसतात साध्या
वेदाच्या कहारात घडलेल्या घटना
हे सार समजून उमजूनही
ती निकराने ओढत राहिली आहे जू
उगवलेल्या पिकवर चमकत आहेत
आश्वासक दवबिंदू .

**जाच** — जान्हवी सारंग

आजुबाजू नेहमीचाच
घुटमळतो आहे वारा
पण कोरडठाक वाहण्याचा
निघालाय फतवा .
उनही सकाळी सवयीने
ओलांडतंय उंबरा
पण सलगी जाणवणार नाही
इतपत मिरवताय ताठा
क्षणांची सरकतेय माळ
न थबकता
न गुंफताच फुलांचा
होतोय, पडतोय चुरा.
जीवश्च कण्ठश्च पाखरांचा थवा
फिरतोय डोक्यात घणाघाती घाव घालत
श्वासही निमुटपणे बजावतो कार्य
शापमुक्त होईपर्यंत आहे एक जाचच .

## आपलेपणा ________ योगिता चव्हाण

आपलेपणा काय असतो
हा कधीच नाही समजला..
आपल्याच माणसात राहून
आपलेपणाच नाही उमजला..

एकाकी जीव हा होता
तो एकाकीच राहीला..
रडण्याच्या या प्रयत्नात
सतत जीवच जळत राहीला..

वाट बघितली आपल्या माणसाची
पण कोणीच न आला त्या वाटेला..
एकटेपणाच होता ह्या नशिबी
शेवटी तो एकटाच राहीला..

## जीभ _______ रुपेश पेवेकर

मुख-म्यानात फिरणारी जीभ
म्हणजे दुधारी तलवार...

अनेक चव चाखून तरी सुध्दा
असते ती चवीपासून विलीप्त...

मग तीच जीभ कडू गोड
व्याक्याचे शब्दच ओकले जाई...

गोड शब्दांनी जख्मा बुजवी,तर
कडू शब्दांनी कुणाला घायाळ करी...

जिभेची सपाटी इतकी विचित्र की
तिथे फुल फुलतात आणि काटेही...

अतिश्रमाने देहातील प्रत्येक अवयव थकतो
पण थकत नाही ही कधी ईवलूशी जीभ...

चिरतारूण्य प्राप्त करूनी
प्रचंड शक्ती धारण करूनी
ही जन्मास आली जीभ...

ह्या जीभेवर ताबा जो मिळवी
ही तो जी काबूत ठेवी
तोच तितकं ते जीवनात जिंकती...!

### येईल का रे तुला माझी आठवण....?

शशांक भी. गवंडे

... मावळतीच्या सूर्याला पाहताना..
आकाशातला चंद्र शोधताना..
वळणाचा रस्ता संपताना..
येईल का रे तुला माझी आठवण....?

लाटांवरून धावताना..
वाळूत रेघोट्या मारताना..
शहाळ्याची गोडी चाखताना...
येईल का रे तुला माझी आठवण....?

ढग दाटून येताना..
मातीचा गंध शोशताना..
छत्रीतून चिंब भिजताना..
येईल का रे तुला माझी आठवण....?

गुलाबी थंडीत फिरताना...
शेकोटीची उब शेकताना..
मऊशार दुलईत शिरताना..
येईल का रे तुला माझी आठवण....?

वावटळीचे कण उडताना..
डोळ्यात तूस सलताना...
ओली जखम ठसठसताना..
येईल का रे तुला माझी आठवण....?

रामेश्वराच्या पायऱ्या चढताना..
घंटानाद घुमताना..
डोळे मिटून हात जोडताना..
येईल का रे तुला माझी आठवण....?

सनई-चौघडे वाजताना..
सप्तपदी चालताना..
मेहंदितलं नाव शोधताना..

बायकोच्या केसातला मोगरा हुंगताना ..
न्हाउन आल्यावर तिला न्याहाळताना ..
तुझ्या छातीवर तिचे ठसेउमटताना.
येईल कारे तुला माझी आठवण..?

झुम्बराचे दिवे जळताना.
बाल्कनीत सिगारेट ओढताना..
दर्दभरी गझलऐकताना..
येईल कारे तुला माझी आठवण..?

निरांजनाचा दिवा विझताना ..
चमकतातारा पडताना..
सरणावरलाकड जळताना...तरी..
नक्कीच ..येईल तुला माझी आठवण..

येईल का रे तुला माझी आठवण....?

**गगनभरारी** ________________ **राहुल आराध्ये**

घ्यायची गगनभरारी ठरवुनी घेतली मी
पहिली उडी, ढग तो हसला.
तो हसला मग चेव मजला चढला
घेतली मग आणखी एक उडी.
आता तो मज वेडावून एक पाऊल वर गेला.
एक पाऊल वर गेला, मी पाऊल पुढे सरलो.
मी चवताळलो, आता तो मज वेंगाडुनी
दोन पाऊल वर सरकला.

तो दोन पाऊले वर सरकला आणि
मी बेभान होउनी घेतली उंचभरारी
पोहोचलो समीप ढगाच्या बोललो मान उंचावुनी
"अरे वेड्या तुला वाटले, तू उंच जातोयस,
पण खरा तू मागेच जातोयस,
तुझ्या उंचीला आहेत मर्यादा,
माझ्या शिल्लक आहेत मर्यादा."
ठरवुनच घेतली आहे मी "गगनभरारी"

ऐकताच ढग आता चार पाऊले खाली उतरला
आणि मिठीत माझ्या विसावला.
गडगडले ढगाचे शब्द,
"ठरवुनी घेतली होतीस तू गगनभरारी
पण झाली ती आता गगनचुंबी भरारी" !

-

**साक्ष** ____________ **स्वाती भट**

मलूललेल्या पाकळया
अलगद गळून गेल्या.
सुगंध मात्र श्वासात
भरभरून रेंगाळत राहिला.
रडवेला तुझा चेहरा
पाहता पाहता दुरावला.
परतुन पुन्हा भेटण्यास
जीव व्याकूळ झाला.
रानफुलांचा रंगीत सडा
पायवाट रंगवून राहिला.
पुसटणाऱ्या पाऊलखुणा
काळजात उमटत गेल्या.
झाकोळणारा अंधार
भोवताली साकोळला.
किलबिलणाऱ्या पक्षांनी
आसमंत निनादत राहिला.
तेव्हांच टेकडी वरुन लहरणारा
मंदिराच्या घंटेचा ध्वनी
आपल्या अतूट प्रीतीची
साक्ष अंतरी आश्वासून गेला.

## मन एक वारूळ _________________ अरुण वी.देशपांडे

मन आपले एक वारूळ
साठवण  आठवणींची
क्षण ते  मुंग्याच भासती
रांगेत जे  येती नि जाती ....!.....||१ ||
मन एक भासते वारूळ
आठवणीचा तो  कल्लोळ
एक अठवा-  दुसरी येते
असे सारी  सरमिसळ ...........! || २ ||
मन ते  असते वारूळ
आठवणींचे रेशीम जाळ
जीव जातो गुंतुनी त्यात
न कळे त्यास काळ वेळ ......! || ३ ||
भूसभूसित वाटे वारूळ
भ्रम आहे हो हा तुमचा
पक्क्या असती आठवणी
मजबूत असे वारूळ .............!    ||४ ||

## समर्था आता तुमच्या ..विना ..... ________ अरुण वी.देशपांडे

गोंधळून गेलेल्या या मना
चांगले-वाईट काय कळेना
हे सारे घोळ आता मिटेना
समर्था आता तुमच्या विना ......!........||१||
मनाला भावेल ते  आम्हाला
कसे करून मिळाले पाहिजे
तडजोडी त्यासठी करूनही
डावपेच लढवतो  नाना ....!               ||२||
गुरुसेवा घडावी असे कधी
जाणवते हो आमच्याही मना
चंचल मन आळशी इतके
नामी बहाणे सुचती या मना ........!    ||३ ||
डोळे मिटुनी घेतो  क्षणभरी
मन फिरुनी येते  त्रिभुवनी
स्मरण करण्या तुमचे मात्र
वेळ  मुळीच नसतो या मना ........!    ||४||
हे सारे घोळ आता मिटेना
समर्था आता तुमच्या ..विना .....||

## दीपावली

सुरेश पाठे पाटिल

दीपावली असंख्य दिव्यांची
चमचमत्या आकाशकंदीलांची,
आकाशात आतिषबाजी
आरास अंगणात नक्षीदार रांगोळयांची,

हा सण चिमुरड्यांच्या उत्साहाचा,
मनभरून आनंद लुटण्याचा,
सगे सोयरे मिळूनी करिती
सण साजरा दिपोस्त्वाचा,

असे ओढ या दिपावलीची
सासुरवाशिणी माहेरा जाती,
औक्षण करुनी भाऊरायाचे
सुखदुख्खाचे हितगुज करिती,

होवो सर्वांच्या इच्छा पूर्ण
या दिपावलीच्या सणाला,
प्रार्थना करितो ईश्वराशी
लाभो सुख समृद्धी आपल्या कुटुंबाला

## मी तुझीच आहे ....

सुनिल खांडेकर

खरंच कधी कधी नाही सांगू शकत
कोणाच्यात मनातलं कसा वागेल ते
कधी पटकन वारयासारखी दिशा बदलेल ते
वाळूत तिचं नांव मी कोरलं मनापासून
पण हा वारा  सांगत होता मला
" नको हा वेडेपणा करूस तु "
तु समजून घेतलंस तिला पण तिने ??
तुझं हळवे मन लगेच गृहीत  धरतं ..
खूप जवळ गेलास तिच्या
तिने कोठे वाचलंय तुझ्या मनातलं ??
तिने नाही म्हटलं तर काय करणार ?
तिच्या  मनांत काही वेगळं असेल तर ?
समजा तिने तुला फक्त झुलवत ठेवलं तर ??"
पण मी माझं प्रेम केव्हाच तिच्यावर
ओवाळून टाकलंय तिचं असेल नसेल ..तरी
हे खरं आहे की तिच्या मनातले अंतरंग
मी नाही जाणलेय ...काय ? असेल तिच्या मनांत ..
तिचे अबोल भाव अजूनही तसेच डोळयांत आणि
ओठांवर ..पण मी  खूप अगतिक तिच्या
एका होकारासाठी , तिच्या विरहांत मी
स्वतःलाच प्रश्न विचारतो " ती हो म्हणेल मला ? "
पण तिचे अबोल भाव अजूनही मला विचलित
करतात उगाच... पण मी वाट पाहीन .....
तिच्या उत्तराची तीही  समजून घेईन मला
 एक दिवस ती जाणेन  माझं मन
मला सांगेन हसत " मी तुझीच आहे ...."

लोक संगीत - कावळा पिपेरी वाजवितो, या गीताचे, गीतकार/ गायक पांडुरंग वनमाळी यांची माफी मागून. आजचे नेते (गाळात फसलेले / फसू पाहणार्यांच्या मनातील हे गीत). विडंबन गीत.

याचा अर्थ असा नव्हे. सर्व नेते दोषी आहेत. दोषी व्यक्तीं/नेत्यांच्या मनातील गीत. चारित्र्यवान/कलंक नसलेल्यांना त्रिवार प्रणाम.

नेत्यांच्या मनातील गीत

**"अरविंद तुतारी वाजवितो**
**सार्या लोकांना जागवितो"** ______ **गजानन लोखंडे**

आरोपांची राळ, तुम्ही कमी करा
छातीत काळ बघा, येतेय जरा
आम्हाला दिसतेय, मरण दारा
कोर्टातन आरोप, सिद्ध करा

पक्षाचा प्रचार हा चालवितो
सार्या लोकांना जागवितो

अरविंद तुतारी वाजवितो
सार्या लोकांना जागवितो (१)

अण्णांनी केले, आरोप फार
बदनाम झालो, आम्ही बेजार

मिडीयाने चढविले डोक्यावर फार
सर्वांना पडला, मनी विचार
धोक्याची घंटी हा वाजवितो
सार्या लोकांना जागवितो

अरविंद तुतारी वाजवितो
सार्या लोकांना जागवितो (२)

थापांना बळी, यांच्या पडू नका
विश्वास आमचा, उडवू नका
देशाची इज्जत, उधळू नका
नादी याच्या तुम्ही लागू नका

आम्ही आपल्याच देशाची वाचवितो
सार्या लोकांना जागवितो

आम्ही पण तुतारी वाजवितो
साऱ्या लोकांना वाचवितो (३)

गझल — वराडे पु ग

लाकडांच्या आत आता पोळले जेव्हा निखारे
उपनले तेव्हा तयांनी पेटणारे हे ढिगारे

या जिभेची धार जेव्हा टोचते अंगास माझ्या
का तिला वाटून गेले ते असावे मज शहारे

एकटाच हाकतो मी नाव माझी हरवलेली
शोधतांना सापडेना रोजचे माझे किनारे

ही कशी माझी दिवाळी आज हा जल्लोष नुसता
स्वैर ह्या घरट्यात माझ्या या भुकेचे बघ पहारे


येत आहे रे शिषारी बघ तुझ्या या वागण्याची
मी तुझ्या दारात आले स्वागताला ये जरारे


मौन तू पाळून दमली बोलुनी गेलेच डोळे
वाचता आले न मजला त्या तुझ्या डोळ्यात सारे

तूच "पुरुषोत्तम "अता रे झाक माझी लाज सारी
मैफिलीला आज हरले ते मलारे मांडणारे


हुंकार !!
वाळूने हुंकारीले असे, स्तब्ध जाहले जराशी
शालीत सुख अन् , काळजात खेळते आसुंशी ||
नित पहुडते किनारी, जिवलग तो जीवनराशी
लाटांशी नाते त्याचे, गहिवरते मीही जराशी ||
कोडे मला न उलगडले, नित वाहते अपमान का
लहरत्या लाटा चुंबण्या, त्याचे तन अधीर का ||
भय माझे वाढतेच, पुनवेचा चंद्र शिखी चढता
हृदयाचे थिजले ठोके, उचंबळूनी त्या धावता ||
कवेत घेणे या लाटांचे, नाहीच कधी मला भावले
एकेका मिठीत त्यांच्या, रोज जळणे माझे झाले ||
अवखळ यौवना असली, विवाहिता ती आहे ना
ओढ किनाऱ्याची अशी, अथांग सागर जवळी ना ||
भास हा असावा सखे, वाटे मज इतिहास व्हावा
कटू या आठवांचा, हळूहळू मजला विसर पडावा ||
- विशाखा
http://vishakhaskavita.blogspot.com/


सुप्रभात !!
अतृप्त हे मन | तृप्ततेचा आव |
दूजा नाही भाव | संपूर्णता ||
आमची चाकरी | आम्हास भोवली |
तोऱ्यात चालली | संपूर्णता ||
विश्वाचे निदान | करण्यासी सिद्ध |
मुर्खांची प्रसिद्ध | संपूर्णतः ||
मनाचे पाखरु | आत्म परीक्षण |
सुख उधळणे | संपूर्णता ||
रविची किरणे | अशिर्वाद उभी |
लाभली या नभी | संपूर्णता ||
- विशाखा
http://vishakhaskavita.blogspot.com/


साथ
रस्त्यातून चालताना वाट कधी सरली ; मला काही कळलंच नाही ,
त्या वाटेवरून चालताना ; कोणी भेटल्यांच आठवतंच नाही,
माझे ते माझ्यासोबतंच होते ; बाकी सगळे वळणांवर वळत होते,
पुढे त्या वाटेवर कुणी नव्हतं ; मागे वळून बघीतलं तर माझ कुणीच नव्हतं,
चालत राहिलो ती वाट ; पाहत राहीलो फक्त कोणाची तरी वाट ,
शेवटी मिळाली साथ त्या व्यक्तीची ;नाही माझी असली तरी माझ्या सोबतीची,
तिच्या सोबत चालताना वेदना अशांत होत्या ; तिच्या सोबतच पुढे जायचंय
अशा त्या ही खुणावत होत्या ,
वाटतं तेवढ सोप्प नव्हतं; पण आपलं म्हणणारं तिच्याशिवाय कुणीच नव्हतं
वाटणारा तिचा आधार काही क्षणांचाच होता; पणं का कुणांस ठाऊक
नियतीचा काही वेगळाच डाव होता,
क्षणाचा हा आधार आयुष्यभराचा वाटू लागतो; काही क्षणाचीच ही भेट
जगण्याचा भागंच होवू पाहतो,
रस्ता सरतां - सरता पावलं जड होऊ लागतात ; हीच खरी 'साथ' असे तेही
खुणवू लागतात


अपेक्षा तुझी...
आज पुन्हां तुला सांगावसं वाटतं,
पणं काही सांगितल्यावर तुझ्या मनःत विचारांच वादळ दाटतं...
जागं राहुन स्वप्न पहायची सवयंच जणू आहे मला,
माझ्या सोबत त्या विचारांशी पटवून घेणा गं जरा...
लहानश्या गोष्टीला सुद्धा मोठं महत्त्व येवून जातं,
आणि वेळीच लक्ष त्यावर दिलं नाही मग तेवढंच राहून जातं...
विचारांची गर्दी सारखं मनःत एकटं करू पाहते,
सरतेशेवटी तू सुद्धा त्या क्षणी मला एकटंच सोडून जातेस...
अपेक्षांचं ओझं ठेवून स्वतःलाच त्रास देवून जातो,
त्या अपेक्षांचं ओझ तुझ्या माथी ठेवून तुलाही त्रास देवू पाहतो...
हसऱ्या चेहऱ्यामागील आसवे गाळणारे डोळे तुला दिसतील का?
याचं जन्मासोबत प्रत्येक जन्मी माझी होवून राहशील ना!



Darshan Vasudev Kamat Photography



Why Need This Sign,
If We Are Not Able To STOP
"Child Labour"
Darshan Kamat Photography
Send Your Child To School
Not To Work.



Darshan Vasudev Kamat Photography



Darshan Vasudev Kamat Photography



Photography



अति घाई... अंपगत्वाकडे नेई.
रेल्वे लाईन क्रॉस करु नका.
प्रगती पालांडे (मंथन स्कुल ऑफ आर्ट,परेल)



SEPTEMBER 2010
5 SUN
पैसे दान केले
की मिळते ती
तात्पुरती मनःशांती
आणि
मतदान केले की
6 MON
मिळतो तो
पंचवार्षिक मनस्ताप
प्र. सु. शिरसाट



JULY 2010
9 FRI
मी म्हणेन ती
पूर्व दिशा....
असे म्हणणारे
भूगोल
10 SA
बदलतील का?
प्र. सु. शिरसाट



AUGUST 2010
1 SUN
मौन बाळगणे
ही लोकशाहीतील
सरकारची
'मन मोहन'
2 MON
कला आहे!
प्र. सु. शिरसाट


21 SAT
शांत राहून सगळे
प्रश्न सुटतात.....
मग
कोर्टात धसाफोडी
करायची
22 SUN
गरजंच काय?
प्र. सु. शिरसाट


OCTOBER 2010
23 SAT
Practise
makes men Perfect
सगळा सराव
फक्त पुरुषांनीच
का करावा ?
24 SUN
प्र. सु. शिरसाट


OCTOBER 2010
3 SUN
रोज पहाटे
दारूने भरलेला
ग्लास हातात
आला की पुन्हा
4 MON
रात्र आरंभ
होते !
प्र.सु. शिरसाट


AUGUST 2010
कसाबच्या
कुंडलीत
मृत्युयोग आहे...
पण
ठिकाण आणि
वेळ... सापडलंच
नाही !
प्र.सु. शिरसाट




गुटखा हा एक विषप्रयोग आहे
गुटखा आत
कवटी बाहेर


पुन्हा
भेट
पुढल्या वर्षी
तोपर्यंत
लोभ
असावा...